महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

# दक्षता

- कथा
- लेख
- कविता
- ललित लेख

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

Vol : 52 | Issue : 09 | Mumbai | Marathi Monthly | June 2026 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30/-



सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी पारितोषिक प्रदान



रारापोबल गट क्र ४ तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारसोहळा





तरुणाईला रोजगाराचे बळ व सेवेचा सन्मान



एमपीएससी अधिकारी बनण्याचा राजमार्ग



डिजिटल व्यसन

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

## आता दक्षता पीडीएफ स्वरूपात
## महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर
## मोफत उपलब्ध!

**S.B.Collect**

छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी

https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php

*अथवा*

खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.



**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/-**
**वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**

**वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**

अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

**https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine**

YouTube MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

पत्रव्यवहारासाठी पत्ता: महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

**पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!**




जून २०२६ । वर्ष ५२ वे । अंक ०९ वा

**मार्गदर्शन**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**मो. सुवेज़ हक**
पोलीस महानिरीक्षक
(नि. व स.)

**मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक**
**विजय मनोहर खरात**
सहायक पोलीस महानिरीक्षक

**अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन**
**सुरेंद्र बनगे**
कार्यालय अधीक्षक

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

**वितरण व्यवस्था**
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

**मांडणी, मुद्रण व प्रकाशन**

विजय मनोहर खरात यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.

संपादक : **विजय मनोहर खरात**
१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर, जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४

*या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय...



दक्षताच्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार. विविध विषयांना स्पर्श करणारा आणि पोलीस दलातील घडामोडींबद्दल वाचकांना अवगत करणारा दक्षताचा जून महिन्याचा अंक सहर्ष सादर करत आहोत.


गडचिरोली जिल्ह्यात माओवादी विचारधारेला निष्प्रभ करण्यासाठी पोलीस दलातर्फे विविध नागरी कृती उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. याचाच भाग म्हणून जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'प्रोजेक्ट उडान' अंतर्गत दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील सुमारे २४०० सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती, तसेच जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पाल्य सदर मेळाव्यात सहभागी झाले होते. या मेळाव्याच्या माध्यमातून एकूण १२७८ युवक-युवतींना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नियुक्तीपत्रे मिळाली आहेत. या सगळ्याचा लेखाजोखा मांडणारा लेख अंकात प्रकाशित केलेला आहे.

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ येथील नागपूर आस्थापनेमध्ये कार्यरत महाराष्ट्र सुरक्षा बलातील महिला सुरक्षाकर्मी प्रशिक्षणार्थ्यांसाठी मूलभूत प्रशिक्षण तसेच आस्थापनेत कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी गटामध्ये अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले. त्याची माहिती देणारा लेख अंकात समाविष्ट आहे. तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर येथील टीमने SBL Energy Ltd. येथे झालेल्या विध्वंसक स्फोटाच्या वेळी केलेल्या साहसपूर्ण कामगिरीचाही आढावा अंकात घेण्यात आला आहे.

पाचोड पोलीस ठाणे परिसरात डायल ११२ प्रणालीचा वापर करून अल्पवयीन मुलीचा विवाह रोखण्यात पोलिसांना यश मिळाले. त्याची यशोगाथाही प्रसिद्ध करत आहोत.

याखेरीज श्री. सुरेश वांदिले, श्री. उत्तम सदाकाळ, श्री. राज दुधाट, श्री. पंकज पेडणेकर, श्रीमती भारती सावंत, श्री. सचिन बेंडभर, श्रीमती संजीवनी भिंगारे यांचे आशयसंपन्न लेख अंकाची उपयुक्तता आणि मनोरंजनात्मक मूल्य वाढवतील असा विश्वास वाटतो. त्याखेरीज अंकात तपासकथा, पाककृती, शब्दकोडे ही नेहमीची सदरे अंतर्भूत आहेतच. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

**आपला स्नेहांकित,**



**(विजय खरात)**
**सहायक पोलीस महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

## पोलीस महासंचालकांचा संवाद

# शौर्य, त्याग व समर्पणाचा सन्मान



> सी-६० पथकातील अधिकाऱ्यांनी व जवानांनी दिलेल्या उल्लेखनीय सेवेचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२६ पासून सी-६० सेवा पदक प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. हे केवळ एक पदक नाही, तर तो सी-६० जवानांचे शौर्य, त्याग आणि समर्पण यांचा सन्मान आहे.

सस्नेह नमस्कार.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ माओवादाच्या विरोधातील लढ्यात अमूल्य योगदान देणारे पथक अशी ख्याती असलेल्या सी-६० पथकाने माओवादी चळवळीचा बिमोड करण्याकामी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. सी-६० जवानांच्या शौर्यपूर्ण कारवायांमुळे आजपर्यंत एकूण ३५३ माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले असून, ४२४ माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच ८१४ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. सी-६० जवानांनी दाखविलेले धाडस, अचूक नियोजन आणि शौर्य यामुळे माओवादी कारवायांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य झाले आहे. सी-६० पथकातील अधिकाऱ्यांनी व जवानांनी दिलेल्या उल्लेखनीय सेवेचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२६ पासून सी-६० सेवा पदक प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार, सी-६० पथकामध्ये सलग तीन वर्षे कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अंमलदारांना व दोन वर्षे कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना हे पदक प्रदान करण्यात येणार आहे. सी-६० सेवा पदक हे केवळ एक पदक नाही, तर तो सी-६० जवानांचे शौर्य, त्याग आणि समर्पण यांचा सन्मान आहे. या पदकामुळे संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदारांचे मनोबल उंचावण्यास मदत होईल तसेच इतर अधिकारी व अंमलदारांना उत्कृष्ट कार्य करण्यास प्रेरणा मिळेल असा विश्वास वाटतो.

याच बरोबरीने गडचिरोली जिल्ह्यात माओवादी विचारधारेचा प्रभाव कमी करण्यासाठी पोलीस दलातर्फे विविध नागरी कृती उपक्रम राबवण्यात येत आहेत. याअंतर्गत जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'प्रोजेक्ट उडान' अंतर्गत दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील सुमारे २४०० सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी, तसेच जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या पाल्यांनी सहभाग नोंदवला. सदर मेळाव्यामधून एकूण १२७८ युवक-युवतींना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नियुक्ती प्राप्त झाली.

मुख्यत: स्त्रिया, लहान मुले, व ज्येष्ठ नागरिक, याखेरीज कोणत्याही वयोगटातील गरजू आणि संकटग्रस्त नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांची मदत मिळावी या उद्देशाने 'महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली - डायल ११२' हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. यात एकाच टोल फ्री क्रमांकावर पोलिसांची मदत




**श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र स्विकारताना सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी पारितोषिक प्राप्त बदनापूर पोलीस ठाणे, जालना येथील सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती निशा बनसोड**

उपलब्ध झाली असून राज्यभरातील ४४ पोलीस घटक २४×७ प्रतिसाद देत गरजू व्यक्तींना साहाय्य करण्यास सुसज्ज आहेत. डायल ११२ प्रणाली आज राज्यातील नागरिकांसाठी कशा प्रकारे संकटमोचक ठरत आहे याचा प्रत्यय नुकताच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाचोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत आला. येथे डायल ११२ प्रणालीअंतर्गत केल्या गेलेल्या एका कॉलमुळे एका अल्पवयीन मुलीचा विवाह रोखण्यात पोलिसांना यश आले. सदर प्रकरणातील मुलीचे योग्य प्रकारे समुपदेशन करून तिला शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात आले. ही घटना म्हणजे वेळेवर घेतलेला निर्णय व तत्पर प्रतिसाद याचे उत्तम उदाहरण आहे. या प्रणालीच्या प्रतिसाद कालावधीमध्ये लक्षणीय घट झाली असून २०२१ मधील सरासरी ५४ मिनिटांचा कालावधी कमी होऊन सरासरी ९ मिनिटांपर्यंत पोहोचला आहे, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

मार्च २०२६ करिता गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न व सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी या पारितोषिकांकरिता अनुक्रमे नागपूर शहर पोलीस घटकातील सदर पोलीस ठाणे येथील गु. रजि. नंबर २९/२०२६ व जालना पोलीस घटकातील बदनापूर पोलीस ठाणे येथील गु. रजि. नंबर ४४५/२०२२ या गुन्हेतपासांची निवड करण्यात आली. नागपूरमध्ये २ कोटी ९१ लाख ५० हजार रुपये किमतीच्या मुद्देमालाच्या चोरीप्रकरणी सदर पोलीस ठाण्याच्या तपासपथकाने उत्तम कामगिरी केली, तर बदनापूर येथील गुन्ह्याच्या तपासादरम्यान स्किझोफ्रेनियासारख्या विकाराने ग्रस्त असलेल्या अत्याचारित पीडितेला न्याय मिळवून देण्याचे शिवधनुष्य पोलिसांनी पेलले. या गुन्ह्यांच्या तपासांचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

जयहिंद!

**आपला स्नेहांकित,**



सदानंद दाते
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अंतरंग

## जून २०२६


### पोलीस विशेष




०७. तरुणाईला, रोजगाराचे बळ व सेवेचा सन्मान – **एम. रमेश, पोलीस अधीक्षक, गडचिरोली**

२४. राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर येथील टीमची SBL Energy Ltd. Industrial Explosives Manufacturer येथे झालेल्या विध्वंसक स्फोटातील साहसपूर्ण काम गिरी – **बच्चनसिंह, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूर**




३६. डायल ११२ आणि पाचोड पोलिसांची अतुलनीय कामगिरी : तत्पर कारवाई करत रोखला बालविवाह

३८. राज्य राखीव पोलीस बल गट क्र ४, नागपूरतर्फे विविध उपक्रमांची अंमलबजावणी – **बच्चनसिंह, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूर**




### छायाचित्र दालन

१७. सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी – पोलीस सन्मान सोहळा

### आरोग्य

४३. लठ्ठपणा : ‘वाढता’ धोका – **डॉ. अनिल शर्मा**

### कविता




२६. अस्तित्व झाडाचं – **बाळकृष्ण ठाणगे**

३२. खाकीतील कणा – **धनंजय पळसकर**

### विशेष लेख

१३. एमपीएससी अधिकारी बनण्याचा राजमार्ग – **एस. वाय. संदे**

### लेख




२७. शून्य व्याज कर्ज (झिरो इंटरेस्ट लोन) – **सुधाकर कुलकर्णी**

४७. डिजिटल व्यसन – **राज दुधाट**

५३. विभक्त कुटुंबपद्धती आणि हरवत चाललेले संस्कार – **कविता पेन्शनवार**

५७. वैशाखातील सृष्टीसौंदर्य – **भारती सावंत**

### नवी दिशा... नवीन संधी




१८. नवा काळ, नवीन संधी – **सुरेश वांदिले**

### कथा

३०. बचत – **सचिन बेंडभर**

३३. पिंजऱ्यातला पोपट – **पंकज पेडणेकर (गंधार)**

५०. सर्जा – **उत्तम सदाकाळ**

### तपासकथा




६०. कुऱ्हाडीचा दांडा... – **मंगेश चव्हाण तत्का. उपविभागीय पोलीस अधिकारी, सांगली**

६४. ‘ती’ रात्र – **निशा बनसोड, तत्का. सहा. पोलीस निरीक्षक, बदनापूर पोलीस ठाणे, जालना**

६८. संशयकल्लोळ – **महादेव आचरेकर, पोलीस निरीक्षक, काटोल पोलीस ठाणे, नागपूर ग्रामीण**

७१. निन्नी – **विद्या जाधव, सहा. पोलीस निरीक्षक, शेगाव पोलीस ठाणे, चंद्रपूर**




७४. अकारण – **जगदीश पवार, सहा. पोलीस निरीक्षक, पिशोर पोलीस ठाणे, छ. संभाजीनगर (ग्रामीण)**

### ८०. पाककृती

### ८१. शब्दकोडे



एम रमेश
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

# तरुणाईला, रोजगाराचे बळ व सेवेचा सन्मान

गडचिरोली जिल्हा हा पूर्वी माओवादी संघटनांच्या सातत्यपूर्ण विध्वंसक कारवायांमुळे दहशतीच्या सावटाखाली असलेला जिल्हा म्हणून ओळखला जात होता. तथापि, अलीकडील काळात गडचिरोली पोलीस दलाच्या विशेष अभियान (सी–६०) पथकाद्वारे प्रभावी माओवादीविरोधी कारवाई राबविण्यात आली. परिणामी या चळवळीची लक्षणीय पीछेहाट झाली आहे. यासोबतच माओवादी विचारधारेचा प्रभाव कमी करणेही आवश्यक असल्याने गडचिरोली पोलीस दलाने ‘नागरी कृती उपक्रम’ अंतर्गत जिल्ह्यातील बेरोजगार युवक–युवतींना लक्ष्य करून दुर्गम भागातील युवक–युवतींना सक्षम बनवण्यासाठी सार्वजनिक वाचनालयांची स्थापना करण्याचे आणि विविध रोजगार व स्वयंरोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले.

तसेच सन २०२५ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या गडचिरोली पोलीस दलातील एकूण १४५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मा. पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. ०१ मे–महाराष्ट्र दिन– रोजी त्यांपैकी ०५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. याचप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रथमच जाहीर करण्यात आलेल्या सी–६० सेवा पदकासाठी निवड





झालेल्या ४२५ पोलीस अधिकारी व अंमलदारांपैकी ०५ अधिकारी व अंमलदार यांना प्रशस्तिपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सी-६० सेवा पदक हे फक्त एक पदक नसून सी-६० जवानांच्या शौर्य, त्याग आणि समर्पणाचा सन्मान आहे.




## ‘प्रोजेक्ट उडान’अंतर्गत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

गडचिरोली जिल्ह्यातील बेरोजगार युवक आणि युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ‘प्रोजेक्ट उडान’ अंतर्गत दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू आलाम सभागृह येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या रोजगार मेळाव्यामध्ये महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, फ्लिपकार्ट, डी-मार्ट, लॉईड्स अँड मेटल्स एनर्जी लिमिटेड यांसारख्या नामांकित कंपन्यांसह एकूण ३८ कंपन्यांचा सहभाग होता. या विविध कंपन्यांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. या मेळाव्यात गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील सुमारे ४००० पेक्षा अधिक सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी, तसेच गडचिरोली पोलीस दलात कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांनीसुद्धा नोंदणी केली होती. त्यांच्यापैकी अंदाजे २४०० युवक-युवतींनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला.

सदर मेळाव्यामधून महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीमध्ये ३६७, हिताची (जळगाव) कंपनीमध्ये १३४, फ्लिपकार्ट व डी-मार्टमध्ये १२०, टोयोटा किर्लोस्कर कंपनीमध्ये ३० अशा विविध नामांकित कंपन्यांमध्ये एकूण १२७८ युवक-युवतींना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. निवड झालेल्या उमेदवारांना वार्षिक अंदाजे १ लाख ८० हजार ते ३ लाख ६० हजार रुपयांपर्यंतचे वेतन पॅकेज देण्यात आले.

सदर रोजगार मेळावा कार्यक्रमादरम्यान मा. राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री, गडचिरोली जिल्हा, ॲड. श्री. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले व त्यांचा सत्कार करण्यात आला. रोजगार मेळाव्यातील उपस्थित युवक-युवतींना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले, की तरुणांनी उपलब्ध संधींचा स्वीकार करून प्रामाणिकपणे कार्य करावे.





तसेच स्पर्धात्मक युगात स्वतःमध्ये सातत्याने प्रगती साधून स्वत:ला सक्षम बनवावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांनी निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या, तसेच या यशस्वी उपक्रमाबद्दल गडचिरोली पोलीस दलाचे विशेष अभिनंदन केले.

यापूर्वी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने विविध नागरी कृती उपक्रमाअंतर्गत 'दादालोरा खिडकी'च्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगार मेळावे आयोजित करून मोठ्या प्रमाणावर युवक–युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्यात आले. यामध्ये सुरक्षा रक्षक ८७७, नर्सिंग असिस्टंट १२९२, हॉस्पिटॅलिटी ३९८, ऑटोमोबाईल ३७७, इलेक्ट्रिशियन ३१३, प्लंबिंग ३५, वेल्डिंग ३७०, जनरल ड्युटी असिस्टंट ४०३, फील्ड ऑफिसर ११, व्हीएलई ५२, सेल्समन ५, वेब डेव्हलपर ९०, टीव्ही असेंब्ली ऑपरेटर ११०, सॉफ्टवेअर डेव्हलपर १२०, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण २५४३, किसान मोटर्स १५५ व टाटा मोटर मेकॅनिक २९ अशा विविध रोजगार व स्वयंरोजगार क्षेत्रांचा समावेश आहे.

सदर रोजगार मेळाव्यास मा. राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री ॲड. श्री. आशिष जयस्वाल, आमदार, गडचिरोली विधानसभा मतदारसंघ डॉ. श्री. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी, गडचिरोली श्री. अविशांत पंडा, तत्का. पोलीस अधीक्षक श्री. नीलोत्पल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली, श्री. सुहास गाडे, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज, सहा. पोलीस अधीक्षक श्री. अनिकेत हिरडे, पोलीस उपअधीक्षक (अभियान) श्री. विशाल नागरगोजे, संचालक (ग्रामीण विकास व उद्योजकता), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रा. श्री. कैलास मोरे, तसेच संचालक, युवाशक्ती फाउंडेशन, पुणे श्री. एकनाथ पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

**गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने विविध नागरी कृती उपक्रमाअंतर्गत 'दादालोरा खिडकी'च्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगार मेळावे आयोजित करून मोठ्या प्रमाणावर युवक-युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्यात आले. यात सुरक्षा रक्षक, नर्सिंग असिस्टंट, हॉस्पिटॅलिटी, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिशियन, प्लंबिंग, वेल्डिंग, जनरल ड्युटी असिस्टंट, फील्ड ऑफिसर, व्हीएलई, सेल्समन, वेब डेव्हलपर इ. विविध रोजगार व स्वयंरोजगार क्षेत्रांचा समावेश आहे.**

या रोजगार मेळाव्याच्या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व उपविभागीय अधिकारी सर्व पोलीस स्टेशन्स/ उप पोलीस स्टेशन्स/ पोलीस मदत केंद्रचे प्रभारी अधिकारी, नागरी कृती शाखेचे प्रभारी अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत शेळके व पोलीस अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले.

## सी-६० सेवा पदक प्राप्त अधिकारी व अंमलदारांचा मा. राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री गडचिरोली जिल्हा, ॲड. श्री. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रदान करून गौरव

गडचिरोली पोलीस दलाच्या विशेष अभियान पथक– सी–६०– ने गेल्या तीन दशकांहून अधिक काळ माओवादाच्या विरोधातील लढ्यात उल्लेखनीय तसेच शौर्यपूर्ण कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या कामगिरीने गडचिरोली जिल्ह्याला माओवादमुक्त करण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या ऐतिहासिक मोहिमेत मोलाचे योगदान दिले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातून गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर या भागावर माओवादी विचारसरणीचा प्रभाव वाढत गेला. सन १९८० नंतर माओवादी चळवळ अधिक हिंसक होत गेली. निष्पाप नागरिकांची हत्या, जाळपोळ, भूसुरुंग स्फोट, तसेच सुरक्षा दलांवर हल्ले अशा विविध विध्वंसक कारवायांमध्ये मोठी वाढ झाली.

माओवादी कारवायांना प्रभावी प्रत्युत्तर देण्यासाठी तत्का. पोलीस



अधीक्षक श्री. के. पी. रघुवंशी यांच्या दूरदृष्टीतून दि. ०१ डिसेंबर १९९० या दिवशी ६० पोलीस अंमलदारांना विशेष कमांडो प्रशिक्षण देऊन एका वेगळ्या माओवादविरोधी पथकाची स्थापना करण्यात आली. या पथकाचे सी–६० असे नामकरण करण्यात आले. स्थापनेपासून आजपर्यंत सी–६० पथकाने सातत्यपूर्ण धाडसी कारवाया करून माओवादी संघटनांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात कमी करण्यात यश संपादन केले आहे.

सन १९९० ते २०२५ या कालावधीत सी–६० पथकाने माओवादविरोधी अभियानात प्रभावी कामगिरी बजावत गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळीला जवळपास नष्ट करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. सध्या गडचिरोली येथे १५ व प्राणहिता येथे १४ अशी एकूण २९ विशेष अभियान पथके कार्यरत आहेत. सी–६० जवानांच्या शौर्यपूर्ण कारावायांमुळे आजपर्यंत एकूण ३५३ माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले असून, ४२४ माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच ८१४ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

**सी-६० जवानांचे धाडस, अचूक नियोजन आणि शौर्य यामुळे माओवादी संघटनांच्या कारवायांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य झाले. या जवानांच्या शौर्यपूर्ण कामगिरीमुळे मा. केंद्रीय गृहमंत्री श्री. अमित शाह यांनी जाहीर केलेले ३१ मार्च २०२६ पर्यंत माओवाद संपुष्टात आणण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यास मोठी मदत झाली आहे.**

सी–६० जवानांचे धाडस, अचूक नियोजन आणि शौर्य यामुळे माओवादी संघटनांच्या कारवायांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य झाले. या जवानांच्या शौर्यपूर्ण कामगिरीमुळे मा. केंद्रीय गृहमंत्री श्री. अमित शाह यांनी जाहीर केलेले ३१ मार्च २०२६ पर्यंत माओवाद संपुष्टात आणण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यास मोठी मदत झाली आहे.

सी–६० पथकातील अधिकारी व जवानांनी दिलेल्या उल्लेखनीय सेवेचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२६ पासून प्रथमच सी–६० सेवा पदक प्रदान करण्यास मान्यता दिली असून मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सदर पदके जाहीर करण्यात आली आहेत. सी–६० पथकामध्ये सलग तीन वर्षे कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अंमलदारांना तसेच दोन वर्षे कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना हे पदक प्रदान करण्यात येणार आहे.

सन २०२५ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या एकूण ५०० सी–६० सेवा पदकांपैकी तब्बल ४२५ पदके गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्राप्त झाले आहेत व उर्वरित ७५ पदके ही गोंदिया जिल्ह्याकरिता मंजूर झाली आहेत. ही बाब गडचिरोली पोलीस दलासाठी अभिमानास्पद आहे.

दि.०१ मे २०२६ महाराष्ट्र दिनी पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे आयोजित कार्यक्रमामध्ये मा. वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा सहपालकमंत्री, गडचिरोली जिल्हा ॲड. श्री. आशीष जयस्वाल यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी गडचिरोली श्री. अविश्यांत पंडा यांच्या उपस्थितीत सी-६० सेवा पदक प्राप्त पाच पोलीस अधिकारी व अंमलदारांचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून गौरवण्यात आले.

## गडचिरोली पोलीस दलातील १४५ पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना मा. पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह प्रदान

महाराष्ट्र पोलीस दल हे भारतातील अत्यंत शिस्तबद्ध, जनतेच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असलेले पोलीस दल म्हणून ओळखले जाते. कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे प्रतिबंध करणे, नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे तसेच सामाजिक शांतता टिकवून ठेवणे ही राज्य पोलीस दलाची प्रमुख जबाबदारी आहे. दहशतवादविरोधी कारवाया, माओवादविरोधी अभियान, सायबर गुन्हे नियंत्रण, महिला व बाल सुरक्षा, वाहतूक नियंत्रण तसेच आपत्ती व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत महाराष्ट्र पोलीस दलाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांनी कर्तव्य बजावताना केलेल्या उत्कृष्ट, धाडसी, शौर्यपूर्ण व उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यासाठी सन १९९२



पासून 'पोलीस महासंचालक पदक' प्रदान करण्यात येत आहे. हे पदक महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या वतीने दरवर्षी एप्रिल महिन्यात जाहीर करण्यात येते. 'पोलीस महासंचालक पदक' प्रदान करताना पोलीस दलातील विविध विशेष मोहिमा, दहशतवादविरोधी कारवाया, माओवादविरोधी अभियान, उत्कृष्ट सेवा, शौर्य, विशेष कामगिरी, गुन्हे उकल, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच जनहिताच्या कार्यांमध्ये मोलाचे योगदान याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदारांचा गौरव करण्यात येतो.

'पोलीस महासंचालक पदक' हे सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र या स्वरूपात प्रदान करण्यात येते. या पदकामुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे मनोबल उंचावण्यास मदत होते. तसेच इतर अधिकारी व अंमलदारांना उत्कृष्ट कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळते.

सन २०२५ या वर्षात माओवादविरोधी अभियान, नागरी कृती उपक्रम, गुन्हे उकल, कायदा व सुव्यवस्था राखून जनहिताच्या कार्यामध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल गडचिरोली पोलीस दलातील १४५ पोलीस अधिकारी व अंमलदारांना मा. पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह महाराष्ट्रदिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर करण्यात आले. पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे १ मे रोजी आयोजित महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमामध्ये मा. वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा सहपालकमंत्री, गडचिरोली जिल्हा ॲड. श्री. आशीष जयस्वाल यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी गडचिरोली श्री. अविश्यांत पंडा व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मा. पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्राप्त पाच अधिकारी व अंमलदारांचा प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

**महाराष्ट्र पोलीस दलाच्या इतिहासात गडचिरोली पोलीस दल हे सर्वाधिक पोलीस महासंचालक पदक प्राप्त करणारे जिल्हा पोलीस दल ठरले असून सन १९९९ ते २०२५ या कालावधीत गडचिरोली जिल्ह्यात कर्तव्य बजावणाऱ्या एकूण १५१० पोलीस अधिकारी व अंमलदारांना 'पोलीस महासंचालक पदक' प्राप्त झाले आहे.**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या इतिहासात गडचिरोली पोलीस दल हे सर्वाधिक पोलीस महासंचालक पदक प्राप्त करणारे जिल्हा पोलीस दल ठरले असून सन १९९९ ते २०२५ या कालावधीत गडचिरोली जिल्ह्यात कर्तव्य बजावणाऱ्या एकूण १५१० पोलीस अधिकारी व अंमलदारांना 'पोलीस महासंचालक पदक' प्राप्त झाले आहे. गडचिरोली पोलीस दलाच्या या उल्लेखनीय कार्यामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामध्ये गडचिरोली जिल्ह्याचा गौरव वाढला असून, गडचिरोली पोलीस दलाच्या शौर्य व त्यागाची उज्ज्वल परंपरा अधिक दृढ झाली आहे.

सदर कार्यक्रमाप्रसंगी मा. वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा सहपालकमंत्री गडचिरोली जिल्हा ॲड. श्री. आशिष जयस्वाल, जिल्हाधिकारी, गडचिरोली श्री. अविश्यांत पंडा, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी., सहा. पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. अनिकेत हिरडे व इतर अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जनसंपर्क कार्यालयाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रतिक भदाणे व अंमलदार यांनी विशेष परिश्रम घेतले. ■



एस वाय संदे
छत्रपती संभाजीनगर

# एमपीएससी
# अधिकारी बनण्याचा राजमार्ग




अधिकारी व्हायचे स्वप्न अनेक विद्यार्थ्यांचे असते. पण फक्त स्वप्न पाहून चालत नाही, योग्य दिशा आणि अचूक माहिती असणेही तितकेच आवश्यक असते. अनेक विद्यार्थी अभ्यास सुरू करतात, पण एमपीएससी म्हणजे काय त्याची रचना कशी असते, पात्रता काय आहे हे नीट समजून घेत नाहीत. त्यामुळे तयारी करताना गोंधळ निर्माण होतो. तंत्रज्ञान व समाजमाध्यमांच्या वापराच्या युगात वावरत असताना स्पर्धापरीक्षा देणारा विद्यार्थी मात्र गोंधळलेला दिसतो. ग्रामीण भागातील एखादा विद्यार्थी अधिकारी झाल्याची रिल्स किंवा पोस्ट समाजमाध्यमावर पाहिल्यानंतर हजारो विद्यार्थी भावनेच्या भरात स्पर्धापरीक्षेची कास धरताना आपण बघतो. पण स्वतःला अधिकारी का बनायचे आहे? हा प्रश्न विद्यार्थ्यांनी स्वतःला विचारणे गरजेचे आहे. स्पर्धेच्या या युगात योग्य नियोजन, अंगी बाणवलेली शिस्त आणि सातत्य या गुणांच्या जोरावर आपण कोणतीही स्पर्धापरीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो हा विश्वास असणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही महाराष्ट्र राज्य सरकारची एक संविधानिक संस्था आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३१५ नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यातील विविध प्रशासकीय पदासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्याचे काम महाराष्ट्र लोकसेवा आयोग करतो. महाराष्ट्रात अधिकारी होण्यासाठी एम पीएससी ही सर्वात महत्त्वाची परीक्षा मानली जाते. बारावी ते ग्रॅज्युएशन यादरम्यान या परीक्षांची तयारी सुरू

करता येते.

एमपीएससीतर्फे दरवर्षी वर्ग एक (उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस उपअधीक्षक, मुख्याधिकारी नगरपालिका इत्यादी) वर्ग २ जसे नायब तहसीलदार, मुख्याधिकारी गट ब, गटविकास अधिकारी यांसारख्या पदांची भरती करण्यात येते. याशिवाय संयुक्त गट ब जसे की पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक आणि असिस्टंट सेक्शन ऑफिसर यांसारख्या पदांची तर संयुक्त गट क परीक्षांतर्गत कर सहाय्यक आणि क्लर्क यांसारख्या पदांची भरती होत असते. पदांच्या संवर्गानुसार परीक्षेचे स्वरूपदेखील वेगळे आहे, हे इथे लक्षात घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील विविध विभागांतर्गत या पदांची भरती केली जाते. प्रत्येक वर्षी रिक्त जागांच्या मागणीप्रमाणे एमपीएससीकडून त्या पदासाठी जाहिरात प्रकाशित करण्यात येते. पूर्वपरीक्षेचे नियोजन प्रत्येक जिल्ह्यात तर मुख्य परीक्षा राज्यातील काही ठरावीक केंद्रांवर आयोजित केली जाते. ज्या पदासाठी मुलाखतीचा टप्पा आहे अशा पदासाठी मुलाखतीचे आयोजन एमपीएससीच्या नवी मुंबई येथील कार्यालयात केले जाते. कोणत्याही शाखेतून पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी या परीक्षेसाठी अर्ज करण्यास पात्र ठरतो. काही इतर अटीदेखील असतात, जसे काही गट क मधील भरतीसाठी टायपिंग स्कील प्रमाणपत्राची आवश्यकता असते.

आयोग राज्यसेवा आयोग परीक्षा, वनसेवा परीक्षा, कृषी सेवा परीक्षा, अभियांत्रिकी सेवा परीक्षा तसेच इतर अनेक तांत्रिक व अतांत्रिक परीक्षांचे आयोजन करतो. या परीक्षा साधारणपणे तीन टप्प्यांमध्ये घेतल्या जातात. पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा आणि व्यक्तिमत्त्व चाचणी (मुलाखत)

महाराष्ट्र शासनाचे कामकाज सुरळीत व प्रभावीपणे चालण्यासाठी

आयोग राज्यसेवा आयोग परीक्षा, वनसेवा परीक्षा, कृषी सेवा परीक्षा, अभियांत्रिकी सेवा परीक्षा तसेच इतर अनेक तांत्रिक व अतांत्रिक परीक्षांचे आयोजन करतो. या परीक्षा साधारणपणे तीन टप्प्यांमध्ये घेतल्या जातात. पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा आणि व्यक्तिमत्त्व चाचणी (मुलाखत)

योग्य, पात्र आणि गुणवत्तापूर्ण उमेदवारांची निवड करून त्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही आयोगाची एक महत्त्वाची जबाबदारी आहे. १२ वी नंतर आणि पदवीच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षांची तयारी करण्यासाठी योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण अभ्यास आवश्यक असतो. बारावी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी कोणत्याही शाखेची पदवी निवडू शकतो, कारण आयोगाच्या नियमानुसार कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी किंवा इतर कोणत्याही शाखेचा पदवीधर उमेदवार राज्यसेवा परीक्षा देण्यासाठी पात्र असतो. त्यामुळे शाखा निवडताना केवळ स्पर्धापरीक्षेचा विचार न करता स्वतःच्या आवडी, क्षमता आणि भविष्यातील पर्याय लक्षात घेणे अधिक योग्य ठरते. पदवीच्या काळात अभ्यासक्रमाचे सखोल अध्ययन करणे, इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या मूलभूत पुस्तकांचा अभ्यास करणे आणि चालू घडामोडींवर नियमित लक्ष ठेवणे



आवश्यक असते. तसेच मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा सराव केल्यास प्रश्नांची पद्धत आणि महत्त्वाचे विषय समजण्यास मदत होते. वेळेचे योग्य नियोजन करून नियमित अभ्यास, पुनरावृत्ती आणि लेखन सराव यांना प्राधान्य दिल्यास तयारी अधिक प्रभावी होते.

याच्याचबरोबरीने व्यक्तिमत्त्व विकासावरही भर देणे आवश्यक आहे. आत्मविश्वास, संवादकौशल्य, तर्कशक्ती आणि सामाजिक भान या गुणांचा विकास विद्यार्थ्याने पदवी शिक्षणासोबतच करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पदवी पूर्ण होईपर्यंत उमेदवार राज्यसेवा परीक्षेसाठी सक्षमपणे तयार होऊ शकतो.

## एमपीएससी: परीक्षेची संपूर्ण रचना आणि यशाचा मार्ग

राज्याच्या सुशासनासाठी सक्षम, प्रामाणिक आणि कार्यक्षम अधिकाऱ्यांची निवड करणे ही कोणत्याही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत गरज आहे. ही जबाबदारी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) पार पाडतो. राज्य शासनाच्या विविध गट–अ व गट–ब पदांसाठी गुणवत्ताधारित व पारदर्शक पद्धतीने उमेदवारांची निवड करण्यासाठी एमपीएससी राज्यसेवा परीक्षा आयोजित केली जाते. ही परीक्षा केवळ ज्ञानाचीच नव्हे, तर विश्लेषणशक्ती, व्यक्तिमत्त्व आणि निर्णयक्षमतेचीही कसोटी पाहणारी स्पर्धात्मक प्रक्रिया आहे. त्यामुळे राज्यसेवा परीक्षेचे स्वरूप समजून घेणे प्रत्येक स्पर्धकासाठी अत्यंत आवश्यक ठरते.

> एमपीएससी राज्यसेवा ही परीक्षा केवळ ज्ञानाचीच नव्हे, तर विश्लेषणशक्ती, व्यक्तिमत्त्व आणि निर्णयक्षमतेचीही कसोटी पाहणारी स्पर्धात्मक प्रक्रिया आहे. त्यामुळे राज्यसेवा परीक्षेचे स्वरूप समजून घेणे प्रत्येक स्पर्धकासाठी अत्यंत आवश्यक ठरते.

## राज्यसेवा परीक्षेचा पहिला टप्पा:

राज्यसेवा परीक्षेचा पहिला टप्पा म्हणजे पूर्व परीक्षा (Preliminary Examination) होय. ही परीक्षा स्पर्धेतील प्राथमिक छननी (Screening Test) म्हणून घेतली जाते. तिचा मुख्य उद्देश मोठ्या संख्येतील उमेदवारांमधून मुख्य परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची निवड करणे हा असतो. ही परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित केली जाते. प्रत्येक जिल्ह्यात या परीक्षेचे केंद्र असते. विद्यार्थी आपल्या जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन ही परीक्षा देऊ शकतो.

### पूर्व परीक्षेचे स्वरूप:

पूर्व परीक्षा वस्तुनिष्ठ (Multiple Choice Questions – MCQ) पद्धतीची असते. यात दोन पेपर असतात:

सामान्य अध्ययन (GS) – पेपर १

इतिहास (विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास)

भूगोल

पर्यावरण

भारतीय राज्यघटना व राजव्यवस्था

अर्थव्यवस्था

विज्ञान व तंत्रज्ञान

चालू घडामोडी

या पेपरचे गुण गुणवत्ता यादीसाठी महत्त्वाचे असतात.

CSAT – पेपर २ (Civil Services Aptitude Test)

गणितीय क्षमता

तार्किक विचारशक्ती

आकलन क्षमता (Comprehension)

निर्णयक्षमता

हा पेपर पात्रता स्वरूपाचा असतो (किमान गुण मिळवणे आवश्यक).

हा अभ्यासक्रम फक्त पूर्व परीक्षेकरीता नसून तो मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमाचाच एक भाग असतो. एकात्मिक स्वरूपाचा

हा अभ्यासक्रम आहे. बरेच विद्यार्थी पूर्व आणि मुख्यचा अभ्यासक्रम आणि तयारी वेगळी असल्याचा गैरसमज करून घेतात. त्यामुळे नवीन विद्यार्थ्यांनी मुख्यपरीक्षेचा अभ्यास अगोदर करणे फायद्याचे ठरते.

## राज्यसेवेचा दुसरा टप्पा:

मुख्य परीक्षा ही वर्णनात्मक (Descriptive) पद्धतीची असते. पूर्व परीक्षेप्रमाणे वस्तुनिष्ठ प्रश्न नसून येथे उमेदवाराने सविस्तर आणि विश्लेषणात्मक उत्तर लिहावे लागते. त्यामुळे लेखनकौशल्य, मांडणी, तर्कशक्ती आणि विषयाचे सखोल ज्ञान यांची कसोटी लागते.

यात सामान्य अध्ययनचे एकूण चार पेपर असतात. सामान्य अध्ययन पेपर एक मध्ये इतिहास आणि भूगोल यांचा अभ्यासक्रम असतो. सामान्य अध्ययन पेपर दोन हा राजकीय व्यवस्था आणि प्रशासन यांवर आधारित असतो. सामान्य अध्ययन पेपर तीन हा अर्थशास्त्र आणि कृषी घटकावर आधारित असतो. पेपर चार हा नीतिशास्त्र या विषयाचा आहे. प्रत्येकी २५० मार्कांचे चार पेपर असतात. निबंधाचा स्वतंत्र पेपर २५० मार्कांचा असतो. वैकल्पिक विषयावरती एकूण ५०० मार्कांसाठी भाग एक आणि भाग दोन पेपर असतात. वैकल्पिक विषय आपल्या आवडीनुसार घ्यायची मुभा विद्यार्थ्यांना असते.

मराठी आणि इंग्रजी या विषयाचे पेपर केवळ पात्रता स्वरूपाचे असतात. ज्यात विद्यार्थ्यांना २५% अथवा ७५ मार्क्स मिळवणे अनिवार्य असते. महाराष्ट्राविषयी विशेष संदर्भासहित वाचन आवश्यक आहे.

## तिसरा आणि अंतिम टप्पा:

राज्यसेवा परीक्षेचा तिसरा आणि अंतिम टप्पा म्हणजे मुलाखत (Interview / Personality Test) होय. हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असतो, कारण उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण आढावा या माध्यमातून घेतला जातो. ही मुलाखत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) आयोजित करतो.

> पूर्व परीक्षेप्रमाणे वस्तुनिष्ठ प्रश्न नसून येथे उमेदवाराने सविस्तर आणि विश्लेषणात्मक उत्तर लिहावे लागते. त्यामुळे लेखनकौशल्य, मांडणी, तर्कशक्ती आणि विषयाचे सखोल ज्ञान यांची कसोटी लागते. यात सामान्य अध्ययनचे एकूण चार पेपर असतात. सामान्य अध्ययन पेपर एक मध्ये इतिहास आणि भूगोल यांचा अभ्यासक्रम असतो.

### मुलाखतीचे स्वरूप:

मुलाखत ही केवळ प्रश्नोत्तरांची प्रक्रिया नसून ती व्यक्तिमत्त्व चाचणी असते. उमेदवाराचे शैक्षणिक ज्ञान, चालू घडामोडींची जाण, सामाजिक व प्रशासकीय दृष्टिकोन, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि निर्णयक्षमता यांचे मूल्यमापन केले जाते.

मुलाखतीदरम्यान तज्ज्ञ मंडळ (Board) उमेदवाराशी विविध विषयांवर चर्चा करते. प्रश्न हे पुढील बाबींवर आधारित असू शकतात:

शैक्षणिक पार्श्वभूमी, कामाचा अनुभव (असल्यास), चालू घडामोडी, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सामाजिक-आर्थिक प्रश्न, वैयक्तिक छंद व आवडी, वैकल्पिक विषयांबाबत माहिती

मुलाखतीत यश मिळवण्यासाठी आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, स्पष्ट व सुसंगत मांडणी आणि सकारात्मक दृष्टिकोन अत्यंत आवश्यक असतो. हा टप्पा उमेदवाराच्या ज्ञानाबरोबरच त्याच्या व्यक्तिमत्त्वातील नेतृत्वगुण आणि सार्वजनिक सेवेसाठीची तयारी अधोरेखित करतो.

# छायाचित्र दालन

मार्च २०२६ करिता गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न व सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी या बक्षिसांकरिता खालील गुन्हेतपासांची निवड करण्यात आली. या गुन्हेतपासाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा राज्याचे पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न या बक्षिसासाठी नागपूर घटकातील सदर पोलीस स्टेशन गु. रजि. क्रमांक २९/२०२६ ची निवड करण्यात आली. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि राजाभाऊ जाधव आणि सचिन भोंडे, व पोलीस अंमलदार रवी अहिर यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी बक्षीस हे जालना घटकातील बदनापूर पोलीस स्टेशन गु. रजि. नंबर ४४५/२०२२ या गुन्ह्याला जाहीर झाले असून सपोनि निशा बनसोड, व पोलीस अंमलदार दिगंबर चौरे, सूर्यकांत डोईफोडे, जावेद शेख व मंदा बनसोडे यांना गौरविण्यात आले. **सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी जून महिन्याच्या सदर अंकात पृष्ठ क्रमांक ६४ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.** ■















सुरेश वांदिले
मुंबई

# नवा काळ, नवीन संधी

**आताचे युग कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे त्यामुळे अनेक पालकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये करिअर विषयक संभ्रम निर्माण होताना दिसतो परंतु कृत्रिम प्रज्ञा हे क्षेत्र नोकरी घालवणारे नक्कीच नाही तर स्वत:मध्ये योग्य तो बदल घडवून करिअरसाठी सिद्ध करणाऱ्या प्रत्येकाला संधी देणारे आहे. अशाच काही अनोख्या करिअर संधींची ओळख करून देणारा लेख.**




सध्या, कोणत्या क्षेत्रात करिअरच्या चांगल्या संधी मिळू शकतात? हा ठरावीक प्रश्न विचारला जातो. तसे तर प्रत्येकच क्षेत्रासाठी प्रशिक्षित आणि कौशल्ययुक्त मनुष्यबळाची गरज भासते. मात्र तंत्रज्ञानवाढीचा वेग इतका विस्मयकारक आहे, की या वर्षी ज्या क्षेत्रात चांगल्या संधी उपलब्ध आहेत, त्या तशाच पुढच्या वर्षीही राहतीलच असे ठामपणे सांगता येत नाही. सध्याचे काही प्रवाह लक्षात घेता, पुढील क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करायला हरकत नाही.

अनेक तज्ज्ञांच्या मते एआय, ऑटोमेशन, पर्यावरणीय बदलाशी संबंधित तंत्रज्ञान, अवकाश तंत्रज्ञान, जैवअभियांत्रिकी या क्षेत्रांमध्ये प्रारंभीच्या बऱ्याच संधी मिळू शकतात. एआय, मशिन लर्निंग आणि डेटा सायन्स या क्षेत्रांसाठी भारतातून सर्वाधिक मनुष्यबळ जगभरात पुरवले जाऊ शकते, असाही काही तज्ज्ञांचा कयास आहे. एआय आणि मशिन लर्निंगच्या जोडीला २०३० पर्यंत क्वांटम कॉम्प्युटिंग या क्षेत्राचीही चलती असेल. क्वांटम कॉम्प्युटिंग ही क्वांटम मेकॅनिक्सच्या नियमांवर आधारित संगणन पद्धती आहे, ज्यात माहिती 'क्यूबिट्स'मध्ये साठवली जाते. ती एकाच वेळी अनेक प्रकारांमध्ये असू शकते. त्यामुळे पारंपरिक संगणकांपेक्षा काही विशिष्ट गणना अतिशय वेगाने करता येतात. पारंपरिक संगणकात बिट्स ० किंवा १ असतात, पण क्यूबिट्स प्रकारात बिट्स एकाच वेळी ० आणि १ दोन्ही अवस्थेत असू शकतात. याला सुपरपोझिशन म्हणतात.

भारत सरकारने राष्ट्रीय क्वांटम मिशन सुरू केले आहे. याद्वारे क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासावर भर दिला जाईल. यामुळे भविष्यातील संगणन, सुरक्षा, औद्योगिक संशोधन आणि वैज्ञानिक प्रयोगांमध्ये भारताला मोठा फायदा होऊ शकतो. पारंपरिक संगणकांना अशक्य वाटणाऱ्या औषधींचे शोध, एन्क्रिप्शन मोडणे, आणि जटिल सिम्युलेशन अशा गोष्टी क्वांटम संगणक काही सेकंदांत सोडवू शकतात. तंत्रज्ञानाच्या या वेगामुळे सध्या अस्तित्वात नसलेल्या नव्या करिअर संधी निर्माण होतील. काही करिअर हे सध्या अस्तित्वात असलेल्या करिअरचे स्मार्ट रूप असेल. मात्र प्रत्येक नवे करिअर हे उच्च तंत्रकौशल्याचे असेल.

### (१) तंत्रज्ञान

'ओपन एआय'चे मुख्य

> **राष्ट्रीय क्वांटम मिशनद्वारे क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासावर भर दिला जाईल. यामुळे भविष्यातील संगणन, सुरक्षा, औद्योगिक संशोधन आणि वैज्ञानिक प्रयोगांमध्ये भारताला मोठा फायदा होऊ शकतो.**

कार्यकारी अधिकारी सॅम अल्टमन यांच्या मते, सध्या काही संस्थांमध्ये ५० टक्के कोडिंग एआयमार्फत केले जाते. काही तज्ज्ञांच्या मते, पुन्हापुन्हा करावे लागणारे ९० टक्के कोडिंग एआय मार्फतच केले जाईल. तंत्रकुशलता आणि कार्यान्वयन यामध्ये एआयमुळे आमूलाग्र बदल होईल. असे असले तरी या क्षेत्रातील बहुतेक सर्वच तज्ज्ञांच्या मते, हा सर्वव्यापी 'एआय' नव्या वैशिष्ट्यपूर्ण रोजगार संधीही निर्माण करेल. त्यामुळे लवचिक आणि नवा बदल तत्काळ स्वीकारून नवे कौशल्य लगेच आत्मसात करणाऱ्या मनुष्यबळास कोणताही धोका राहणार नाही. नव्या एआय तंत्रज्ञानामुळे चीफ एआय ऑफिसर, डेटा एथिक्स स्पेशालिस्ट, एआय-पॉवर्ड सायबर सिक्युरिटी एक्स्पर्ट, डिजिटल मार्केटिंग एक्स्पर्ट, मशिन लर्निंग इंजिनीअर, अल्गोरिदमिक अकाउंटेबिलिटी मॅनेजर अशा नव्या रोजगार संधी आता निर्माण होऊ घातल्या आहेत. उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन तंत्रकौशल्य प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना या संधी मिळणे सोपे जाऊ शकते.

### (२) फास्ट मुव्हिंग कंझ्युमर गुड्स (FMCG)

दैनंदिन खाद्यपदार्थांची गुणवत्ता आणि दर्जा वाढवण्यासाठी आता जगातील अनेक मोठ्या खाद्य उत्पादन कंपन्या एआयचा वापर प्राधान्याने करत आहेत. अमेरिकेतील क्राफ्ट हेंज बहुराष्ट्रीय खाद्यपदार्थ कंपनी एआयचा वापर करून उत्पादन, नवकल्पना, मार्केटिंग आणि पुरवठा साखळी अधिक कार्यक्षम बनवत आहे. या कंपनीने 'टेस्ट मेकर' नावाचा एआय-प्लॅटफॉर्म विकसित केलेला आहे. यामुळे, उत्पादन कल्पना ते वैयक्तिक मार्केटिंग सामग्री तयार करण्यापर्यंतचा वेळ ८ आठवड्यांवरून फक्त ८ तासांवर आला आहे. यामुळे वेळेची ८० टक्के बचत झाली आहे. एआयच्या



साहाय्याने लोणच्यासाठी वापरण्यात येणारी काकडी, ही सुयोग्य लांबी, जाडी आणि घनता असलेलीच निवडण्यात आल्यामुळे या कंपनीचे उत्पादन १२ टक्क्यांनी वाढले. अन्नपदार्थ निर्मितीत असणाऱ्या जागतिक स्तरावरील बहुतेक मोठ्या कंपन्यांमध्ये आता ई कॉमर्स प्रणाली सोबतच ऑटोमेशन, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि रोबॉटिक्स या तंत्रांवर अधिकाधिक भर देण्यात येत आहे. सामान्य किंवा नियमित स्वरूपातील व्यापारापेक्षा अन्न पदार्थ व्यापारातील ई–कॉमर्सचा वापर तीन ते चार पटीने वाढण्याचा अंदाज या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.


या क्षेत्रामध्ये चॅनेल असॉर्टमेंट मॅनेजमेंट, की अकाउंट मॅनेजमेंट अशा नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. या क्षेत्रात येण्यासाठी डेटा सायन्स, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, सस्टेनेबल ॲण्ड ऑटोमेटेड मॅन्युफॅक्चरिंग, की अकाऊंट मॅनेजमेंट या कौशल्यांची गरज भासेल.

### (३) स्पेसटेक

या क्षेत्रात, एलॉन मस्क सारख्या खाजगी उद्योजकांनी आता हिरीरीने सहभाग घ्यायला सुरुवात केली आहे. भारताचे पृथ्वी निरीक्षण (अर्थ ऑब्झर्व्हेशन–इओ) क्षेत्र ढवळून निघाले आहे. ‘इओ’ माहिती प्रचंड प्रमाणावर मिळू लागली आहे. हवामान बदल, कृषी, पायाभूत सुविधा, आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांसाठी सरकार, खाजगी उद्योजक, इतर संस्था ही माहिती प्राप्त करून रीअल टाईम (त्याक्षणीची परिस्थिती) स्थिती जाणून घेऊ लागली आहेत.

**करिअर संधी-** रीमोट सेन्सिंग डेटा ॲनालिस्ट, एआय/मशिन लर्निंग एक्स्पर्ट, इओ स्पेशालिस्ट इंजिनीअर, जिओस्पेशिअल डेटा सायंटिस्ट, इओ प्लॅटफॉर्म क्लाउड इंजिनीअर, मिशन ऑपरेशन असोसिएट्स, सिंथेटिक डेटा इंजिनीअर, एज एआय डेव्हलपर्स, ऑटोनॉमस डेटा पाइपलाईन इंजिनीअर्स, जिओस्पेशिअल मॅनेजर्स, क्लायमेट एआय ॲनालिस्ट यांच्यासारख्या करिअर संधी निर्माण झाल्या आहेत.

या क्षेत्रात येण्यासाठी पायथॉन या संगणकीय भाषेवर प्रभुत्व मिळवावे लागेल. रॅस्टेरिओ आणि जीडीएएल (जिओस्पॅशिअल डेटा ॲबस्ट्रॅक्शन लायब्ररी) या तांत्रिक लायब्ररीचे ज्ञान हस्तगत



करावे लागेल. जीडीएएल ही या क्षेत्रातील सर्वात पायाभूत आणि शक्तिशाली ओपन सोर्स लायब्ररी आहे. रॅस्टेरिओ ही जीडीएएल वर आधारीत पायथॉन वापरकर्त्यांसाठी बनवलेली लायब्ररी आहे. गुगल अर्थ इंजिन, क्यूजीआयएस यांसारखी साधने वापरता येणे गरजेचे आहे.

## (४) ॲग्रिटेक

अमेरिकेतील केवळ १ टक्के लोकसंख्या कृषिक्षेत्राशी निगडित आहे. मात्र हे मनुष्यबळ १२० कोटी एकरांवर ड्रोन, मशिन लर्निंग, एआयच्या साहाय्याने शेतीविषयक असंख्य कामे सुलभतेने व जलदगतीने करतात. श्रमावर आधारीत शेती सोडून तेथे आता बुद्धी आणि तंत्रज्ञानावर आधारीत शेतीला प्राधान्य दिले जाते. यामुळे कमी मनुष्यबळात विक्रमी उत्पादन घेतले जाते. केवळ १% लोकसंख्या कृषी उत्पादन करत असूनही अमेरिका जगातील एक मोठा अन्न निर्यातदार देश बनला आहे. शेती हा आता तिथे उच्च–तंत्रज्ञान उद्योग बनला आहे. भारतातसुद्धा आता शेतीमध्ये एआयचा वापर सुरू झाला आहे. एआय आणि इंटरनेट ऑफ थिंग्जमुळे शेतमाल व्यवहार (बाजार), वित्त, संसाधने यांच्यात आमूलाग्र बदल घडून येत आहे.

**भविष्यातील संधी -** शेतीतील माहितीचे विश्लेषण, शेतमालाच्या उत्पादनात वाढ, पुरवठा साखळीचे प्रभावी व्यवस्थापन यासाठी ॲग्रि डेटा ॲनालिस्ट, शेतीतील इंटरनेट ऑफ थिंग्ज उपकरणे, सेन्सर, इतर उपकरणांची हाताळणी व देखभाल यांसाठी फील्ड टेक्निशिअन, शेतमालाचे किमान नुकसान होईल अशा रितीने 'शेती ते व्यापारपेठ' मालवाहतूक प्रभावी व जलदगतीने करण्यासाठीचे सप्लाय चेन कोऑर्डिनेटर (पुरवठा साखळी समन्वयक), पीक व्यवस्थापन, कीटक नियंत्रण आणि उत्पन्न वाढीसाठी एआय आणि मशिन

> **भारतातसुद्धा आता शेतीमध्ये एआयचा वापर सुरू झाला आहे. एआय आणि इंटरनेट ऑफ थिंग्जमुळे शेतमाल व्यवहार (बाजार), वित्त, संसाधने यांच्यात आमूलाग्र बदल घडून येत आहे.**

लर्निंगचा वापर करून भविष्यवेधी (प्रेडिक्टिव्ह) प्रारूप तयार करू शकणारे स्पेशालिस्ट, पर्यावरणपूरक शेती प्रक्रिया आणि पर्यावरणाचा प्रभाव कमी करण्याचा सल्ला देणारे ॲग्री फिनटेक सल्लागार.

**आवश्यक तंत्रकौशल्य-** डेटा सायन्स, एआय, मशिन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन ऑपरेशन, वित्त, विपणन, पुरवठा साखळीचे कौशल्य, शेतीतील आव्हाने, प्रक्रिया आणि पुरवठा साखळीचे व्यवस्थापन या विषयीची परिपूर्ण माहिती.

## (५) ई कॉमर्स

ई कॉमर्समुळे ग्राहकांना व्यक्तिगत स्वरूपाचा अनुभव ऑनलाईन पद्धतीने मिळणे शक्य झाले आहे. ग्राहकांना आता ई–कॉमर्स संबंधित प्लॅटफॉर्म्स त्यांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन खरेदीसाठी सूचना करायला लागले आहेत. वस्तूंचे वितरण अधिक वेगाने व्हायला लागले आहे. ऑनलाईन व्यवहारांची सुरक्षितता वाढली आहे. एआय साधनांचा अधिकाधिक वापर सुरू झाला आहे. त्यामुळे या संदर्भातील कौशल्य आणि तंत्र अवगत केलेल्या मनुष्यबळास उत्तमोत्तम संधी मिळू लागल्या आहेत.

## (६) बँकिंग आणि फिनटेक

भविष्यातील बँकिंग हे डिजिटल सेवा केंद्र असेल. यापुढे बँकांना व्यक्तिगत स्वरूपाच्या सेवा प्रभावीरित्या द्याव्या लागतील. उदाहरणार्थ, एखाद्या ग्राहकाच्या खर्चाच्या सवयीवरून त्याला गुंतवणुकीचा सल्ला देणारी एआय यंत्रणा. यामुळे बँकिंगमध्ये तंत्रज्ञानासोबत संवाद समन्वय साधणाऱ्या प्रॉडक्ट मॅनेजर्सची मागणी प्रचंड वाढेल.

**भविष्यातील संधी -** डिजिटल इकोसिस्टम आर्किटेक्ट: बँकेच्या विविध डिजिटल सेवा (ॲप वॉलेट, युपीआय) एकमेकांशी सुरक्षितपणे जोडणारे तज्ज्ञ, सायबर रिस्क आणि फ्रॉड ॲनालिस्ट: एआयच्या मदतीने

होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला रोखण्यासाठी डिजिटल सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे तज्ज्ञ, नियो बँकिंग एक्स्पर्ट: भौतिक शाखा नसलेल्या, केवळ मोबाईलवर चालणाऱ्या बँकांमधील विविध तांत्रिक पदे, डेटा सायंटिस्ट: बँकेत जमा होणाऱ्या बिग डेटाचे विश्लेषण करून नवीन योजना सुचवणारे तज्ज्ञ.

**आवश्यक तंत्रकौशल्ये**– भविष्यवेधी विश्लेषण: ग्राहकांच्या भविष्यातील आर्थिक गरजा ओळखण्यासाठी प्रेडिक्टिव्ह मॉडेलिंगचा वापर करणे, ब्लॉकचेन आणि एपीआय: सुरक्षित व्यवहार आणि इतर वित्तीय संस्थांशी देवाणघेवाण करण्याची तांत्रिक जाण, एआय मार्केटिंग व चॅटबॉट्स: ऑटोमेशन प्लॅटफॉर्मद्वारे ग्राहकांशी प्रभावी संवाद साधण्याचे तंत्र, डिझाइन थिंकिंग: बँकिंग सेवा अधिक सोपी आणि ग्राहकस्नेही कशी बनवता येईल याचा सर्जनशील विचार करण्याचे कौशल्य, नियामक साक्षरता: बँकिंग क्षेत्रातील नियमांची सखोल माहिती. (उदा. आरबीआयचे नियम, डेटा प्रायव्हसी कायदा), सहकार्य आणि समन्वयक वृत्ती: तांत्रिक टीम आणि प्रत्यक्ष बँकिंग करणाऱ्यांमध्ये समन्वय साधून काम करण्याची वृत्ती.


## (७) मॅन्युफॅक्चरिंग

कारखान्यातील शॉप फ्लोअर (यंत्रे, कच्चा माल आणि कामगार एकत्र येऊन प्रत्यक्ष काम करण्याची जागा) वरील सर्व कामे करण्यासाठी टेस्ला कंपनीने 'ऑप्टिमस' या ह्युमोनाईडची निर्मिती केली आहे. तो मानवासारखा चालतो, वस्तू हाताळतो, उत्पादन प्रक्रियेत थेट सामीलही होतो. यामुळे उत्पादनक्षमतेत वाढ होऊन खर्च कमी होईल. कामगारांचे पुनःप्रशिक्षण कमी होईल.

रोबॉटिक्स, एआय आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज यांचा अधिकाधिक वापर निर्मिती/उत्पादन क्षेत्रात करण्याकडे आज उद्योजकांचा कल दिसून येतो. त्यामुळे या क्षेत्रांचे झपाट्याने डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन (रूपांतरण) होताना दिसत आहे. भविष्यवेधी देखभाल/दुरुस्ती यंत्रणा, तत्क्षणी माहितीचे संनियंत्रण, स्वयंचलन यंत्रणा यावर अधिकाधिक गुंतवणूक केली जात असून भविष्यात वेळ आणि संसाधनांची किमान हानी व्हावी किंवा अजिबातच होऊ नये यासाठी दोषविरहित उत्पादनांच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित केले जाईल.

**करिअर संधी-** इंडस्ट्रिअल ऑटोमेशन, रोबॉटिक्स आणि स्मार्ट अभियांत्रिकी यांचे ज्ञान असणारे अभियंते आणि तंत्रज्ञ, पुरवठा साखळी माहिती विश्लेषक (सप्लाय चेन डेटा ॲनालिस्ट), डिमांड प्लॅनर्स, भविष्यवेधी विश्लेषक तज्ज्ञ, पुरवठा साखळी रणनीतिकार, एआय/मशिन लर्निंग प्रारूपाचे विकासक, रिन्युएबल एनर्जी सिस्टीम इंजिनिअर्स, सस्टेनेबिलिटी/एन्व्हायर्नमेंटल इंजिनीअर्स, वेस्ट मॅनेजमेंट ॲण्ड रीसायकलिंग स्पेशालिस्ट, एनर्जी एफिशियंसी ॲनालिस्ट

**आवश्यक कौशल्ये -** एआय, रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, इंडस्ट्रिअल कंट्रोल सिस्टीम,



क्लाऊड कॉम्प्युटिंग, एससीएडीए (सुपरव्हायजरी कंट्रोल ॲण्ड डेटा ॲक्विझिशन), डाटा ॲनॅलिटिक्स ॲण्ड व्हिज्युलायझेशन, सर्व प्रकारच्या तांत्रिक प्रारूपांना प्रशिक्षण देऊन कार्यान्वित करण्याची क्षमता.

## (८) औषधनिर्मिती

या क्षेत्रात प्रगत संगणकीय तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहे. त्यामुळे केवळ ९ महिन्यांमध्ये कोविडवरील लसीची निर्मिती शक्य झाली. एआय आणि मशिन लर्निंग तंत्रामुळे औषध निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर, माहिती (डेटा) वर आधारीत निर्णय घेणे सुलभ झाले आहे. भारत हा औषधनिर्माण क्षेत्रातील अग्रगण्य देश असल्याने संशोधन, उत्पादन, निर्यात या क्षेत्रांमधील विविध जागतिक कंपन्या भारताकडे आकर्षित झाल्या आहेत. त्यामुळे उच्च तांत्रिक कौशल्य मिळवलेल्या उमेदवारांसाठी करिअरच्या नव्या संधी निर्माण होत आहेत.



**करिअर संधी-** एआय आणि मशिन लर्निंग तंत्रज्ञानाने युक्त डेटा सायंटिस्ट, ॲनॅलिटिक्स एक्स्पर्ट, विशेष तांत्रिक बाबींचे ज्ञान असणारे तज्ज्ञ, डिजिटल आरोग्य आणि व्यक्तिगत स्वरूपाच्या औषधांसाठी आवश्यक नियामके आणि नियमांची माहिती असलेले माहितगार.

**आवश्यक कौशल्ये-** बायोइन्फर्मेटिक्स, जिनॉमिक्स, फार्मास्युटिकल सायन्स, डिजिटल लिटरसी, डिजिटल मार्केटिंग, क्लाऊड कॉम्प्युटिंग, स्टॅटिस्टिकल मॉडेलिंग, मशिन लर्निंग, डेटा व्हिज्युअलायझेशन

> भारत हा औषधनिर्माण क्षेत्रातील अग्रगण्य देश असल्याने संशोधन, उत्पादन, निर्यात या क्षेत्रांमधील विविध जागतिक कंपन्या भारताकडे आकर्षित झाल्या आहेत.

## (९) एरोस्पेस इंजिनीअरिंग

हे क्षेत्र केवळ विमाने किंवा उपग्रह निर्मितीपुरते मर्यादित न राहता, आता प्रगत वाहतूक आणि संरक्षण क्षेत्राचा कणा बनले आहे. भारत आणि जागतिक स्तरावर खाजगी कंपन्यांच्या वाढत्या सहभागामुळे (उदा. स्पेस एक्स, अग्निकुल) या क्षेत्रात संशोधनाच्या प्रचंड संधी निर्माण होत आहेत. एआय आणि मशिन लर्निंगच्या मदतीने अधिक सुरक्षित आणि इंधनक्षम अशा नेक्स्ट–जनरेशन हवाई वाहनांची निर्मिती केली जाते. यामध्ये हायब्रीड इंजिन्स, ड्रोन तंत्रज्ञान आणि उपग्रह संप्रेषण प्रणालीचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे.

**करिअर संधी-** सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा ॲनॅलिटिक्स, व्हेईकल डिझाइन, इलेक्ट्रिक प्रोपल्शन सिस्टीम तज्ज्ञ, बॅटरी टेक्नॉलॉजी आणि व्हेइकल कनेक्टिव्हिटी तज्ज्ञ, सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ.

**आवश्यक कौशल्ये-** एआय आणि मशीन लर्निंग, डेटा ॲनॅलिटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, फ्लुइड डायनॅमिक्स आणि मटेरिअल सायन्स ■



बच्चनसिंह
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट
क्र. ४, नागपूर

# राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर येथील टीमची SBL Energy Ltd. Industrial Explosives Manufacturer येथे झालेल्या विध्वंसक स्फोटातील साहसपूर्ण कामगिरी




राज्यात उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींना सक्षमतेने तोंड देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने (NDRF) राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या धर्तीवर (SDRF) राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना २०१६ या वर्षी केली असून महाराष्ट्रातील नागपूर व धुळे येथे दोन तुकड्या निर्माण करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य हे आपत्तीप्रवण राज्य असून या राज्यास पूर, भूकंप, चक्रीवादळ तसेच दुष्काळ इत्यादी नैसर्गिक आपत्तींशी अनेकदा सामना करावा लागतो. अशा वेळी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर येथील बचावकर्त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी बचावकार्य करण्याकरिता तैनात करण्यात येते.

राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर या दलाने सन २०१६ पासून आजपावेतो राज्यामध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर व ग्राम स्तरावर ३५० पेक्षा जास्त प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करून एकूण ७० हजार पेक्षा जास्त नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षित केले आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर या दलाने सन २०१६ पासून आपत्ती व्यवस्थापनामध्ये जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर व ग्राम स्तरावर

नागपूर, वर्धा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, व परभणी, सातारा, रत्नागिरी व रायगड इ. ठिकाणी १७० पेक्षा जास्त शोध व बचाव मोहिमा राबवून आजपर्यंत २५,००० पेक्षा जास्त नागरिकांना पूर परिस्थितीतून बाहेर काढून सुरक्षित स्थळी पोहोचविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे पूरपरिस्थिती उद्‌भवल्यास स्वत:चे व इतरांचे जीव वाचविण्याकरीता अशा प्रकारच्या मान्सूनपूर्व प्रशिक्षणाचा पुरेपूर लाभ स्थानिक पातळीवरील आपदा मित्र व स्थानिक निवासी यांना मिळालेला आहे.

राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) हे महाराष्ट्र राज्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक आपत्तीला सक्षमरीत्या प्रतिसाद देण्यासाठी कायम तत्पर असते. ०१ मार्च २०२६ रोजी SBL Energy Ltd. Industrial Explosives Manufacturer मौजा येणेरवा, तालुका काटोल येथे घडलेल्या घटनेदरम्यान राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर येथील नियंत्रण कक्षाला आदेश प्राप्त होताच २४ तास तयार असलेली एक टीम (On Wheel Team) आवश्यक साहित्यासह कसल्याही प्रकारचा विलंब न करता सदरची परिस्थिती हाताळण्याकरिता तत्काळ रवाना करण्यात आली. राज्य आपत्ती प्रतिसाद दल नागपूर येथील समादेशक तथा नियंत्रक अधिकारी श्री. बच्चन सिंह व सहा. समादेशक



श्री. कृष्णा सोनटक्के यांचे मार्गदर्शन व नियंत्रणामध्ये सदर टीम क्रमांक १ मध्ये पोलीस उपनिरीक्षक सुनिल चव्हाण, ०३ पोलीस अधिकारी व २० रेस्क्युअर यांचा समावेश होता. घटनास्थळी अति शीघ्रतेने पोहोचून टीममधील पोलीस अधिकाऱ्यांनी तेथे हजर असलेले महसूल विभागाचे अधिकारी, तहसीलदार यांना राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची टीम आवश्यक सर्व साहित्यासह पोहोचल्याची माहिती दिली व ताबडतोब साहित्याचे लेआऊट लावून NDRF च्या पथकासह घटनास्थळाचे सूक्ष्म निरीक्षण केले. सदर ठिकाणी अतिशय मोठा स्फोट झाल्याने संपूर्ण इमारत उद्‌ध्वस्त झाली होती. सर्वत्र स्फोटके, वायर, डिटोनेटर इत्यादींचा सडा पडलेला होता. सदर ठिकाणी PESO चे वैज्ञानिक घटनास्थळी सुरक्षेसंबंधीच्या सूचना देत होते. त्यांच्या सूचनांच्या अधीन राहून घटनास्थळी NDRF, SDRF, अग्निशमन दल, जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त समन्वयाने शोध व बचाव ऑपरेशन सुरू करण्यात आले. सदरचा स्फोट जास्त तीव्रतेचा असल्याने शोध व बचाव कार्यात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये यासाठी मुख्यालयामधून पोलीस निरीक्षक गुरूदेव खोब्रागडे यांच्यासह बॅकअप पाठविण्यात आला. घटनेच्या ठिकाणी SDRF चमूने विस्फोटकाचा धोका असलेली स्थळे चिन्हित केली. कंपनीत उपस्थित असलेल्या इतर कामगारांना सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानंतर कुशल कामगारांमार्फत शिल्लक स्फोटके योग्य खबरदारी घेऊन तसेच आपल्या कौशल्याचा वापर करून सुरक्षित स्थळी हलविली. ज्यावेळी PESO च्या अधिकाऱ्यांनी परवानगी दिली, त्यावेळी सदर इमारतीत सुरक्षिततेची संपूर्ण खबरदारी घेऊन शोध आणि बचाव कार्य राबविण्यात आले. त्यावेळी इमारतीच्या संवेदनशील ठिकाणी मानवी शरीराचे अवयव, मांसाचे तुकडे, मानवी कवटी व इतर अवशेष दिसून आले. सदरचे अवशेष काळजीपूर्वक गोळा करून वैद्यकीय चमूंकडे पुढील कार्यवाहीकरिता सुपूर्द करण्यात आले. त्याचप्रमाणे



सिमेंट पिलर खाली दबून असलेल्या महिला कामगाराचा मृतदेह अतिशय दक्षतेने बाहेर काढला.

दिनांक ०१ मार्च २०२६ या दिवशी सकाळी ०८.२० वाजता झालेल्या घटनेचे SDRF च्या टीमने संपूर्ण सर्च ऑपरेशन पोलीस निरीक्षक गुरूदेव खोब्रागडे, पोलीस उपनिरीक्षक सुनील चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ भंडारे, पोलीस उपनिरीक्षक सारंग गुडधे यांनी अतितत्परतेने प्रयत्नांची पराकाष्ठा करून व प्राप्त केलेल्या प्रशिक्षणाचा व कौशल्याचा उत्तमरीत्या वापर करून प्रतिकूल परिस्थितीत अतिशय संयमाने व धाडसाने समादेशक तथा नियंत्रक अधिकारी श्री. बच्चन सिंह व सहा. समादेशक श्री. कृष्णा सोनटक्के यांच्या कुशल मार्गदर्शनात पार पाडले. यामुळे संभाव्य धोका कमी होऊन पुढे होणारी जीवितहानी टाळणे शक्य झाले. ■

## कविता

# अस्तिव झाडाचं

एक झाड हिरवगार, फळांनी भरलेलं होत फार,
पक्षी होते करत विहार, घरटी त्यांची आणि पिले अपार

एके दिवशी माणसं दोन, घेऊनी हातात कुऱ्हाड आणि सोल
बोलले हे झाड तोडू आपण, विकून मिळतील पैसे अन मोल

मग घालू लागले झाडावर घाव, हादरू लागले पक्ष्याचे गाव,
दमून गेले घालून घाव, झाड म्हणाले थोडं थांबा राव
सावलीत माझ्या थोड थांबा, फळं माझी गोड खावून घ्या बाबा,
पानांनी माझ्या घालीन मी वारा, पथिकांस छाया देणं हाच धर्म खरा

प्राणवायू देतो पिऊन तुमचे प्रदूषण, धरतीचा पोत ठेवतो धरून मातीपण,
फळ देतो, फुलं देतो, आणि देतो शुद्ध पर्यावरण,
टिकवून ठेवतो सर्व वायूंचे समीकरण,
आणि ठेवतो संरक्षित ओझोनची ढाल पण

माणसांनी मात्र झाडाकडे दुर्लक्ष केलं, घावाघावांनी झाडांना तोडून टाकलं,
पक्ष्यांनी आर्त कल्लोळ केला, शेकडो घरट्यांचा विध्वंस झाला
ज्या झाडाखाली त्यांनी विसावा घेतला, ज्या झाडाची फळे तो चाखला,
त्याच झाडावर त्यांनीच असा कसा हल्ला केला,

टिकवायचं असेल मानवाला स्वतःचं अस्तित्व,
तर टिकवावं लागेल मित्रांनो झाडाचंही अस्तित्व ७।।



**बाळकृष्ण ठाणगे**
**अहिल्यानगर**

लेख



सुधाकर कुलकर्णी
पुणे

# शून्य व्याज कर्ज (झिरो इंटरेस्ट लोन)

ग्राहकरूपी देवाला आकर्षित करण्यासाठी प्रत्येक विक्रेता काही ना काही ऑफर्स देत असतो. सणासुदीच्या काळात तर या ऑफर्सचे बाजारात पेव फुटते. इएमआय, झिरो इंटरेस्ट लोन ही याची उदाहरणे आहेत. झिरो इंटरेस्ट लोन म्हणजे काय? ती ऑफर घेताना नेमकी काय खबरदारी घ्यायची? झिरो इंटरेस्ट लोनचे फायदे तोटे अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या लेखात दिली आहेत.




कोणताही मोठा सण/उत्सव जवळ आला, की विविध शोरूम्स, मॉल्स, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, जिओ मार्ट, मिंत्रा यांसारख्या ई-कॉमर्स कंपन्या यांच्या मोठमोठ्या जाहिराती वृतपत्रे, टीव्ही, फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या सोशल मीडियावर झळकू लागतात. यांमध्ये महागडे स्मार्ट फोन्स, टीव्ही, फ्रीज, डिशवॉशर, वॉशिंग मशीन, एसी/कूलर यांसारख्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचा प्रकर्षाने समावेश असतो. विशेष म्हणजे या जाहिरातींमध्ये झिरो इंटरेस्ट लोनची ऑफर प्रकर्षाने दिसून येते. बहुतेक डीलर्स तसेच ई-कॉमर्स कंपन्या शून्य व्याज कर्ज (झिरो इंटरेस्ट लोन) देऊ करतात व ग्राहकही याकडे आकर्षित होतात. मात्र शून्य व्याज कर्ज (झिरो इंटरेस्ट लोन) म्हणजे नेमके काय

व खरेच बिनव्याजी कर्ज मिळते का याबाबत सामान्य ग्राहक अनभिज्ञ असल्याचे मोठ्या प्रमाणावर दिसून येते. म्हणून आज आपण शून्य व्याज कर्ज (झिरो इंटरेस्ट लोन) म्हणजे काय व खरेच व्याज शून्य % असते का याबाबत माहिती घेऊ.

## शून्य व्याज कर्ज (झिरो इंटरेस्ट लोन)

याला नो कॉस्ट ईएमआय असेही म्हणतात. सामान्य ग्राहक टीव्ही/ फ्रीज/ डिश वॉशर/ वॉशिंग मशिन/ लॅपटॉप यांच्यासारख्या महागड्या वस्तू एकरकमी घेऊ शकत नाही, आणि उत्पादक तसेच वितरक यांना तर आपला माल विकायचा असतो. त्यासाठी उत्पादक, वितरक व ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, जिओ मार्ट, मिंत्रा यांसारख्या ई–कॉमर्स कंपन्या एकत्र येऊन शून्य व्याज कर्ज (झिरो इंटरेस्ट लोन) हा पर्याय ग्राहकास देऊ करत आहेत.

नो कॉस्ट ईएमआय म्हणजे घेतलेल्या वस्तूच्या किमतीइतके कर्ज आपल्याला दिले जाते व अशा कर्जाच्या हप्त्यावर (ईएम आय) वर कोणतेही इतर शुल्क आकारले जात नाही. त्यालाच नो कॉस्ट ईएमआय म्हटले जाते. तुम्ही नो कॉस्ट ईएमआय पर्यायांमध्ये एखादी वस्तू खरेदी केली, तर तुम्हाला फक्त त्या वस्तूच्या किमतीइतकी रक्कम पुढे हप्त्याने भरावी लागते. त्यावरील कोणतेही व्याज तुमच्याकडून आकारले जाणार नाही. काही वेळा नो कॉस्ट ईएमआयमध्ये तुम्हाला डाऊन पेमेंट भरायची गरज नाही. नो कॉस्ट ईएमआयमुळे तुम्हाला कोणतेही अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. सोप्या भाषेत सांगायचे तर, जर तुम्ही १ लाख रुपयांचे कर्ज घेतले असेल, तर तुम्हाला फक्त १ लाखच परत करावे लागतात, कर्ज रकमेवर व्याज आकारले जात नाही.

> **नो कॉस्ट ईएमआय म्हणजे घेतलेल्या वस्तूच्या किमतीइतके कर्ज आपल्याला दिले जाते व अशा कर्जाच्या हप्त्यावर (ईएम आय) वर कोणतेही इतर शुल्क आकारले जात नाही. त्यालाच नो कॉस्ट ईएमआय म्हटले जाते. तुम्ही नो कॉस्ट ईएमआय पर्यायांमध्ये एखादी वस्तू खरेदी केली, तर तुम्हाला फक्त त्या वस्तूच्या किमतीइतकी रक्कम पुढे हप्त्याने भरावी लागते.**

असे कर्ज हे प्रामुख्याने, एनबीएफसी अर्थात बँक नाहीत अशा वित्तीय पुरवठा करणाऱ्या खाजगी कंपन्या देऊ करतात. अनेक वेळा हे कर्ज वस्तू विकणाऱ्या कंपन्यांच्या सहकार्याने दिले जाते

## झिरो इंटरेस्ट लोनची वैशिष्ट्ये

१) घेत असलेल्या वस्तूची किंमत एकरकमी भरावी लागत नाही. यामुळे हवी असलेली वस्तू खरेदी करणे शक्य होते.

२)विकत घेतलेल्या वस्तूच्या रकमेची परतफेड समान मासिक हप्त्यात करावयाची असते व यासाठी कोणतेही शुल्क लावले जात नाही. थोडक्यात घेतलेले कर्ज बिनव्याजी असते. त्यामुळे फक्त मुद्दलाची परतफेड करावी लागते.

३) कर्ज परतफेडीचा कालावधी सर्वसाधारणपणे ६ महिने ते १२ महिने इतकाच असतो.

४) वस्तूच्या किमतीच्या काही प्रमाणात (१०% ते १५%) डाऊन पेमेंट करावे लागत नाही. (मात्र काही ठिकाणी डाऊनपेमेंट करावे लागू शकते.)

५) प्रोसेसिंग फी भरावी लागते.

## नो कॉस्ट ईएमआय योजनेचे तोटे

१) अनावश्यक किंवा गरजेपेक्षा जास्त सुविधा असणारी महागडी वस्तू घेतली जाऊ शकते (उदा. २५ हजारापर्यंत किमतीचा स्मार्टफोन घेऊन आपली गरज भागू शकते मात्र झिरो इंटरेस्ट लोन वर ६०ते ८० हजारापर्यंतचा स्मार्टफोन घेतला जातो व पुढे त्याचे डोईजड होणारे हप्ते भरताना आर्थिक ओढाताण होऊ शकते.)

२) नो कॉस्ट ईएमआयवर वस्तू खरेदी करताना आपण डिस्काऊंट



मागू शकत नाही, तसेच वस्तूची किंमत वाढवून ठेवलेली असल्याने वस्तू महाग मिळते. रोखीने घेतल्यास हीच वस्तू आपल्याला १० ते १५% स्वस्त मिळू शकते.

३) या कर्जासाठी काहीवेळा छुपे शुल्क (हिडन चार्जेस) असतात जसे की डॉक्युमेंटेशन चार्जेस.

४) पुढील हप्त्यांचे पेमेंट करण्यासाठी एक तर आपल्या क्रेडिट कार्डचा तपशील द्यावा लागतो किंवा पोस्ट डेटेड चेक द्यावे लागतात. पुढील हप्त्यांचे पेमेंट आपल्या क्रेडिट कार्डमधून केले जाते व चेक दिले असल्यास आपल्या खात्यातून होत असते. जर क्रेडिट कार्ड बिल वेळेत भरता आले नाही, तर ३० ते ४०% इतके व्याज द्यावे लागू शकते. शिवाय आपला क्रेडिट स्कोअर खराब होऊन पुढील कर्ज मिळण्याची पात्रता कमी होते. चेक परत गेल्यास पोलीस केस होऊ शकते (सेक्शन १३८ अंतर्गत)

५) अशा प्रकारे मिळणारे कर्ज साधारणपणे १ लाख रुपयांपर्यंतच असते. मोठ्या रकमेचे कर्ज अशा पद्धतीने मिळत नाही.

पुढील हप्त्यांचे पेमेंट करण्यासाठी एक तर आपल्या क्रेडिट कार्डचा तपशील द्यावा लागतो किंवा पोस्ट डेटेड चेक द्यावे लागतात. पुढील हप्त्यांचे पेमेंट आपल्या क्रेडिट कार्डमधून केले जाते व चेक दिले असल्यास आपल्या खात्यातून होत असते. जर क्रेडिट कार्ड बिल वेळेत भरता आले नाही, तर ३० ते ४०% इतके व्याज द्यावे लागू शकते.

## नो कॉस्ट इएमआय योजनेचा लाभ घ्यावा का?

या योजनेमुळे आपल्याला हवी असलेली वस्तू हप्त्याने घेता येत असल्याने, तसेच याची प्रक्रिया अगदी सोपी असल्याने जरूर लाभ घ्यावा. मात्र शून्य व्याज कर्जासाठी अर्ज करण्यापूर्वी त्यातील नियम, अटी, प्रक्रिया शुल्क आणि उशिरा हप्ता भरल्यास लागणारा दंड याबद्दल स्पष्ट माहिती घेणे आवश्यक आहे. आपल्याला द्यावा लागणारा हप्ता सलग भरणे शक्य आहे का याची खात्री असेल, तरच असे कर्ज घ्यावे. ▪

कथा



सचिन बेंडभर
जुन्नर

# बचत



घंटा झाली. मुले मैदानावर गोळा झाली. प्रत्येक वर्गाने आपल्या वर्गाच्या ओळी केल्या. टोल पडताच राष्ट्रगीत सुरू झाले. प्रतिज्ञा झाल्यावर मुलांनी प्रार्थना म्हटली. मग खैरे गुरुजींनी मुलांना छानशी बोधकथा सांगून बचतीचे महत्त्व पटवून दिले. मग ते मुलांना म्हणाले,

''मुलांनो, आयुष्यात बचत खूप महत्त्वाची असते. बचत आपल्याला काटकसरीने जगायला शिकवते. क्षणाक्षणाने ज्ञान, थेंबाथेंबाने तळे आणि कणाकणाने धन साचते. हेच धन आपल्याला अडीअडचणीत कामाला येते, म्हणून आयुष्यात बचत खूप महत्त्वाची असते. आजपासून आपण बचतीला

सुरुवात करू या. यासाठी प्रत्येकाने गल्ला करून त्यात पैसे साठवायचे. ज्याचे पैसे सर्वात जास्त होतील त्याला वर्षाच्या शेवटी बक्षीस देऊ.''

सर्व मुलांनी आनंदाने टाळ्या वाजवल्या. मुलांना खूप आनंद झाला. परिपाठ संपल्यावर मुले आपापल्या वर्गात गेली. वर्गात गेल्यावर प्रत्येकाची त्याच विषयावर चर्चा सुरू होती. प्रत्येकजण वर्षाचे बचतीचे नियोजन मनातल्या मनात करू लागला. स्वर्णिम हुशार होता. त्याने वर्षभर बचत करून प्रथम क्रमांक मिळवण्याचा निश्चय केला. सायंकाळी आनंदातच उड्या मारत तो घरी आला. घरी आल्यावर त्याने प्रथम आजोबांना खैरे गुरुजींनी लावलेल्या बचतीच्या स्पर्धेबद्दल सांगितले. आजोबांनाही खूप आनंद झाला. ते त्याला म्हणाले,

''स्वर्णिम, या स्पर्धेतही तू प्रथम क्रमांक मिळवायला पाहिजे हं.''

''हो आजोबा, मीच प्रथम क्रमांक मिळवणार. पण त्यासाठी मला तुमची मदत लागणार आहे.''

''काय मदत लागणार आहे? पैसे देऊ का?''

''नाही आजोबा, पैसे नको. गुरुजींनी घरातल्या लोकांचे पैसे स्पर्धेसाठी चालणार नाही असं सांगितलं आहे.''

''मग तुझ्या गल्ल्यात पैसे कसे जमा होणार?''

''घरी आलेल्या पाहुण्यांकडून जे पैसे मिळतील ते साठवायला सांगितले आहे.''

> **स्वर्णिम त्यात पैसे टाकू लागला. गल्ला हळूहळू भरू लागला. स्वर्णिम खाऊचे पैसे खर्च न करता आपल्या गल्ल्यात टाकू लागला. कितीही इच्छा झाली, तरी त्याने खाऊसाठी व्यर्थ पैसे घालवले नाहीत.**

त्यावर आजोबा हसत म्हणाले, ''बरं ठीक आहे, पण मी तुला काय मदत करू शकतो?''

''आजोबा, मला गल्ला घेऊन द्या ना. त्यात मी माझे बचत केलेले पैसे ठेवीन.''

''ठीक आहे. आजच आपण चौकातल्या दुकानातून तुला एक छानसा गल्ला घेऊ. तू फ्रेश हो. लगेचच आपण जाऊ.''

ते ऐकून स्वर्णिम आजोबांच्या गळ्यात पडून म्हणाला, ''आजोबा, तुम्ही किती चांगले आहात!''

मग स्वर्णिम आजोबांबरोबर चौकात गेला. आजोबांनी त्याला विचारल्यावर त्याने लाल रंगाच्या गल्ल्याकडे बोट केले. आजोबांनी पैसे देऊन गल्ला विकत घेतला. स्वर्णिम आनंदाने उड्या मारू लागला. त्याचा आनंद गगनात मावेना. लाल रंगाचा हत्तीच्या आकाराचा गल्ला खूपच सुंदर होता. स्वर्णिम त्यात पैसे टाकू लागला. गल्ला हळूहळू भरू लागला. स्वर्णिम खाऊचे पैसे खर्च न करता आपल्या गल्ल्यात टाकू लागला. कितीही इच्छा झाली, तरी त्याने खाऊसाठी व्यर्थ पैसे घालवले नाहीत. घरी कोणी पाहुणे आले, की त्यांच्याकडून खाऊसाठी पैसे मिळायचे. सणावाराला मामा, आत्या, मावशी यांची वरचेवर चक्कर असायची. त्यांनी खाऊला दिलेले पैसे त्याने जपून ठेवले. दिवस सरत गेले, तसा त्याचा गल्ला भरत आला.

एप्रिल महिना सुरू झाला. मुलांच्या परीक्षेला सुरुवात झाली. शेवटच्या पेपरला गुरुजींनी मुलांना गल्ला आणायला सांगितला. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर आनंद झळकत होता. तसेच सर्वात जास्त बचत कुणाची झाली असेल? याबाबत उत्सुकता होती. अखेर ज्या दिवसाची सर्वजण उत्सुकतेने वाट बघत होते, तो दिवस उगवला. स्वर्णिम शाळेपासून हाकेच्याच अंतरावर असल्यामुळे तो नेहमीप्रमाणे चालत निघाला. काही अंतर जाताच रस्त्याच्या बाजूला त्याला एक आजी दिसली. त्यांच्या पायाला जखम झाली होती. त्यातून रक्त वाहत होते. स्वर्णिमने त्यांना ओळखले. या आजी नेहमी त्यांच्या घरी भाजी घेऊन यायच्या. सर्वजण त्यांच्याकडून भाजी विकत घ्यायचे. हे त्याने पाहिले होते. म्हणूनच त्याने आस्थेने आजींची विचारपूस करत म्हटले,

''आजी, काय झालं? खूप लागलंय का?''

''हो रे लेकरा, रस्त्यावरच्या गाडीने धक्का दिला.''

''आजी, समोरच दवाखाना आहे. चला, मी तुम्हाला घेऊन जातो.''

''माझ्याकडे पैसे असते, तर कशाला इथेच बसले असते? आज भाजी विकून कमाई झाली नाही. मग कुठून येतील पैसे? आणि पैसे नसतील तर इलाज कसा होईल?''

''आजी त्याची काळजी करू नका. माझ्याकडे आहेत पैसे.'' ते ऐकून आजींना त्याचे कौतुक वाटले. मग आजींचा हात पकडून स्वर्णिमने त्यांना उठवले. दवाखान्यात नेऊन औषधपाणी केले. डॉक्टरांची फी दिली. त्याच्याकडे आता वीसच रुपये शिल्लक राहिले. आजींचा निरोप घेऊन तो शाळेत निघाला. तेव्हा आजींनी त्याच्या तोंडावरून हात फिरवत त्याला गोड आशीर्वाद दिले.

शाळेत शेवटचा पेपर झाल्यावर गुरुजींनी सर्वांचे गल्ले तपासले. स्वर्णिमच्या गल्ल्यात वीसच रुपये पाहून गुरुजींनी त्याला कारण विचारले. तेव्हा त्याने सर्व हकिकत सांगितली. ते ऐकून सारा वर्ग स्तब्ध झाला. गुरुजींची छाती अभिमानाने भरून आली. ते मुलांना म्हणाले,

''बाळांनो, बचतीचा खरा अर्थ आज स्वर्णिमने आपल्या कृतीतून दाखवून दिला. प्रथम क्रमांकाचे बक्षीस जरी त्याला मिळाले नसले तरी आदर्श विद्यार्थी म्हणून आपण त्याला सन्मानित करत आहोत.''

ते ऐकून सर्व मुलांनी टाळ्या वाजवल्या. घरी गेल्यावर जेव्हा ही गोष्ट आजोबांना कळली, तेव्हा त्यांनी त्याचे तोंडभरून कौतुक केले. ■

## कविता

# खाकीतील कणा

ऊन असो वा पाऊस असो, वा असो वादळाची लाट,
रक्षणासाठी उभी राहते, नेहमी खाकीचीच वाट.
जगाचे सारे सण-उत्सव, ड्युटीवरच साजरे होतात,
स्वतःच्या घराचे उंबरे मात्र, कर्तव्यापायी मागे राहतात... ।। १ ।।

हातात नसते ढाल-तलवार, तरीही रात्र-रात्र जागतात,
डोळ्यांत तेल घालून अहोरात्र, ते जनतेचे रक्षण करतात.
गुन्हेगारीच्या वादळाला जे, छातीचा कोट करून रोखतात,
तेच खाकीतले देवदूत, सामान्यांचे अश्रू पुसतात... ।। २ ।।

नुसतीच वर्दी आणि पॉवर नाही, ही तर जबाबदारीची भाषा आहे,
खाकीच्या याच रूपात आम्हाला, संविधानाची खरी आशा आहे.
धाडस, संयम आणि निष्ठा, हाच या वर्दीचा बाणा आहे,
महाराष्ट्र पोलिसांचे हे शौर्य, आपल्या समाजाचा खरा कणा आहे... ।। ३ ।।

विकसित भारत घडवण्याचे स्वप्न, आम्ही उराशी कवटाळले आहे,
राष्ट्र सुरक्षेचा हा भक्कम पाया, या खाकीनेच रचला आहे.
महाराष्ट्र पोलिसांच्या अफाट त्यागाला आणि निस्वार्थ सेवेला....
'डीएसपी शब्दरंग'चा मानाचा मुजरा, आणि कडक सलाम या वर्दीला ।। ४ ।।



धनंजय पळसकर

**कथा**



पंकज पेडणेकर
(गंधार)
प्रमुख लिपिक, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# पिंजऱ्यातला पोपट



शिकवल्याप्रमाणे रोजसारखं आजही तो पिंजऱ्यातला पोपट गुड मॉर्निंग, गुड मॉर्निंग बोलत होता. एवढी वर्षं माणसांमध्ये राहून तो माणसांची भाषा देखील बोलायला लागला होता. खरंतर तो त्याचा  पोपट असल्याचा मूळ गुणधर्मच विसरून गेला होता. सहवासात राहून स्वभाव कधी बदलतात ते कळतसुद्धा नाहीत. फक्त आजूबाजूच्या वातावरणात, माणसांत जीव अडकला पाहिजे. त्याचंही तसंच झालं होतं. त्या घरातल्या माणसांमध्ये त्याचाही नकळतपणे जीव गुंतला होता. त्यामुळे तो त्या माणसांसारखा केव्हा झाला, ती माणसे त्याची कधी झाली ते त्याचं त्यालाच कळलं नाही.

त्याच्या गुड मॉर्निंगला हसून प्रतिसाद देत विराज खिडकीजवळ चहा पीत उभा होता.  चहाच्या प्रत्येक घोटाचा आस्वाद घेत घेत तो त्या पिंजऱ्यातल्या पोपटाकडे अगदी कौतुकाने बघत होता. लगेचच पोपट पिंजऱ्यातली त्याच्यासमोर ठेवलेली पेरूची फोड आवडीने खाण्यात मग्न झाला होता. पोपटाला पिंजऱ्यातल्या झोपाळ्यावर ऐटीत बसून झोके घेताना पाहून त्याला आठवलं..

‘सुरुवातीला जेव्हा आपण याला पकडून आणलं होतं तेव्हा आपल्या हाताला जोरात चावला होता हा. पिंजऱ्यात बंद करताना तर हाताला

नखंपण लागली होती. सुरुवातीचे कित्येक दिवस ओरडून ओरडून जीव नकोसा करून टाकला होता. कित्येक दिवस तर उडण्यासाठी त्याने प्रयत्नही केले होते. एकदा तर पेरूची फोड टाकायला पिंजऱ्याचा दरवाजा उघडला तेव्हा पळूनच गेला असता पण तेवढ्यात लगेच पकडलं म्हणून. पुन्हा असं व्हायला नको म्हणून याच वेळी त्याचे पंख छाटून टाकले होते मीच.''

''सुरुवातीसुरुवातीला तर त्याला या झोपाळ्यावर बसायलाही जमत नव्हतं. बसला की झोपाळा हलायचा आणि तोल जाऊन हा खाली पडायचा. पण आता मात्र किती सहजपणे तो या झोपाळ्यावर वावरतोय. हा पिंजरा जणू आता त्याचं सर्वस्वच झालं आहे. कसं अंगवळणी पडलं असेल त्याच्या हे माणसामधलं आयुष्य... कदाचित आपली आता या पिंजऱ्यातून मुळीच सुटका नाही हे त्याला जाणवलं असेल आणि त्याने हे आयुष्य अंगवळणी पाडूनही घेतलं असेल.'

बऱ्याच वर्षांनंतर हा मिळालेला एकांत आणि या एकांतात विराजच्या मनात चाललेली पोपटाबद्दलची काळजी या सगळ्याची पोपटाला साधी कल्पनाही नव्हती. तो पिंजऱ्याजवळ गेला आणि पोपटाला म्हणाला,

''आता नाही काय रे उंच उडून जावंसं वाटत?''

इतक्यात त्याची पत्नी स्वप्नाली गाणं गुणगुणत त्याच्या जवळ आली.

''चहा पिऊन झाला असेल तर, चहाचा कप द्या,'' स्वप्नाली म्हणाली.

''हो, हा घे.'' म्हणत त्याने हातातला चहाचा रिकामा कप स्वप्नालीच्या हातात दिला. चहाचा रिकामा कप घेऊन स्वप्नाली वळली, तेव्हा तिच्या ओठांवर उमटलेली गाण्याची ती हलकी ओळ विराजला या पिंजऱ्यातल्या पोपटाच्या 'गुड मॉर्निंग' सारखीच वाटली. स्वप्नाली आत गेली खरी, पण तिच्या त्या नकळत गाणं गुणगुणण्याने

**तिच्या सुरेल आवाजात आभाळ कवेत घेण्याची जिद्द होती. पण तिच्या अंगी असलेली ही आवड कधी धुसर होत गेली, हे कळलंच नाही.**

विराजच्या डोक्यातलं विचारांचं स्तब्ध झालेलं चक्रं पुन्हा सुरू झालं.

विराजच्या डोळ्यासमोर लख्खपणे उभी राहीली ती लग्नानंतरच्या सुरुवातीच्या दिवसांतली ती उनाड वाऱ्यासारखी बागडणारी, खळखळून हसणारी, फुलपाखरू कसं फुलातून मध गोळा करतं तसं छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद वेचणारी स्वप्नाली.

तिला गाण्याची आवड होती. केवळ आवडच नाही तर सूर, तालाची समजही होती. तिच्या सुरेल आवाजात आभाळ कवेत घेण्याची जिद्द होती. पण तिच्या अंगी असलेली ही आवड कधी धुसर होत गेली, हे कळलंच नाही. काळाच्या ओघात संसाराच्या, मुलांच्या जबाबदाऱ्या, समाजाने अवतीभवती पसरवून ठेवलेला रिती आणि परंपरांचा पसारा आणि नात्यांच्या दोराने विणलेल्या बंधनांच्या जाळ्यात मुक्त पाखरासारखी बागडणारी, खळखळणाऱ्या झऱ्यासारखी खळखळून हसणारी आणि छोट्या छोट्या गोष्टींमधून आनंद वेचणारी स्वप्नाली नावाची मुलगी केव्हा हरवत गेली, हे कळलंच नाही. या जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली तिने स्वतःच स्वत:च्या आवडीनिवडचे पंख छाटून घेतले होते की तिला या घराच्या पिंजऱ्यात आनंदी ठेवण्याच्या नादात, आपणच तिचं 'आभाळ' हिरावून घेतलं या प्रश्नाने विराजला अस्वस्थ केलं.

त्याला आठवलं, स्वप्नाली सुरुवातीला किती स्वप्ने उराशी बाळगून होती. लग्न झालं तेव्हा तिने ती स्वप्न पूर्ण करण्यासाठी बाहेर पडायचा प्रयत्नही केला होता. करिअर घडवण्यासाठी, स्वतःला सिद्ध करण्यासाठी तिची धडपड ही सुरूच होती. पण काही वर्षांनी मूल, त्याचं संगोपन, घरातल्या जबाबदाऱ्या, आणि हळूहळू सुरु

झालेलं मुलाचं शिक्षण यात तिच्या भरारी घेणाऱ्या पंखांना कधी कात्री लागत गेली आणि तिचं अस्तित्व कधी चार भिंतींच्या पिंजऱ्यात बंदिस्त झालं हे कळलंच नाही. तिची सुरेल गाण्याची आवडही आता गुणगुणण्याइतकीच सिमित राहिली होती.

'हा पोपट जसा पिंजऱ्यातल्या झोपाळ्यावर आता मजेत झोके घेतोय, तशीच स्वप्नालीही आता या चार भिंतीतच आपलं जग शोधून समाधानी असण्याचं नाटक करतेय का?' याचाच विचार करत विराज पिंजऱ्याकडे बघत उभा होता.

बऱ्याच वेळाच्या शांततेने विराजच्या मनातल विचारांचं वादळ आता शांत झालं होतं आणि एका ठाम निश्चयाने जन्म घेतला होता. त्याने आजपासून स्वप्नालीच्या स्वप्नांच्या पंखांतलं बळ बनायचं ठरवलं होतं. तो क्षणाचाही विलंब न करता थेट स्वयंपाकघरात गेला. काम करण्यात मग्न असलेल्या स्वप्नालीला त्याने अनपेक्षितपणे मिठीत घेतलं.

स्वप्नाली थोडीशी दचकली, तिच्या हातातला पाण्याचा ग्लास खाली पडला पण त्याकडे दुर्लक्ष करून विराज तिच्या कानात हळू आवाजात आणि निर्णायक स्वरात म्हणाला,

''स्वप्नाली, तुझं ते अर्धवट राहिलेलं गाणं पुन्हा सुरू कर. तुझ्या सुरेल आवाजाने हे घर पुन्हा एकदा न्हाऊन निघू दे. या जबाबदारीच्या गजांनी बनलेल्या अदृष्य पिंजऱ्याची दारं मी आज उघडी करत आहे.. आता तुझं आयुष्य तुझ्या मर्जीनुसार जगायला सुरुवात कर.''

स्वप्नाली विस्मयाने आणि कौतुकाने त्याच्याकडे पाहतच राहिली. तिच्या डोळ्यांत आनंदाची एक तरल लकेर उमटली. विराजलाही स्वतःच्या मनावरचं एक मोठं ओझं उतरल्यासारखं वाटलं, जणू तो स्वतःही एका बंधनातून मुक्त झाला असं त्याला जाणवलं.

याच उत्साहात तो पुन्हा गॅलरीत आला. त्याने त्या पोपटाच्या पिंजऱ्याजवळ जाऊन, पिंजऱ्याचं दार सताड उघडं केलं.

**स्वप्नाली विस्मयाने आणि कौतुकाने त्याच्याकडे पाहतच राहिली. तिच्या डोळ्यांत आनंदाची एक तरल लकेर उमटली.**

''जा मित्रा, तुझं विश्व, हे मोकळं आकाश तुला साद घालतंय,'' विराज पुटपुटला. पण आश्चर्य म्हणजे, तो पोपट बाहेर यायला तयारच नव्हता. पिंजऱ्याची सवय, बाहेरच्या जगाची भीती की विराजबद्दलची माया? नेमकं कारण काय, त्यावेळी या पोपटाच्या मनाची नेमकी अवस्था काय होती हे विराजला समजतं नव्हतं.

तेवढ्यात, स्वयंपाकघरातून स्वप्नालीचा तोच सुरेल आणि रेशमी आवाज विराजच्या कानावर पडला. ती गात होती...

'पंछी से छुड़ाकर उसका घर,
तुम अपने घर पर ले आए...

ये यार का पिंजरा मन भाया,
हम जी भरभर के मुस्काए...

जब यार हुआ इस पिंजरे से,
तुम कहने लगे आज़ाद रहो...

तिच्या सुरेल गळ्यातून निघणाऱ्या प्रत्येक शब्दात एक अनामिक वेदना आणि तितकीच आत्मीयता साठलेली होती. स्वप्नाली आता एका वेगळ्याच उत्साहाने गात होती, जणू तिने त्या पिंजऱ्यालाच आपलं सुरांचं मंदीर मानलं होतं. तिकडे पोपटही आपली पेरूची फोड खाण्यात पूर्णपणे मग्न झाला होता. त्याला आता त्या उघड्या दाराचं, बाहेर खुणावणाऱ्या जगाचं काहीच सोयरसुतक नव्हतं.

विराज मात्र शून्यात पाहात तिथेच उभा होता. विराजच्या नजरेसमोर पसरलं होतं ते केवळ एक निःपक्षी, अथांग आणि विराण आकाश... त्याला आता कोणाच्याही पंखांची ओढ उरली नव्हती. स्वातंत्र्य द्यायला निघालेल्या विराजला आज स्वतःच त्या अथांग रिकामेपणात हरवल्यासारखं वाटत होतं. ■

### डायल ११२ आणि पाचोड पोलिसांची अतुलनीय कामगिरी

# तत्पर कारवाई करत रोखला बालविवाह



दिनांक ३० मार्च २०२६ या दिवशी १३ वाजून १४ मिनीटे व ५३ सेकंदाने पोलीस ठाणे पाचोड हद्दीमध्ये रजापूर येथे एक बालविवाह होत असल्याबाबत डायल ११२ वर एका महिलेने कॉल केला व मदतीची विनंती केली. कॉल टेकरने क्षणाचाही विलंब न करता अवघ्या काही सेकंदात माहिती संबंधित पोलीस यंत्रणेला दिली व प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असताना जलद केलेली प्रतिक्रिया निर्णायक ठरली.

**पोलिसांची कारवाई-**

सदर कॉलची माहिती मिळताना पोलीस अंमलदार नागनाथ केंद्रे हे पोलीस ठाणे पाचोड, ता. पैठण येथील डायल ११२ कर्तव्यावर होते. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता प्रसंगावधान ओळखून सदर घटनेची माहिती पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी एस. ए. पंडीत, सहा. पोलीस निरीक्षक यांना दिली. घटनास्थळी पोलीस तत्काळ रवाना झाले. सदर



महादेव नाईकवाडे
सहा. पोलीस निरीक्षक
पाचोड पोलीस ठाणे
जिल्हा छत्रपति संभाजीनगर



नागनाथ केंद्रे
पोलीस अंमलदार
डायल ११२ पाचोड
जिल्हा छत्रपति संभाजीनगर

घटनेच्या ठिकाणी मौजे रजापूर ता. पैठण येथे पोहोचले असता तेथे घटनास्थळी मंडप टाकून १०० ते १५० लोक एकत्र जमलेले दिसले. सदर घटनास्थळावर उपस्थित जनसमुदायाला पोलीस अंमलदार केंद्रे यांनी काय चालले आहे अशी विचारणा केली असता त्यांनी लग्न जमवाजमवीचा व साखरपुड्याचा कार्यक्रम सुरू असल्याचे सांगितले. तेव्हा पोलिसांनी उपस्थित लोकांना सदर ठिकाणी या लग्नाविषयी डायल ११२ वर कॉल आल्याचे सांगितले. उपस्थित लोकांनी सदरचा होणारा साखरपुडा व लग्नाचा कार्यक्रम रद्द करण्याची तयारी दाखवत तेथील नातेवाईक व लोकांना जाण्यास सांगितले. घटनास्थळी पोलिसांनी संबंधित मुलीची वय पडताळणी केली असता तिची जन्मतारीख १७ सप्टेंबर २०१० असल्याचे निदर्शनास आले व मुलीचे नाव आशा असून ती रजापूर, ता. पैठण येथे राहणारी असल्याचे समजले. तेव्हा तातडीने घटनेची माहिती सहा. पोलीस निरीक्षक पंडीत यांना देऊन मदतीसाठी पोलीस उपनिरीक्षक महादेव नाईकवाडे यांना बोलावून घेतले. त्यानंतर मुलगी– आशा वय १६ वर्षे ०६ महिने, मुलीचे वडील– भिमा, आई– रश्मी, रा. रजापूर, ता. पैठण तसेच मुलाचे वडील– काशिनाथ, मुलगा– रोहित, रा. जुजगव्हाण, पोस्ट ढेकन, ता. जि. बीड यांना बोलावून त्यांचे एकत्रितपणे समुपदेशन करण्यात आले. यावेळी बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंतर्गत तरतुदी, शिक्षेची तरतूद, बालविवाहाचे सामाजिक व वैयक्तीक दुष्परिणाम व त्यातून होणारे नुकसान याबाबत समुपदेशन करून सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच मुलींचे कमी वयात लग्न झाल्यानंतर ती लवकरच आई होईल व तिची भविष्यात होणारी शारीरिक व मानसिक हानी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पोलीस पथकाच्या प्रभावी समुपदेशनामुळे दोन्ही पक्षांनी अल्पवयीन मुलीचा साखरपुडा व पुढे होणारा विवाह थांबविण्यास ताबडतोब सहमती दर्शविली. तसेच मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यावर तिचा साखरपुडा व पुढे विवाह करण्याची हमी दिली. यावेळी अल्पवयीन मुलीस शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगून त्यातून होणारे दीर्घकालीन फायदे याबाबत समुपदेशन करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण चालू ठेवण्याबाबत प्रोत्साहित करण्यात आले. तसेच शासनामार्फत मुलीच्या शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध योजना, शिष्यवृत्ती व इतर सवलती यांची माहिती देण्यात आली. सदर अल्पवयीन मुलीस पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

### निष्कर्ष-

सदरची घटना म्हणजे वेळेवर घेतलेला निर्णय व तत्पर प्रतिसाद याचे जिवंत उदाहरण आहे. सदर कारवाई ही पाचोड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली. त्यांच्या तत्परतेमुळे एका अल्पवयीन मुलीचे बालविवाहापासून संरक्षण करण्यात आले असून तिच्या शिक्षण व भविष्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यात आले आहे. सदर यशस्वी हस्तक्षेपामुळे बालविवाह रोखण्यात आला असून समाजात कायद्याबाबत जागरूकता निर्माण होऊन सकारात्मक संदेश देण्यात आला आहे. ■



श्री. बच्चन सिंह
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट
क्रमांक ४, नागपूर

# राज्य राखीव पोलीस बल गट क्र ४, नागपूरतर्फे
# विविध उपक्रमांची अंमलबजावणी

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ येथील नागपूर आस्थापनेमध्ये कार्यरत महाराष्ट्र सुरक्षा बलातील महिला सुरक्षाकर्मी प्रशिक्षणार्थ्यांसाठी मूलभूत प्रशिक्षण तसेच आस्थापनेत कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी गटामध्ये अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले. त्याची माहिती या लेखात दिली आहे.

## राज्य राखीव पोलीस दल गट क्र. ४, नागपूर येथे स्त्री-शक्तीचे यशस्वी प्रशिक्षण!

### प्रस्तावना:

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूर येथील आस्थापनेवर जिल्हा पोलीस दलातील नवनियुक्त पोलीस उपनिरीक्षक यांच्याकरिता परीविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक प्रशिक्षण, होमगार्ड यांचे मूलभूत प्रशिक्षण, जिल्हा कवायत निदेशक प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामधील पुरुष सुरक्षाकर्मी यांचे मूलभूत प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. तसेच प्रथमच राज्य राखीव पोलीस बलातील २७३ नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांच्यासाठी मूलभूत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. गटातील पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. प्रशिक्षणार्थी यांच्याकडून प्रशिक्षणाबाबत प्रत्येक आठवड्यामध्ये फीडबॅक घेण्यात येतो. त्यामुळे प्रशिक्षणामध्ये आवश्यक सुधारणा करण्यास मदत होते. नियमितपणे प्रशिक्षणाचा आढावा घेऊन प्रशिक्षणार्थी यांच्याकडून प्रशिक्षणाच्या दर्जाबाबत आढावा घेण्यात येतो. त्यामुळे गटातील सर्व प्रकारच्या प्रशिक्षणाचा दर्जा उच्च ठेवण्याकरिता मदत होत आहे.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामधील महिला सुरक्षाकर्मींसाठी प्रथमच ऑक्टोंबर २०२५ मध्ये ५५ महिला सुरक्षाकर्मी, जानेवारी २०२६ मध्ये २४० महिला सुरक्षाकर्मी तर सद्यस्थितीत एप्रिल २०२६ मध्ये ३६२ महिला सुरक्षाकर्मी प्रशिणार्थी यांचे मूलभूत प्रशिक्षण सुरू आहे.





राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ नागपूर येथे आजवर शौर्य आणि बलिदानाच्या अनेक कथा लिहिल्या गेल्या आहेत. मात्र, सन २०२५-२६ हे वर्ष राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूरसाठी एका नव्या क्रांतीचे साक्षीदार ठरले आहे. दलाच्या स्थापनेपासून प्रथमच, महाराष्ट्र सुरक्षा बलातील महिला सुरक्षाकर्मी यांचे मूलभूत प्रशिक्षण श्री. बच्चन सिंह, (भा.पो.से.) समादेशक, रारापोबल गट क्र. ४, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. हा केवळ प्रशिक्षणाचा एक भाग नसून, पुरुषप्रधान मानल्या जाणाऱ्या या क्षेत्रात महिलांनी दिलेली ही एक सशक्त सलामी आहे.

## प्रशिक्षणार्थी तुकड्यांचा संक्षिप्त आढावा

| प्रशिक्षित तुकडी | कालावधी | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|
| प्रथम तुकडी | १ ऑक्टोबर २०२५ ते १४ नोव्हेंबर २०२५ | ५५ |
| दुसरी तुकडी | २८ जानेवारी ते १३ मार्च २०२६ | २४० |
| तृतीय तुकडी | १६ एप्रिल ते ३० मे २०२६ | ३६२ |

### बदलता दृष्टिकोन आणि प्रशिक्षणाची व्याप्ती:

सुरुवातीला एक प्रयोग म्हणून पाहिल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे रूपांतर आणि एका मोठ्या मोहिमेत झाले आहे. महिला उमेदवारांची जिद्द, चिकाटी आणि प्रशिक्षणाप्रती असलेली त्यांची निष्ठा पाहून प्रशिक्षणाची व्याप्ती सातत्याने वाढवण्यात आली.

### कार्यक्षमतेचा नवा मापदंड:

प्रशिक्षणाची सुरुवात केवळ ५५ महिला उमेदवारांच्या एका लहान तुकडीने झाली. मात्र, या पहिल्याच तुकडीने मैदानी कवायती, शिस्त आणि सुरक्षा कौशल्यात दाखवलेली विलक्षण कार्यक्षमता पाहून प्रशासनाचा आत्मविश्वास द्विगुणित झाला. परिणामी, दुसऱ्या तुकडीत ही संख्या २४० करण्यात आली आणि सध्या सुरू असलेल्या तिसऱ्या तुकडीत ३६२ महिला उमेदवार प्रशिक्षणाचे धडे गिरवत आहेत. अल्पावधीत झालेली ही वाढ महिलांच्या या क्षेत्रातील वाढत्या ओघाची आणि सक्षमतेची प्रचिती देते.

**प्रशिक्षणाची सुरुवात केवळ ५५ महिला उमेदवारांच्या एका लहान तुकडीने झाली. मात्र, या पहिल्याच तुकडीने मैदानी कवायती, शिस्त आणि सुरक्षा कौशल्यात दाखवलेली विलक्षण कार्यक्षमता पाहून प्रशासनाचा आत्मविश्वास द्विगुणित झाला. परिणामी, दुसऱ्या तुकडीत ही संख्या २४० करण्यात आली आणि सध्या सुरू असलेल्या तिसऱ्या तुकडीत ३६२ महिला उमेदवार प्रशिक्षणाचे धडे गिरवत आहेत.**

### कठोर प्रशिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास:

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूर येथील अनुभवी प्रशिक्षकांनी या महिला उमेदवारांना केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम केले नाही, तर त्यांना मानसिकदृष्ट्याही कणखर बनवले आहे. यामध्ये खालील प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले.

**शस्त्र हाताळणी:** आधुनिक शस्त्रास्त्रांचे तांत्रिक ज्ञान आणि अचूक नेमबाजी.

**सुरक्षा व्यवस्थापन:** महत्त्वाच्या शासकीय आस्थापनांचे रक्षण करण्याची कला.

**शिस्त आणि संचलन:** एकसंधता आणि शिस्तीचे दर्शन घडवणारे संचलन.

**आपत्ती व्यवस्थापन:**

आणीबाणीच्या काळात त्वरित प्रतिसाद देण्याची तयारी.

### राज्य राखीव पोलीस बलाचा अभिमान:

राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूरसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे, की अगदी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या या भगिनी आणि सुरक्षा रक्षक स्वतःला सिद्ध करत आहेत. ३० मे २०२६ या दिवशी जेव्हा ही तिसरी तुकडी आपले प्रशिक्षण पूर्ण करेल, तेव्हा राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूरच्या नावावर एका ऐतिहासिक कामगिरीची नोंद होईल. या महिला उमेदवारांच्या बुटांचा आवाज जेव्हा परेड ग्राऊंडवर घुमतो, तेव्हा तो केवळ प्रशिक्षणाचा आवाज नसून एका नव्या युगाची ती नांदी असते. ‘वीरता आणि शिस्त’ हे ब्रीदवाक्य आता या महिला जवानांच्या रूपाने अधिक तेजस्वी होईल. महाराष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी सज्ज झालेल्या या सर्व रणरागिणींना राज्य राखीव पोलीस दलाचा सलाम!

## राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूर येथील नावीन्यपूर्ण कल्याणकारी उपक्रम

### प्रस्तावना:

राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूर आस्थापनेवरील जवान सतत कायदा व सुव्यवस्था, नक्षलविरोधी अभियान, फिक्स




पॉईंट बंदोबस्त आणि इतर राज्यातील निवडणूक बंदोबस्तासाठी तैनात असल्याने त्यांना दीर्घकाळ आपल्या कुटुंबापासून दूर राहावे लागते. त्यामुळे पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबियांना कॅम्प परिसरामध्येच दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या याकरिता पोलीस कल्याण उपक्रमांतर्गत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम कार्यान्वित करण्यात आले आहेत.

**राज्य राखीव पोलीस बलाची ओळख केवळ कडक शिस्त आणि शौर्यापुरती मर्यादित नसून, आपल्या जवानांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या सर्वांगीण कल्याणासाठी कटिबद्ध असलेले हे एक कुटुंब आहे. कार्यक्षमता वाढवण्यासाठी उत्तम वातावरण आवश्यक असते. या ब्रीदवाक्याला अनुसरून श्री. बच्चन सिंह, (भापोसे) समादेशक, रारापोबल गट क्र. ४ यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक महत्त्वपूर्ण कल्याणकारी उपक्रम आणि पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आली आहे.**

राज्य राखीव पोलीस बलाची ओळख केवळ कडक शिस्त आणि शौर्यापुरती मर्यादित नसून, आपल्या जवानांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या सर्वांगीण कल्याणासाठी कटिबद्ध असलेले हे एक कुटुंब आहे. कार्यक्षमता वाढवण्यासाठी उत्तम वातावरण आवश्यक असते. या ब्रीदवाक्याला अनुसरून, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूर येथे श्री. बच्चन सिंह, (भापोसे) समादेशक, रारापोबल गट क्र. ४ यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक महत्त्वपूर्ण कल्याणकारी उपक्रम आणि पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आली आहे.

### क्रीडा आणि शारीरिक नैपुण्य:

जवानांच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी आणि नेमबाजीतील अचूकता वाढवण्यासाठी गटामध्ये एअर रायफल रेंज कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच, मनोरंजनासोबत आरोग्य




जपण्यासाठी इनडोअर गेम्स आणि अत्याधुनिक बॅडमिंटन कोर्ट उपलब्ध करून देण्यात आले आहे, ज्यामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे.

## शैक्षणिक आणि बौद्धिक विकास:

वाचन संस्कृती जोपासण्यासाठी गटामधील ग्रंथालयाचे अत्याधुनिक नूतनीकरण करण्यात आले असून, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नवीन पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. कर्तव्य बजावत असताना आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणाऱ्या अधिकारी / अंमलदार यांच्या पाल्यांचा उत्साह वाढवण्यासाठी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सत्कार सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व प्रेरणा वाढली असून इतर पाल्यांनाही शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी सकारात्मक संदेश मिळाला आहे.

पोलीस अधिकारी व अंमलदार हे सतत विविध बंदोबस्तांकरिता गटाबाहेर तैनातीस असतात. आणि परिस्थितीत त्यांच्या पाल्यांना दर्जेदार शिक्षणाची सुविधा सहज उपलब्ध व्हावी, या हेतूने गटामध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर शाळा ही गटामध्ये असल्यामुळे पाल्यांना सुरक्षित, सोयिस्कर व शिस्तबद्ध वातावरणात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या उपक्रमामुळे बंदोबस्ताच्या कारणास्तव पालक गटाबाहेर असले तरी त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होत नाही. परिणामी पालकांना आपल्या कर्तव्यावर पूर्ण लक्ष केंदित करता येते व पाल्यांना सुरक्षित वातावरणात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध होते.

आपल्या शहीद वीरांच्या स्मृती जतन करण्यासाठी आणि त्यांच्या शौर्याची माहिती सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष शहिद पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे.

२००८ पासून प्रलंबित असलेला गटातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यात आला असून, आता गटामध्ये सुसज्ज रस्ते उपलब्ध आहेत.

मुलांच्या उन्हाळी सुट्ट्यांच्या





काळात पोलीस पाल्यांचा वेळ सकारात्मक व उपयुक्त उपक्रमांमध्ये व्यतीत व्हावा, या उद्देशाने कॅम्प परिसरात समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. समर कॅम्पमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामध्ये विविध क्रीडाप्रकार, चित्रकला, नृत्य, गायन अशा सत्रांचा समावेश आहे. यामध्ये अनुभवी प्रशिक्षक, अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपक्रम नियोजनबद्ध पद्धतीने राबववण्यात येत आहेत. या समर कॅम्पमुळे पोलीस पाल्यांना आनंददायी, सुरक्षित व प्रेरणादायी वातावरणात नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळत असून त्यांच्या आत्मविश्वासात व व्यक्तिमत्त्व विकासात सकारात्मक वाढ होत आहे.

## जवानांचा सन्मान आणि आपुलकी:

गटातील अधिकारी, अंमलदार आणि चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना विशेष शुभेच्छा प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्याची नवी परंपरा सुरू करण्यात आली आहे. यामुळे अधिकारी / अंमलदार यांच्यामध्ये आपुलकीची भावना निर्माण झाली आहे.

**समर कॅम्पमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामध्ये विविध क्रीडाप्रकार, चित्रकला, नृत्य, गायन अशा सत्रांचा समावेश आहे. यामध्ये अनुभवी प्रशिक्षक, अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपक्रम नियोजनबद्ध पद्धतीने राबववण्यात येत आहेत. या कॅम्पमुळे पोलीस पाल्यांना सुरक्षित व प्रेरणादायी वातावरणात नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळत आहे.**

पदोन्नती मिळालेल्या अंमलदारांचा आत्मविश्वास व उत्साह द्विगुणित व्हावा तसेच भविष्यात अधिक जोमाने व समर्पण भावनेने सेवा बजावावी यासाठी पिपिंग सेरेम नीद्वारे सन्मान करून त्यांचा उत्साह द्विगुणित करण्यात आला आहे.

राज्य राखीव पोलीस बल क्रीडा स्पर्धा तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून प्रावीण्य प्राप्त केलेल्या खेळाडू अंमलदारांचा गौरव करण्यात आला. संबंधित खेळाडूंनी विविध क्रीडाप्रकारांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करून राज्य राखीव पोलीस बलाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल त्यांना प्रोत्साहनार्थ सन्मानित करण्यात आले.

या उपक्रमांमुळे गटामध्ये कामासाठी एक सकारात्मक आणि उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले आहे. हे सर्व उपक्रम केवळ वास्तूंचे नूतनीकरण नसून, पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे मनोधैर्य वाढवण्याचे एक साधन आहे. सुसज्ज निवासस्थाने, उत्तम रस्ते, खेळाची मैदाने आणि शैक्षणिक प्रोत्साहन यामुळे राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४, नागपूर हे आज एक आदर्श दल म्हणून उदयास येत आहे. पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या कल्याणाची ही गौरवगाथा अशीच अविरत सुरू राहील, हा आमचा विश्वास आहे. ■

# लठ्ठपणा : 'वाढता' धोका



डॉ. अनिल शर्मा
बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई



लठ्ठपणा हा आता केवळ दिसण्याचा विषय राहिलेला नाही. लठ्ठपणा स्वतःच एक गंभीर समस्या बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. लठ्ठपणामुळे थेट हृदयावरच परिणाम होतो हे आता सगळ्यांनाच माहीत आहे. त्याचबरोबर हे टाळण्यासाठी काय करायला हवे याकडेही सगळ्यांनीच लक्ष द्यायला हवे.

### लठ्ठपणा नक्की कशाला म्हणतात?

जेव्हा शरीर गरजेपेक्षा जास्त प्रमाणात चरबी साठवत जाते तेव्हा लठ्ठपणाची समस्या निर्माण होते. लठ्ठपणा मोजण्यासाठी बॉडी मास इंडेक्स म्हणजेच बीएमआय हे प्रमाण आहे. बीएमआय

ठरवताना वजन/ उंची$^2$ या सूत्राचा वापर करतात.

जर बीएमआय २५ ते २९ च्या दरम्यान असेल तर तुमची लठ्ठपणाकडे वाटचाल सुरू झाली आहे हे समजायला हरकत नाही. ३० पेक्षा जास्त बीएमआय स्थूलत्व दर्शवतो.

## स्थूलत्व आणि हृदयविकार यांचा संबंध

### स्थूलत्व आणि उच्च रक्तदाब

जास्त वजन असल्यामुळे हृदयाला शरीरामध्ये रक्त 'पंप' करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते, ज्यामुळे रक्तदाब वाढतो.

### कोलेस्टेरॉल वाढणे

स्थूलत्वामुळे वाईट कोलेस्टेरॉल म्हणजे एलडीएल वाढते आणि चांगले कोलेस्टेरॉल म्हणजे एचडीएल कमी होते. यामुळे धमन्यांमध्ये अडथळे निर्माण होतात.

### मधुमेह

स्थूलत्व हे टाईप २ डायबिटीसचे मुख्य कारण आहे. यामुळे भविष्यात हृदयविकाराचा धोका वाढतो.

### करोनरी आर्टरी डिसीज

रक्तवाहिन्यांमध्ये चरबी जमा झाल्यामुळे हृदयापर्यंत रक्ताचा पुरवठा व्यवस्थित होत नाही, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.



### हार्ट फेल्युअर

दीर्घकाळापासूनचे स्थूलत्व असल्यास हृदय कमजोर होते आणि योग्य प्रकारे काम करू शकत नाही.

## स्थूलत्वाचे इतर परिणाम

धाप लागणे

थकवा

सांध्यांमध्ये वेदना

झोपेच्या समस्या

## कोणाला जास्त धोका?

बैठी जीवनशैली असलेले लोक

जंक फूडचे जास्त सेवन करणारे

शारीरिक हालचाली कमी असलेले

ज्यांना हृदयविकाराची कौटुंबिक पार्श्वभूमी आहे असे लोक

## यापासून वाचण्यासाठी काय कराल?

### संतुलित आहार

फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये यांचे सेवन करा. तळलेले पदार्थ आणि गोड पदार्थ कमी करा. मीठ आणि तेल यांचा मर्यादित वापर करा.

### नियमित व्यायाम

रोज कमीत कमी अर्धा तास

जलद गतीने चालणे, सायकलिंग किंवा योगासने

**वजन नियंत्रण**

वजन सावकाश कमी करा. क्रॅश डाएट करू नका

**धूम्रपान आणि मद्यपान यांच्यापासून दूर राहा.**

**नियमित आरोग्य तपासणी**

बीपी, शुगर आणि कोलेस्टेरॉल नियमितपणे तपासा.

## स्थूलपणा कमी करणारी नवीन औषधे : फायदे, तोटे आणि आवश्यक ती सावधगिरी बाळगण्यासाठी...

आजकाल स्थूलत्व हा एक गंभीर आजार मानला जातो. यामुळे मधुमेह, हाय ब्लड प्रेशर, हार्ट अटॅक, फॅटी लिव्हर, पक्षाघात यासारख्या विकारांचा धोका वाढतो. गेल्या काही वर्षांमध्ये वजन कमी करण्यासाठी अनेक नवीन औषधांची चर्चा सुरू असलेली दिसते. विशेषतः जीएलपी १ वर आधारित इंजेक्शन सारख्या उपचारांना वाढती लोकप्रियता लाभत आहे. पण या औषधांना मॅजिक इंजेक्शन समजणे धोक्याचे ठरू शकते. यासाठी योग्य डॉक्टरच्या मार्गदर्शनाखाली योग्य उपचार करणे अतिशय आवश्यक आहे. यामध्ये खालील औषधांचा समावेश होतो.




1. Semaglutide

हे औषध भूक कमी करते. पोट रिकामे होण्याची गती कमी करते आणि त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त खाण्याची इच्छाही कमी होते. जगभरात हे औषध विविध ब्रँड्सच्या अंतर्गत प्रसिद्ध आहे. उदाहरणार्थ Ozempic, Wegovy.

काही अभ्यासांनुसार यामुळे दहा ते पंधरा टक्के वजन कमी होण्याची शक्यता दिसते.

2. Tirzepatide

हे देखील एक नावीन्यपूर्ण औषध आहे, जे जीएलपी वन आणि जीआयपी या दोन्ही हॉर्मोन्स वर काम करते. हे मोंजारो, झेपबाउंड अशा नावाने विकले जाते. यामुळे २० टक्क्यांपर्यंत वजन कमी झाल्याचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत.

याशिवाय retatrutideसारख्या नवीन औषधांवरदेखील संशोधन सुरू आहे. यातदेखील सुरुवातीच्या अहवालानुसार, जास्त प्रमाणात वजन घटण्याची शक्यता दर्शवलेली आहे. परंतु अजून हे औषध जगभरात सर्वत्र नियमित वापरासाठी उपलब्ध झालेले नाही.

### ही औषधे कशी काम करतात?

ही औषधे शरीरातल्या नैसर्गिक हॉर्मोन्सप्रमाणे काम करतात आणि भूक कमी करतात.

लवकर पोट भरल्याचा संकेत देतात.

गोड आणि जास्त खाण्याची क्रेव्हिंग्ज कमी करतात.

ब्लड शुगर नियंत्रित करायला मदत करतात.



### यामुळे कोणाला फायदा होतो?

जर तुमचा बीएमआय खूप जास्त असेल

स्थूलत्वाच्या बरोबरच तुम्हाला मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार असेल,

डाएट आणि व्यायाम यानंतर देखील पुरेशा प्रमाणात फायदा होत नसेल,

तर तुम्हाला या औषधांचा फायदा होईल. अर्थात, जागतिक आरोग्य संघटनेने ही औषधे जीवनशैलीतील बदलांसह वापरण्याचा सल्ला दिलेला आहे. स्वतःच्या मनाने त्यांचा वापर करणे धोक्याचे ठरू शकते. सोशल मीडिया आणि जिम कल्चर यामुळे लोकांनी आता स्वतःची औषधे स्वतःच घेणे सुरू केले आहे. मात्र याचे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात.

### नकली किंवा परवाना नसलेल्या औषधांचे दुष्परिणाम

अपचन, उलट्या होणे, पोटदुखी, थकवा यांसारख्या दुष्परिणामांचा समावेश होतो.

जलदगतीने वजन कमी केल्याने केवळ चरबीच नाही तर मांसपेशीदेखील कमी होतात. त्यामुळे पुरेशा प्रमाणात प्रोटीन, नियमित व्यायाम आणि वैद्यकीय मार्गदर्शनाखाली औषधे घेणे जरुरीचे आहे.

तसेच या औषधांमुळे डोळ्यांच्या गंभीर समस्या देखील निर्माण होतात. यामध्ये अचानक नजर कमजोर होणे, अस्पष्ट दिसणे असे विकार संभवतात. असे झाल्यास ताबडतोब नेत्ररोगतज्ज्ञांची मदत घ्या.

काही रुग्णांमध्ये पित्ताशयात खडे होणे, स्वादुपिंडाला सूज येणे यांसारख्या समस्या आढळतात.

गर्भवती महिलांमध्ये किंवा ज्या गर्भधारणेसाठी प्रयत्नशील आहेत अशा महिलांमध्ये अशा प्रकारच्या औषधांचा उपयोग वैद्यकीय सल्ल्याशिवाय करणे धोक्याचे ठरू शकते.

जर जीवनशैलीत आवश्यक ते बदल केले नाहीत तर ही औषधे बंद केल्यावर वजन पुन्हा वाढायला लागते.

ही औषधे सर्व लोकांसाठी योग्य नाहीत. अनेक रुग्णांमध्ये केवळ आहार, व्यायाम, जीवनशैली, झोप, ताणतणाव नियंत्रण यामध्ये आवश्यक ते बदल करून हवे ते परिणाम मिळतात.

त्यामुळे ही औषधे घेण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन अवश्य घ्या. त्याचप्रमाणे नियमित फॉलोअप ठेवा. जोडीला संतुलित आहार घ्या. व्यायाम सुरू ठेवा. यामुळेच तुम्हाला दीर्घकाळ अपेक्षित परिणाम मिळत राहतील. ■

# डिजिटल व्यसन

## स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा मानवी मनावर होणारा डिजिटल युगातील मनःस्वास्थ्य- आघात



राज दुधाट (पाटील)
शिरोळ
कोल्हापूर

> आजकाल डिजिटल मीडिया न वापरणारा माणूस आढळणे दुर्मीळ आहे. तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे अगदी लांबवरच्या ठिकाणांचे अंतरही या आभासी जगात नाहीसे झाले आहे. पण यामुळे अनेक गोष्टी सोप्या झाल्या असल्या तरी त्याच्या अतिवापराने माणसाला अनेक विकारांनी ग्रासण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यापासून सुटका कशी करून घ्यायची याचे विवेचन सदर लेखात केले आहे.



एकविसाव्या शतकात स्मार्टफोन आणि सोशल मीडिया हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. 'जग मुठीत आणणाऱ्या' या तंत्रज्ञानाने संवाद सोपा केला असला, तरी त्याच्या अतिवापराचे मानवी मानसिकतेवर होणारे परिणाम आता जागतिक चिंतेचा विषय ठरत आहेत. मेंदूची कार्यपद्धती, भावनांची गुंतागुंत आणि सामाजिक वर्तन यांच्यावर त्याचे दूरगामी दुष्परिणाम होत असल्याचे अनेक संशोधनांतून समोर आले आहे. एकविसाव्या शतकात मानवाने तांत्रिकदृष्ट्या अभूतपूर्व प्रगती केली आहे. माहितीचा वेग, संवादाची सुलभता आणि जागतिक पातळीवरची जोडणी यामुळे जग जणू एका हातातील स्क्रीनमध्ये सामावले आहे. स्मार्टफोन आणि सोशल मीडिया हे आधुनिक जीवनाचे अविभाज्य घटक बनले

आहेत. परंतु या सुविधांच्या मागे एक न दिसणारा, पण गंभीर परिणामांचा छुपा प्रवाह वाहात आहे. तो म्हणजे, मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम.

## डिजिटल साधनांचे आकर्षण आणि व्यसनाधीनतेकडे होणारी वाटचाल

स्मार्टफोनचा वापर करताना मिळणारे लाईक्स, कमेंट्स किंवा विविध ॲप्सकडून दिली जाणारी नोटिफिकेशन्स आपल्या मेंदूतील डोपामाईन नावाच्या रसायनाला उत्तेजित करतात. हे रसायन आनंदाची भावना निर्माण करते. यामुळे वापरकर्त्याला वारंवार स्क्रीन पाहण्याची ओढ लागते. यालाच डिजिटल ॲडिक्शन म्हणतात, जे अमली पदार्थांच्या व्यसनाइतकेच घातक ठरू शकते.

स्मार्टफोन हे केवळ संवादाचे साधन राहिलेले नाही. ते मनोरंजन, शिक्षण, व्यवसाय, नातेसंबंध यांचेही केंद्र बनले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आपल्या मेंदूच्या डोपामाईनच्या स्त्रवण्यावर परिणाम करतात. प्रत्येक लाईक, कमेंट, शेअर हा मेंदूसाठी एक छोटा पुरस्कार ठरतो. हीच प्रक्रिया हळूहळू व्यसनात परिवर्तित होते.

या व्यसनामुळे व्यक्तीला सतत फोन तपासण्याची सवय लागते. त्याचे पर्यवसान म्हणजे FOMO (Fear Of Missing Out) काहीतरी महत्त्वाचे चुकत असल्याची भीती मनात घर करते. परिणामी व्यक्ती वर्तमान क्षणात जगण्याऐवजी आभासी जगात अडकून पडते.

## तुलना, असुरक्षितता आणि आत्मसन्मानाचा ऱ्हास

सोशल मीडियावर लोक सहसा आपल्या आयुष्यातील फक्त उत्तम क्षण (Filtered Life) शेअर करतात. हे पाहून सामान्य वापरकर्ता स्वतःच्या साध्या आयुष्याची तुलना इतरांच्या झगमगीत आयुष्याशी करू लागतो. यातून स्वतःबद्दल अपुरेपणाची भावना, न्यूनगंड आणि क्वचितप्रसंगी नैराश्य निर्माण होते.

सोशल मीडियावर दिसणारे जीवन हे वास्तवाचे परिपूर्ण प्रतिबिंब नसते. ते एक सजवलेले, संपादित केलेले आणि आकर्षक रूप असते. लोक आपल्या आयुष्यातील केवळ आनंदाचे, यशाचे आणि सौंदर्याचे क्षणच प्रदर्शित करतात. हे पाहून इतर व्यक्ती नकळत स्वतःशी त्याची तुलना करू लागतात. ही सततची तुलना आत्मसन्मान कमी करते. मी पुरेसा नाही, माझे आयुष्य इतरांइतके सुंदर नाही अशी भावना निर्माण होते. यामुळे नैराश्य, चिंता आणि स्वतःबद्दलची नकारात्मकता वाढते.

## एकाकीपणा आणि नातेसंबंधातील दुरावा


आपण काहीतरी महत्त्वाचे गमावत आहोत का? किंवा इतर लोक माझ्याशिवाय मजा करत आहेत का? या भीतीमुळे व्यक्ती सतत सोशल मीडिया चेक करत राहते. त्यामुळे मानसिक अस्वस्थता, चिडचिड आणि एकाग्रतेचा अभाव निर्माण होतो.

विडंबन असे, की जगाशी जोडणारी ही साधने माणसाला प्रत्यक्षात अधिक एकाकी बनवतात. प्रत्यक्ष संवाद कमी होतो आणि आभासी संवाद वाढतो. चेहऱ्यावरचे भाव, आवाजातील भावना, स्पर्शाची ऊब या सर्व गोष्टी डिजिटल संवादात हरवतात.

कुटुंबातील सदस्य एकाच खोलीत बसूनही प्रत्येकजण आपल्या फोनमध्ये गुंतलेला दिसतो. नात्यांमध्ये संवादाची उणीव निर्माण होते आणि भावनिक दुरावा वाढतो.

## झोपेवर होणारा परिणाम आणि मेंदूवरील ताण

स्मार्टफोनच्या स्क्रीनमधून बाहेर पडणारा ब्लू लाईट (Blue Light)



शरीरातील मेलाटोनिन या झोपेच्या संप्रेरकावर परिणाम करतो. रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरल्याने झोपेचे चक्र बिघडते. अपुऱ्या झोपेमुळे मानसिक थकवा, विसरभोळेपणा आणि गंभीर डोकेदुखीचे विकार जडतात.

स्मार्टफोनचा अतिवापर विशेषतः रात्री झोपण्यापूर्वी केल्यास झोपेची गुणवत्ता कमी होते. स्क्रीनमधून येणारा 'ब्लू लाईट' मेंदूला सतर्क ठेवतो, ज्यामुळे झोपेचे चक्र बिघडते.

झोपेअभावी एकाग्रता कमी होते, चिडचिड वाढते आणि मानसिक थकवा जाणवतो. दीर्घकाळ असेच सुरू राहिल्यास मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात.

## माहितीचा अतिरेक आणि मानसिक थकवा

रील्स, शॉर्ट्स आणि सतत बदलणारा फीड यांमुळे मानवी मेंदूची एका गोष्टीवर दीर्घकाळ लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी होत चालली आहे. याला 'शॉर्ट अटेन्शन स्पॅन' म्हणतात, ज्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर आणि नोकरी करणाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर होत आहे.

आजच्या काळात माहितीचा स्फोट झाला आहे. सतत येणाऱ्या बातम्या, नोटिफिकेशन्स, व्हिडिओज यामुळे मेंदूवर सतत ताण येतो. प्रत्येक माहितीवर प्रतिक्रिया देण्याची गरज वाटते. यामुळे मेन्टल ओव्हरलोड म्हणजेच मानसिक भार वाढतो.

हा अतिरेक व्यक्तीच्या विचारशक्तीवर परिणाम करतो. निर्णय घेण्याची क्षमता कमी होते आणि मन




सतत अस्वस्थ राहते.

## उपाय - संतुलन आणि सजगता

या सर्व दुष्परिणामांवर उपाय म्हणजे तंत्रज्ञानाचा पूर्ण त्याग नव्हे, तर त्याचा संतुलित आणि सजग वापर होय. मानसिक आरोग्य जपण्यासाठी खालील पावले उचलणे आवश्यक आहे.

–स्क्रीन टाईम मर्यादा: दिवसातील ठरावीक वेळच मोबाईलसाठी राखीव ठेवा. दिवसातील स्क्रीन टाइम मर्यादित ठेवणे आरोग्यासाठी आवश्यक आहे.

– नोटिफिकेशन्स बंद करणे: अनावश्यक ॲप्सचे नोटिफिकेशन्स बंद ठेवा, जेणेकरून तुमचे लक्ष विचलित होणार नाही. झोपण्यापूर्वी किमान एक तास फोनपासून दूर राहाणे आवश्यक आहे.

–प्रत्यक्ष संवाद: सोशल मीडियावरील चॅटिंगऐवजी मित्र आणि कुटुंबियांना प्रत्यक्ष भेटा. प्रत्यक्ष संवाद आणि नातेसंबंधांना प्राधान्य देणे ही आजच्या डिजिटल युगात अत्यंत महत्त्वाची बाब झाली आहे.


– डिजिटल डिटॉक्सचे नियोजन करणे

– स्वतःच्या भावना ओळखून त्यावर काम करणे.

– नो–फोन झोन: जेवताना आणि झोपण्यापूर्वी किमान एक तास मोबाईलपासून दूर राहा.

तंत्रज्ञान हे माणसाच्या प्रगतीसाठी आहे; गुलामगिरीसाठी नाही. स्मार्टफोनचा वापर साधन म्हणून करणे फायद्याचे आहे. परंतु त्याला आयुष्य बनवणे हे मानसिक आरोग्यासाठी विनाशाचे कारण ठरू शकते. त्यामुळे डिजिटल जगात वावरताना विवेकाची साथ असणे ही काळाची गरज आहे.

म्हणूनच या डिजिटल साधनांचा वापर करताना सजगता, आत्मनियंत्रण आणि संतुलन राखणे अत्यंत आवश्यक आहे. कारण शेवटी तंत्रज्ञान हे मानवासाठी आहे, मानव तंत्रज्ञानासाठी नाही. ■



उत्तम सदाकाळ
जुन्नर

# सर्जा



सकाळपासून पावसाची संततधार सुरू होती. आभाळ फाटल्यागत पाऊस कोसळत होता. मुसळधार कोसळणाऱ्या पावसामुळे शिवारातली नदी दुथडी भरून वाहत होती. ढगफुटी झाल्यागत कोसळणाऱ्या पावसामुळे नदीच्या पात्रात पाणी मावत नव्हते. हळूहळू ते आजूबाजूच्या शेतात शिरू लागले होते. उभ्या पिकांना पाण्याचा वेढा पडू लागला होता.

अशा भरपावसात मनाजी आपल्या बायकापोरांसह पडाळीत चिंतातुर अवस्थेत बसला होता. जसजसा पावसाचा जोर वाढत होता, तसतसा मनाजी हवालदिल होत होता. मनाजीची पडाळ नदीजवळच्या शेतात होती. पडाळीच्या एका बाजूने नदी वाहत होती. तर दुसऱ्या बाजूने ओढा वाहत

होता. धुवाँधार पावसामुळे नदीचे पाणी शेतात शिरले होते. आणि ओढासुद्धा नेहमीपेक्षा वेगाने वाहायला लागला होता. त्यामुळे मनाजी दुहेरी संकटात सापडला होता. पाऊस थांबायचं नाव घेईना तशी मनाजीची बायको त्याला म्हणाली,

''अहो, इथं पडाळीत असं हातावर हात धरून बसणं धोक्याचं हाय. नदीचं पाणी पार शेजारी येऊन पोहोचलंय. ओढासुद्धा भरून वाहायला लागलाय. पाऊस जर असाच पडत राहिला, तर ओढ्याचं आणि नदीचं पाणी पडाळीला भिडंल. मग आपल्याला काही करता येणार नाही. तवा आत्ताच काहीतरी हालचाल करा.''

मनाजीला बायकोचे बोलणे पटले. नदीच्या पुरात सापडण्यापेक्षा वेळीच दूर गेलेले बरे, असा विचार करून तो बायकोला म्हणाला,

''तुझं बरोबर हाये. पाणी कवाबी पडाळीला लागंल. त्याच्याआधी आपण इथून बाहेर पडू.'' असे म्हणत दोन्ही मुलांना घेऊन दोघे नवरा बायको पडाळीबाहेर पडले. भरपावसात ते ओढ्यापलीकडे असणाऱ्या उंच टेकडीकडे निघाले.

ओढ्याजवळ येईपर्यंत नदीचे पाणी पडाळीपासून पाच दहा पावलांवर येऊन पोहोचले होते. मनाजीने एकेक करून दोन्ही मुलांना खांद्यावर घेऊन ओढ्यापलीकडे नेऊन सोडले. कमरेइतक्या पाण्यातून सावधपणे पुढे होत त्याने बायकोलाही सुरक्षित जागी पोहोचवले.

उंच भागात आल्याने आता त्यांना चिंता नव्हती. पुराचे पाणी

> **गोठ्यात सर्जा राजा तसेच राहिलेत. त्यांना सोडवायला पाहिजे. त्यांना इकडे घेऊन यायला पाहिजे. आपल्या सुखदु:खात साथ दिलेल्या त्या मुक्या जिवांना आसं संकटात सोडून कसं चालंल? त्यांना सोडवायला पाहिजे.**

त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नव्हते. पावसात चिंब झालेला मनाजी पडाळीकडे पाहात असताना अचानक त्याला काहीतरी आठवले. तसा तो बायकोला म्हणाला,

''शांता, तू पोरांना घेऊन त्या झाडाखाली थांब. मी पटकन पडाळीकडे जाऊन येतो.''

नवऱ्याचे बोलणे ऐकून शांता चक्रावली. गोंधळून जात ती मनाजीला म्हणाली,

''कशाला जाताय आता तिकडं? पडाळीत राहिलेलं माझं दागदागिनं आणायला जात आसाल तर मुळीच जाऊ नका. जिवापेक्षा ते महत्त्वाचे नाहीत. एकतर पाणी आसं वाढत चाललंय. त्यात तुम्हाला पोहोता येत नाही. दागिन्यांसाठी उगाच जीव धोक्यात घालू नका.''

''दागिन्यांसाठी नाही जात गं तिकडं. आपण सुरक्षित बाहेर आलोय. पण गोठ्यात सर्जा राजा तसेच राहिलेत की! त्यांना सोडवायला पाहिजे. त्यांना इकडे घेऊन यायला पाहिजे. आपल्या सुखदु:खात साथ दिलेल्या त्या मुक्या जिवांना आसं संकटात सोडून कसं चालंल? जिवाच्या भीतीने मी तिकडे गेलो नाही तर माझे बैल पुरात अडकतील गं! त्यांना सोडवायला पाहिजे. तू माझी काळजी करू नको. मी हा गेलो आणि हा आलो.'' मनाजी शांताला समजावत म्हणाला.

''अरे देवा! खरंच की. आपले सर्जा राजा गोठ्यातच राहिले की! जावा तुम्ही. पटदिशी सोडून आणा त्यांना. घरातलं दुसरं काही आणू नका. आपल्या सर्जा राजाला तेवढं घेऊन या.'' शांता बैलांच्या काळजीने मनाजीला म्हणाली. पण तिचे बोलणे ऐकायला मनाजी तिथे थांबलाच नव्हता. तो वेगाने पडाळीच्या दिशेने निघाला होता. मनाजी पडाळीजवळ पोहोचला तेव्हा पडाळीला पाण्याने वेढा दिला होता. पाणी वेगाने वर चढत होते. मनाजी घाईघाईने गोठ्यात शिरला. मनाजीला बघताच दोन्ही बैल दाव्याला हिसके मारू लागले. मालक आपल्याला सोडवायला आले हे बघून त्यांना सुटण्याची भलतीच घाई झाली होती.

गोठ्यात साठलेल्या पाण्यातून पुढे होत मनाजीने दोन्ही बैलांना सोडवले. त्यांना बाहेर आणले. बाहेर पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. मनाजीने दाराकडे पाहिले आणि काळजावर दगड ठेवून तो बैलांना घेऊन पुढे निघाला.

ओढ्याजवळ येताच मनाजीच्या काळजात धस्स झाले. ओढा तुडुंब भरून वेगाने वाहत होता. आता वेळ दवडून उपयोग नव्हता. मनाजी बैलांना घेऊन ओढ्याच्या प्रवाहात शिरला. पाण्याला जोरदार वेग होता. मगाशी कमरेइतके असणारे पाणी आता पार छातीला लागत होते. पोहता न

येणारा मनाजी मनाचा हिय्या करून बैलांना घेऊन पुढे निघाला.

बैल सरावल्यागत पाण्यातून पोहत बाहेर आले. पण मनाजीला मात्र पाण्याच्या वेगामुळे पुढे सरकता येईना. तो ओढ्याच्या मध्यभागी येऊन अडकला होता. त्याला धड पुढे जाता येईना; की मागे जाता येईना. टेकडीवरील झाडाखाली थांबलेली शांता नवऱ्याची अवस्था बघत होती. पाण्यात अडकलेल्या नवऱ्याला बघून भीतीने तिच्या काळजात कालवाकालव सुरू झाली होती. सर्जा आणि राजा काठावर उभे राहून आपल्या मालकाची वाट बघत होते.

मनाजीला मात्र ओढ्याच्या पाण्यातून पुढे येता येत नव्हते. एव्हाना त्याच्या खांद्यापर्यंत पाणी चढले होते. त्यामुळे तो घाबरून गेला होता. अशातच त्याचा पाय निसटला आणि घात झाला... मनाजी पाण्यात कोसळला. तो पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून जाऊ लागला. टेकडीवरून शांताने ते दृश्य बघितले आणि हंबरडा फोडत ती ओढ्याच्या दिशेने धावली.

पाण्यात कोसळलेल्या मनाजीच्या नाकातोंडात पाणी गेले होते. त्यामुळे तो गुदमरला होता. त्याला काय करावे ते सुचत नव्हते. जिवाच्या आकांताने तो तशाही अवस्थेत हात पाय मारत पोहोण्याचा प्रयत्न करू लागला. पण पाण्याच्या वेगापुढे त्याचे काही चालले नाही आणि तो वेगाने वाहून जाऊ लागला.

काठावर थांबलेल्या सर्जाने वाहून जाणाऱ्या मनाजीला पाहिले

> **मोठ्या शर्थीने सर्जा मनाजीला घेऊन काठावर पोहोचला. जमिनीला पाय लागताच मनाजीने सर्जाची शेपटी सोडली. कसाबसा धडपडत तो पाण्याच्या बाहेर आला. पाण्याच्या बाहेर येताच त्याने बाहेर उभ्या असलेल्या सर्जाला मिठी मारली.**

आणि क्षणार्धात त्या मुक्या जिवाला धोक्याची कल्पना आली. मग मागचा पुढचा विचार न करता सर्जाने थेट ओढ्याच्या पाण्यात झेप घेतली. पाण्यात वाहून चाललेल्या मालकाला गाठण्यासाठी तो सर्वशक्तीनिशी पोहोत निघाला.

जीव वाचविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणाऱ्या मनाजीने सर्जाला जवळ येताना पाहिले. तसा त्याच्या जीवात जीव आला आणि मग तो ही सर्जाजवळ जाण्याचा प्रयत्न करू लागला. बऱ्याच प्रयत्नांनी सर्जा मनाजीजवळ पोहोचला. प्रसंगावधान राखत मनाजीने सर्जाची शेपटी पकडली. मालकाने आपली शेपटी घट्ट पकडली आहे हे लक्षात येताच सर्जा वेगाने काठाकडे निघाला. तो जोरजोराने पायांची हालचाल करत पाणी कापू लागला.

मोठ्या शर्थीने सर्जा मनाजीला घेऊन काठावर पोहोचला. जमिनीला पाय लागताच मनाजीने सर्जाची शेपटी सोडली. कसाबसा धडपडत तो पाण्याच्या बाहेर आला. पाण्याच्या बाहेर येताच त्याने बाहेर उभ्या असलेल्या सर्जाला मिठी मारली आणि गदगदलेल्या स्वरात तो सर्जाला म्हणाला,

''सर्जा, देवासारखा मदतीला धावलास रे! तू होतास म्हणून मी वाचलो. नाहीतर मला इथे जलसमाधी मिळाली असती.''

गळ्याला मिठी मारून रडणाऱ्या मालकाला बघून सर्जाचेही डोळे भरून आले. मनाजी काय बोलला हे त्या बिचाऱ्या जिवाला कळले की नाही, देव जाणे. पण मालकाला दुवा देत सर्जा मनाशीच म्हणत होता,

''मालक, स्वतःच्या जिवाची पर्वा न करता तुम्ही आम्हाला सोडवायला आलात. तुम्ही देवासारखे धावलात म्हणून आम्ही वाचलो, नाहीतर गोठ्यात आम्हाला जलसमाधी घ्यावी लागली असती.''

मनाजी आणि सर्जा दोघेही कृतज्ञता व्यक्त करत एकमेकांच्या गळ्यात पडून रडत होते. शेतकरी आणि त्याची मुकी जनावरे मायेच्या धाग्यांनी कशी बांधलेली असतात हे त्या दोघांकडे बघून कळत होते. त्या दोघांना काठावर सुखरूप पोहोचलेले बघून धावत येणारी शांताही त्यांच्या गळ्यात पडून स्फुंदून म्हणत होती,

''सर्जा, आज माझं कुंकू शाबूत ठेवलंस तू! मालकाच्या जिवासाठी स्वतःचा जीव धोक्यात घातलास रे तू! सर्जा, तुझे हे उपकार मी जन्मभर विसरणार नाही.''

धो धो कोसळणाऱ्या पावसात एकमेकांना बिलगलेल्या त्या तिघांच्याही डोळ्यात मायेचा पूर दाटला होता आणि त्याचवेळी मनाजीच्या पडाळीभोवती मात्र नदीचा विळखा घट्ट होत चालला होता. ■

लेख

# विभक्त कुटुंबपद्धती आणि हरवत चाललेले संस्कार



कविता पेन्शनवार
नाशिक

आजकाल भारतीय समाजात पूर्वीची संयुक्त कुटुंबपद्धती लयाला जाताना आढळून येते. संयुक्त कुटुंबपद्धतीकडून विभक्त कुटुंबपद्धती अंगिकारत असताना त्यातील तोट्यांचा अनेकदा सामना करावा लागतो. भविष्यात येणाऱ्या संकटांना आपण कशाप्रकारे सामोरे जायला हवे? त्यासाठी कोणती उपाययोजना करायची यावर सदर लेखात भाष्य केले आहे.



## आजी-आजोबांच्या मायेची उणीव आणि समाजाचे भवितव्य

आधुनिक भारताच्या सामाजिक संरचनेत गेल्या काही दशकांमध्ये एक मूलभूत परिवर्तन घडून आले आहे. पारंपरिक संयुक्त कुटुंबपद्धती हळूहळू मागे पडत चालली आहे आणि तिच्या जागी विभक्त (न्यूक्लिअर) कुटुंबपद्धतीने

आपले स्थिर पाय रोवले आहेत. शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि आधुनिक जीवनशैलीच्या मागे लागलेली तरुण पिढी गावाकडून शहरांकडे स्थलांतरित झाली आहे. या प्रक्रियेत आर्थिक प्रगती झाली, जीवनमान उंचावले; पण त्याच वेळी नातेसंबंधांचे धागे सैल झाले आणि सर्वात मोठा परिणाम झाला तो लहान मुलांची भावनिक आणि नैतिक जडणघडण यांच्यावर.

## संयुक्त कुटुंबपद्धती - एक जीवनशाळा

पूर्वीचे संयुक्त कुटुंब हे केवळ एकत्र राहण्याचे साधन नव्हते. ते एक जिवंत 'संस्कारकेंद्र' होते. घरात आजी-आजोबा, काका-काकू, चुलत भाऊ-बहिणी आणि प्रामुख्याने आत्या अशी विविध नाती एकत्र नांदत असत. या नात्यांमधील सातत्याने चालणारे संवाद, अनुभव आणि परंपरा यांमधून मुलांची जडणघडण होत असे. आजी-आजोबा हे या कुटुंबव्यवस्थेचे हृदय होते. त्यांच्या गोष्टी, त्यांचे जीवनानुभव, त्यांच्या बोलण्यातले शहाणपण हे सर्व मुलांच्या मनावर खोल परिणाम करत असे. रात्री झोपताना सांगितलेल्या गोष्टी केवळ मनोरंजन नव्हत्या, तर त्या मूल्यांचे, नैतिकतेचे आणि संस्कारांचे बीज पेरणाऱ्या होत्या.

## हरवलेली मायेची ऊब आणि संस्कारांचे संचित

आजचे युग हे वेगवान प्रगतीचे आणि जागतिकीकरणाचे युग आहे. नोकरी, व्यवसाय आणि उच्च राहणीमानाच्या शोधात तरुण पिढीने शहरांची वाट धरली. या स्थलांतरामुळे विभक्त कुटुंब ही संकल्पना रूढ झाली. मात्र, या भौतिक प्रगतीच्या प्रवासात आपण आपल्या पुढच्या पिढीचे, लहान मुलांचे खूप मोठे भावनिक नुकसान करत आहोत का? याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

## आजी-आजोबा: संस्कारांची चालती-बोलती विद्यापीठे

पूर्वीच्या एकत्र कुटुंब पद्धतीत

> **पूर्वीचे संयुक्त कुटुंब हे केवळ एकत्र राहण्याचे साधन नव्हते. ते एक जिवंत 'संस्कारकेंद्र' होते. घरात आजी-आजोबा, काका-काकू, चुलत भाऊ-बहिणी आणि प्रामुख्याने आत्या अशी विविध नाती एकत्र नांदत असत. या नात्यांमधील संवाद, अनुभव आणि परंपरा यांमधून मुलांची जडणघडण होत असे.**

आजी-आजोबा हे घराचे आधारस्तंभ असत. मुलांसाठी ते केवळ संगोपन करणारे नसून, मूल्यांचे आणि संस्कारांचे शिशुवर्ग असत. त्यांच्या गोष्टींमधून मिळणारे नीतिमत्ता, संयम, सहिष्णुता आणि आदरातिथ्य यांचे मिळणारे धडे मुलांच्या मनावर कायमचे कोरले जात. आज शहरात राहणारी मुले या मायेच्या ऊबेला आणि अनुभवाच्या शिदोरीला पारखी झाली आहेत.

## विभक्त कुटुंबपद्धतीचे परिणाम

आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आई-वडील दोघेही नोकरीत व्यस्त असतात. शहरातील धावपळ, मर्यादित जागा आणि वेळेची कमतरता या सर्व गोष्टींमुळे मुलांचे संगोपन ही केवळ दैनंदिन जबाबदारी बनली आहे. आजी-आजोबांशी असलेला संपर्क फोन किंवा व्हिडिओ कॉलपुरता मर्यादित राहिला आहे.

यामुळे मुलांना मिळणारी भावनिक ऊब कमी झाली आहे. त्यांना नात्यांचे महत्त्व, सहजीवनाचे मूल्य, संयम, आदर, कृतज्ञता यांसारखे गुण प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी कमी मिळते.

## भावनिक पोकळी

आई-वडील दोघेही नोकरीच्या निमित्त बाहेर असल्यास, मुलांचा जास्तीत जास्त वेळ पाळणाघरात किंवा मोबाईल/ टीव्हीसमोर जातो. यामुळे मुलांमध्ये एकटेपणा आणि भावनिक असुरक्षितता निर्माण होत आहे.

## संवादाचा अभाव

नातेवाईकांबरोबरचा संपर्क तुटल्यामुळे मुलांना नात्यांमधील ओलावा, त्याग आणि एकमेकांना सांभाळून घेण्याची वृत्ती म्हणजे

काय, हे कळेनासे झाले आहे.

### डिजिटल व्यसन

मोठ्यांचे मार्गदर्शन व साथ नसल्यामुळे मुले आभासी जगात गुरफटत चालली आहेत, जे त्यांच्या सुदृढ मानसिक वाढीसाठी घातक आहे.

### संस्कारांची उणीव आणि त्याचे दुष्परिणाम

संस्कार ही केवळ शिकवण्याची गोष्ट नाही, ती जगण्याची प्रक्रिया आहे. जेव्हा मुलांना मोठ्यांचा सहवास मिळत नाही, तेव्हा त्यांची मूल्यव्यवस्था कमकुवत होते. आज अनेक मुलांमध्ये वाढती असहिष्णुता, आत्मकेंद्रीपणा, अधीरता आणि भावनिक असंतुलन दिसून येते.

याशिवाय, आजी-आजोबांच्या सहवासातून मिळणारी निःस्वार्थ प्रेमाची अनुभूतीही मुलांना मिळत नाही. हे प्रेमच मुलांच्या आत्मविश्वासाला आणि भावनिक स्थैर्याला बळकटी देणारे असते.

### सुदृढ समाजासाठी उपाययोजना

ही परिस्थिती निश्चितच काळजी वाढवणारी आहे, परंतु काही जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास आपण ही दरी सांधू शकतो.

### व्हर्च्युअल नाती नव्हे, प्रत्यक्ष सहवास

तंत्रज्ञानाचा वापर केवळ व्हिडिओ कॉलसाठी न करता, सुट्ट्यांमध्ये मुलांना आवर्जून गावी किंवा आजी-आजोबांकडे पाठवावे. त्यांना मातीशी आणि नात्यांशी जोडू द्यावे.

> **संस्कार ही केवळ शिकवण्याची गोष्ट नाही, ती जगण्याची प्रक्रिया आहे. जेव्हा मुलांना मोठ्यांचा सहवास मिळत नाही, तेव्हा त्यांची मूल्यव्यवस्था कमकुवत होते. आज अनेक मुलांमध्ये वाढती असहिष्णुता, आत्मकेंद्रीपणा, अधीरता आणि भावनिक असंतुलन दिसून येते.**

### कौटुंबिक गेट-टुगेदर

वर्षातून किमान दोनदा सर्व नातेवाईकांनी एकत्र येण्याचे नियोजन करावे. यामुळे मुलांना मोठे कुटुंब आणि त्यातील सुरक्षितता यांचा अनुभव येईल.

### गोष्टींची परंपरा पुनरुज्जीवित करणे

पालकांनी स्वतः वेळ काढून मुलांना पौराणिक, ऐतिहासिक आणि संस्कारक्षम गोष्टी सांगाव्यात. आजी-आजोबांनाही मुलांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या निर्णयांत सहभागी करून घ्यावे.

### आंतरपिढी संवाद

जर आजी-आजोबा सोबत राहत नसतील, तर आपल्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले यांच्यासाठी एकत्र उपक्रम राबवावेत.

### तंत्रज्ञानाची जागा, पण ऊब नाही

आजच्या मुलांच्या आयुष्यात स्मार्टफोन, टॅब्लेट आणि इंटरनेट यांनी मोठी जागा घेतली आहे. वेळ मिळाला, की ते स्क्रीनकडे वळतात. तिथे त्यांना मनोरंजन मिळते, माहिती मिळते पण माया मिळत नाही. आजी-आजोबांच्या कुशीत बसून ऐकलेल्या गोष्टींची, त्यांच्याकडून मिळालेल्या प्रेमाची तुलना कोणतेही तंत्रज्ञान करू शकत नाही. तंत्रज्ञान जोडते, पण जिव्हाळा निर्माण करत नाही.

### समाजाच्या आरोग्यावर होणारा परिणाम

सुदृढ समाज घडवण्यासाठी केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नसते. त्यासाठी मजबूत मूल्यव्यवस्था आणि भावनिकदृष्ट्या स्थिर पिढी आवश्यक असते. जर लहान वयातच मुलांना योग्य संस्कार मिळाले नाहीत, तर भविष्यात समाजात अस्थिरता, स्वार्थीपणा आणि नैतिक अधःपतन वाढण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच आजची परिस्थिती ही केवळ कुटुंबाची समस्या नाही, तर संपूर्ण समाजाच्या भवितव्याशी संबंधित

एक गंभीर प्रश्न आहे.

## विशेष उपाययोजना – परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल

या समस्येवर उपाय म्हणून पूर्णपणे भूतकाळात जाणे शक्य नाही, पण काही जाणीवपूर्वक प्रयत्न नक्कीच करता येतात.

प्रथम, पालकांनी आपल्या मुलांना आजी–आजोबांच्या नियमित संपर्कात ठेवणे आवश्यक आहे. शक्य असेल तेव्हा सुट्ट्यांमध्ये गावाला जाणे, त्यांच्यासोबत वेळ घालवणे याला प्राधान्य द्यावे.

दुसरे म्हणजे, घरात ‘संवादाची संस्कृती’ निर्माण करणे गरजेचे आहे. गोष्टी सांगणे, एकत्र जेवण करणे, अनुभव शेअर करणे या छोट्या गोष्टी मोठा फरक घडवू शकतात.

तिसरे म्हणजे, शाळा आणि समाजानेही या दिशेने पुढाकार घ्यावा. ‘ग्रँड पॅरेंट्स डे’, संस्कारवर्ग, कथाकथन कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे मुलांना या मूल्यांशी जोडता येईल.

## पालकांची भूमिका

मुलांना महागडी खेळणी आणि गॅझेट्स देण्यापेक्षा त्यांना वेळ देणे अधिक महत्त्वाचे आहे. संस्कार हे शिकवून येत नाहीत, तर ते मोठ्यांच्या वागण्यातून मुले आत्मसात करत असतात. घरातील मोठ्यांचा आदर करणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे हे आपण आपल्या कृतीतून मुलांना दाखवून दिले पाहिजे.

## समारोप

विभक्त कुटुंबपद्धती ही काळाची गरज असली, तरी तिचे दुष्परिणाम लक्षात घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. आजी–आजोबांच्या मायेची ऊब, त्यांच्या अनुभवांचे शहाणपण आणि त्यांच्या सहवासातून मिळणारे संस्कार ही मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अमूल्य संपत्ती आहे.

> **मुलांना महागडी खेळणी आणि गॅझेट्स देण्यापेक्षा त्यांना वेळ देणे अधिक महत्त्वाचे आहे. संस्कार हे शिकवून येत नाहीत, तर ते मोठ्यांच्या वागण्यातून मुले आत्मसात करत असतात. घरातील मोठ्यांचा आदर करणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे हे आपण आपल्या कृतीतून मुलांना दाखवून दिले पाहिजे.**

जर आपण ही संपत्ती जपली नाही, तर आपण केवळ नातीच गमावणार नाही, तर एक सुदृढ समाज घडवण्याची संधीही गमावू. म्हणूनच, आधुनिकतेच्या वाटचालीत परंपरेची साथ सोडू नये. कारण त्या परंपरेतच आपल्या भविष्यातील पिढीचे खरे बळ दडलेले आहे.

आजची लहान मुले हे उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. एक सुदृढ समाज घडवण्यासाठी केवळ तांत्रिक कौशल्ये पुरेशी नाहीत, तर त्याला माणुसकी आणि संस्कारांची जोड असणे आवश्यक आहे. आजी–आजोबांचे प्रेम आणि मोठ्यांचे आशीर्वाद हे मुलांच्या सर्वांगीण विकासाचे अमृत आहे. ते त्यांना मिळवून देणे ही प्रत्येक पालकाची नैतिक जबाबदारी आहे.

आधुनिक काळात नोकरी सांभाळून मुलांना आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवण्यासाठी पालकांनी आणखी काही नाविन्यपूर्ण अभिनव मार्ग स्वीकारायला हवेत. ■

लेख



भारती सावंत
नवी मुंबई

# वैशाखातील सृष्टीसौंदर्य



**जाणवतो वैशाख दाह**
**वसंत ऋतूचे आगमन**
**पानगळ होई पल्लवांची**
**नवनिसर्गाचे करू वर्णन**

वसंताची चाहूल लागते, पानगळ झाल्यामुळे वृक्षांचा वाळलेला पालापाचोळा वृक्षतळी पडलेला दिसतो. वावटळ आली की भोवऱ्याप्रमाणे वारा घोंगावताना हा पाचोळा खुळखुळ्यासारखा वाजत गोल गोल फिरत राहतो आणि कुठेतरी जाऊन भुईवर पडतो. कोकिळेची मधुर कुहूकुहूची सुरावट

आम्रवृक्षावरून कानावर पडते आणि त्यावर बहरलेला मोहोर नासिकांना पुलकित करतो. आम्रवृक्षाच्या दाट छायेत लवंडल्यावर वैशाखदाहही मंदावतो. आजूबाजूला असणाऱ्या जांभूळ, फणस, चिंचा, बोरे या फळांनी लगडलेले वृक्ष वैशाखाची जाणीव करून देतात. उन्हातून थकून भागून आलेल्या पांथस्थाला कैरीचे पन्हे, कोकम सरबत, वाळ्याचे पाणी तसेच लिंबू सरबत प्यायला देऊन श्रमपरिहार केला जातो. उन्हाळी पापड, कुरडया, सांडगे, भातवड्या हे पदार्थ वैशाखाच्या उन्हांत बनवून वाळवले जातात आणि डबे भरून वर्षभराचा साठा केला जातो. गहू, ज्वारी, कडधान्ये डाळी वाळवून हवाबंद कोठारात निगुतीने वर्षभरासाठी साठवली जातात.

उन्हांच्या झळांपासून संरक्षण व्हावे म्हणून दरवाजाला वाळ्याचे पडदे लावले जातात. करवंदाच्या जाळ्या हिरव्या फळांनी भरलेल्या दिसतात. कैऱ्या पाडून खाण्यासाठी पोरेबाळे आंब्याच्या वृक्षाला दगड मारून ओरबाडत राहतात. पाडाला लागलेला चुकारीचा आंबा पोपट, साळुंक्या आपल्या चोचीने टोचून गर खाऊन घेतात. हळदुल्या बहाव्याचा पिवळाधमक सडा वृक्षतळी पडून सारा परिसर हळदीने माखल्यासारखा भासतो. फांद्यांमधून वाहणारा थंडगार वारा मनाला आल्हाददायक वाटतो आणि मन प्रफुल्लित होऊन जाते.

**उन्हांच्या झळांपासून संरक्षण व्हावे म्हणून दरवाजाला वाळ्याचे पडदे लावले जातात. करवंदाच्या जाळ्या हिरव्या फळांनी भरलेल्या दिसतात.**

गुलमोहराची पिवळसर लालभडक फुले वृक्षावर आग लागल्याप्रमाणे भासतात. सगळीकडे नाना रंगांच्या, गंधाच्या फुलांचा घमघमाट सुटलेला असतो. वनराई नव्या गंधवर्णात अगदी सजलेल्या नवरीप्रमाणे भासते. वसंतात फुललेली वृक्षराजी उन्हामुळे कोळपून गेल्यासारखी वाटते, पण त्यातही दिसणारी नाना रंगसंगती मन मोहून घेते. शाळांना परीक्षा संपून उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागलेल्या असतात. उष्णतेच्या त्रासामुळे दुपारच्या वेळेत घराबाहेर न पडता मुलेबाळे घरातच बसून पत्ते, चेस, कॅरम यासारखे खेळ मांडतात. अक्षयतृतीयेचा सण वैशाखातच साजरा केला जातो. आमरस पोळीचा नैवेद्य दाखवून पाहुण्यारावळ्यांसोबत मिष्टान्नाचा आस्वाद घेतला जातो.

चैत्रातील अल्लड निसर्ग वैशाखात अंगोपांगी बहरलेला, फुललेला दिसतो. पानगळ झालेली वृक्षराजी पोपटी पल्लवांचा भार सांभाळत पुन्हा नव्याने खुललेली दिसते. या कोवळ्या पालवीमधून वाहणारा वारासुद्धा धुंद होऊन आपल्याच मस्तीत वाहताना दिसतो. वाऱ्याच्या झोताने गळालेल्या फुलांचा सडा वृक्षतळाला भारावून टाकतो. सकाळच्या कोवळ्या उन्हाचे प्राशन करताना दुपारच्या उन्हाच्या झळा सोसत वड, पिंपळ, उंबर यांच्या छोट्या रसाळ फळांवर विविध प्रकारचे पक्षी वृक्षांवर गर्दी करताना दिसतात. पहाटेला हवेत गारवा असताना अंगणातील वृक्षांवर बसून आपल्या मंजुळ किलबिलीने मनाला थंडावा देणारे खगगण आईने पहाटे जात्यावर बसून ओव्या गात असल्याप्रमाणे भासतात.

कावळे, घारी, सुतार पक्षी, क्रौंच, बुलबुल, मैना हेदेखील मातीतील किडे खाण्यासाठी झाडांखाली टुणटुण उड्या मारताना दिसतात. मध्येच कलकल आवाज करत वृक्षांवरील पक्षी एकमेकांशी भांडत, पंखांची फडफड करत इकडे तिकडे उडताना दिसतात. आंब्याफणसाच्या गोड रसाळ वासाने पक्षी धुंद होऊन त्याच्यावर चोची मारू लागतात. बकुळ, मोगरा, चाफा, बहावा, पलाश रंगीबेरंगी सौंदर्याने मन मोहून घेतात. रातराणी, चंपा, निशिगंध त्यांच्या मदमस्त सुवासाने सारा परिसर गंधाळून टाकतात. झाडावरच्या छोट्या शेंगा, फुलोरा पानांआडून डोकावताना दिसतो. वैशाखात पाण्याची कमतरता असूनही सृष्टी सौंदर्याने सजलेली दिसते. कडूनिंब पिवळ्या छोट्या निंबोळ्यांनी



भरलेला दिसतो. बकुळीच्या पुष्पांचे गुच्छ जणूकाही वृक्षांवर तारकांचे पुंजके लगडल्याप्रमाणे भासतात. सोनपिवळ्या फुलांनी परिसराला बेधुंद केल्याप्रमाणे वाटते. बहाव्याचा पायवाटेवरील सडा पाहून असे वाटते, की सृष्टीने स्वनिर्मितीच्या पायघड्या घालून तिचे सौंदर्य हे नष्ट करण्यासाठी नसून डोळे भरून पाहण्यासाठी आहे असेच मानवाला सूचित केले आहे. पानांचे विविध रंग पाहून ही फुले आहेत की पाने असा संभ्रम व्हावा. ती कोवळी पाने वाऱ्याने पताकाप्रमाणे डोलताना दिसतात. सृष्टीचे हे मनोहारी रूप डोळ्यात साठवून घ्यावे असेच वाटते. राघू, मैना, साळुंक्या,

> **चुकारीच्या काळ्या ढगांतून पावसाच्या थोड्या सरी जमिनीवर पडताच मातीचे थेंब तरारून उठतात आणि मृदगंध अत्तराप्रमाणे सारा परिसर भारून टाकतो.**

चिमण्या, दयाळ, तितर, बुलबुल एकापाठोपाठ एक ताना लावत असतात. खारूताई एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर तुरुतुरु पळत आपल्या दातांनी कुरतडत फळांचा आस्वाद घेत असतात. निसर्गाचा हा चमत्कार पाहून उष्णतेचा दाहदेखील कमी व्हावा!

आकाशात कधीकधी विद्युल्लतेचे तांडव आणि ढगांचा गडगडाट होताना दिसला की लहानथोर मंडळी पाऊस येण्याची चातकाप्रमाणे वाट पाहू लागतात. चुकारीच्या काळ्या ढगांतून पावसाच्या थोड्या सरी जमिनीवर पडताच मातीचे थेंब तरारून उठतात आणि मृदगंध अत्तराप्रमाणे सारा परिसर भारून टाकतो. लहान बालके अंगणात येऊन पावसाची गाणी म्हणायला सुरुवात करतात. बेडकांना सुद्धा इशारा मिळाल्याप्रमाणे डराव डराव सुरू करण्याची संधी मिळते. घारी, टिटव्या, भारद्वाज आणि पांढरेशुभ्र बगळे आकाशात पंख फडफडवत ताना मारू लागतात. वृक्षांवरील फुलांची, फळांची आणि निरनिराळ्या पाखरांच्या रंगांची, सुगंधाची लयलूट पाहायला मिळते आणि असे म्हणावेसे वाटते,

**किती भारी सुंदर रुपडे**
**या निसर्गसृष्टीचे बाई**
**डोळ्यांनी किती पाहिले**
**तरी पारणे फिटत नाही** ■



मंगेश चव्हाण
तत्का. उपविभागीय पोलीस अधिकारी
सांगली

# कुऱ्हाडीचा दांडा...

**आपलाच मनुष्य आपल्या नाशाला कारणीभूत ठरतो हे अनेकदा दिसून येते. यातून पीडित व्यक्तीला बहुअंगी यातना होतात. प्रत्यक्ष अपराधामुळे झालेल्या वेदना जितक्या तीव्र असतात, तितक्याच किंबहुना त्यापेक्षाही जास्त तीव्र वेदना आपल्याच माणसाने केलेल्या विश्वासघाताच्या असतात.**



'घार उडते आकाशी, चित्त तिचे पिलापाशी' असे आपल्याकडे म्हणतात ते अगदी खरे आहे. आई कुठेही असू देत, आपल्या लेकरांचे सगळे व्यवस्थित चालले आहे ना? या एकाच विचारापाशी तिचे मन पिंगा घालत असते. आशाच्याही बाबतीत असेच होते. ३५ वर्षांची आशा कामानिमित्त मुंबईत राहत होती. तिला तीन मुले होती. सगळ्यात मोठा मुलगा आशिष वय वर्षे १३, त्यानंतर मुलगी समीरा वय ११, आणि सगळ्यात धाकटी मुलगी संध्या वय वर्षे नऊ. मात्र काही वर्षांपूर्वी आशाचा आपल्या नवऱ्याबरोबर घटस्फोट


शरद जाधव
सहा. पोलीस उपनिरीक्षक
कासेगाव पोलीस ठाणे
सांगली


प्रशांत देसाई
पोलीस अंमलदार
कासेगाव पोलीस ठाणे
सांगली


महेश करे
पोलीस अंमलदार
कासेगाव पोलीस ठाणे
सांगली

झाला होता आणि त्यानंतर आशिष आणि समीरा हे दोघेही तिच्या नवऱ्याबरोबर राहात होते. धाकटी संध्या मात्र तिच्याबरोबर राहात होती. आशा कामानिमित्त मुंबईत राहत असल्यामुळे तिने आपल्या लेकीला सांगली जिल्ह्यातील नेर्ले येथे राहणाऱ्या आपल्या मावशीकडे आणून सोडले होते. संध्या आपल्या मावशी आजीबरोबरच राहात होती. तिथल्या शाळेत तिची ॲडमिशनही घेतलेली होती. आशाची मावशी आणि तिचा नवरा राजेश हे आपल्या मुलाबाळांसह नेर्ले येथे राहत असत. शेकडो किलोमीटर दूर राहणाऱ्या आपल्या या धाकट्या लेकीबद्दल आशाला फार वाईट वाटत असे. पण इलाज नव्हता. मनावर दगड ठेवूनच तिने संध्याला आपल्या मावशीच्या घरी ठेवले होते. पण म्हणून तिचे लेकीकडे असलेले लक्ष कमी झाले होते असे नाही. ती नियमितपणे आपले काका राजेश यांच्या मोबाईलवर फोन करून संध्याची चौकशी करत असे. तिथे सगळे ठीक सुरू आहे, ती तिथे रमलेली आहे, शाळेत जायला उत्सुक आहे हे ऐकून तिला मनातून समाधान वाटत असे.

मात्र काही दिवसांपूर्वीपासून तिला एक विचित्र जाणीव होत होती. पंधरा दिवसांपूर्वी संध्याशी बोलताना तिचा आवाज काहीसा रडवेला झाल्यासारखे आशाला वाटले. तिने या प्रकाराकडे काहीसे दुर्लक्ष केले. 'आली असेल एखादवेळेला आईची आठवण... थोडी रुळली की होईल सगळं सुरळीत,' अशी तिने



**पलीकडे भयाण शांतता होती. संध्या काहीही बोलत नव्हती. फक्त हुंदक्यांवर हुंदके देत होती. त्यामुळे आशा अजूनच गोंधळून गेली. शेवटी तिने एक एक प्रश्न विचारायला सुरुवात केली.**

स्वतःच्या मनाची समजूत घातली. पण तेव्हापासून प्रत्येक वेळी फोनवर बोलताना तिला संध्याचे काहीतरी बिनसलेले आहे असेच वाटू लागले. शेवटी आईचे काळीज ते! तिला राहावेना. एक दिवस तिने दुपारीच संध्याला फोन केला. तेव्हाही संध्या फोनवर रडायला लागली. आशाला काय करावे हे समजेना. तिने आपले कसेबसे लेकीला बाबापुता केले.

''बाळ, काय झालं? का रडतीयेस?''

पलीकडे भयाण शांतता होती. संध्या काहीही बोलत नव्हती. फक्त हुंदक्यांवर हुंदके देत होती. त्यामुळे आशा अजूनच गोंधळून गेली. शेवटी तिने एक एक प्रश्न विचारायला सुरुवात केली.

''तुला बरं वाटत नाहीये का?''

''नाही, बरं आहे.'' संध्याने उत्तर दिले.

''मग तुझं कोणाशी भांडण झालं का? तुला कोणी बोललं का?''

''नाही...''

''तुला कशाची भीती वाटते का?''

या प्रश्नासरशी संध्या जोरजोरात रडायला लागली. आशाचे काळीज धडधडू लागले.

''कुणाची भीती वाटते?''

''आजोबांची,''

''आजोबांनी काय केलं? तुला मारलं का? तू काही खोडी नाही ना काढली? किंवा त्यांचं ऐकलं नाही असं तर काही नाही ना केलं?''

''नाही गं मम्मी...'' असे म्हणत संध्याने रडतरडत पुढची हकीगत सांगायला सुरुवात केली. त्यावेळी आशाच्या सर्वांगावर अक्षरशः सरसरून काटा आला. अवघ्या नऊ वर्षांच्या त्या कोवळ्या जिवाला

कसले अत्याचार सहन करावे लागत होते. मार खाणे एकवेळ चालले असते, पण बळजबरी? शारीरिक अत्याचार?? आणि शोषण??? आशाला तिच्या लेकीइतकाच जबर धक्का बसला. दोन मिनिटे ती गप्पच बसली. शेवटी 'मी येते तिकडे बाळा, घाबरू नकोस' अशी संध्याची समजूत घालून तिने फोन ठेवला.

त्यानंतर जणू गोठल्यासारखी आशा पाच मिनिटे शांत बसली. कसे तरी करून तिने मनाला थाऱ्यावर आणले. तिचे आई-वडील मुंबईत तिच्या घरापासून जवळच राहत होते. त्यांना तिने फोन करून संध्याच्या बाबतीत घडलेला प्रकार सांगितला आणि आपण ताबडतोब मावशीकडे जात असल्याचेही कळवले. तिचे आईवडीलदेखील हा प्रकार ऐकून चांगलेच हबकले.

''आशा, एक काम कर. मावशीकडे एकटी जाऊ नकोस. तुझ्या काकांना किंवा रितेशला सोबत घेऊन जा.'' वडिलांनी सांगितले.

आशाचे काकादेखील नेर्ले गावीच राहत होते. त्यांचा मुलगा रितेश आशाच्याच वयाचा होता.

''हां पप्पा...''

''आणि पोचलीस की फोन कर. काळजी घे.'' आई म्हणाली.

''हो ठीक आहे. निघते मी. बघते रात्रीचीच गाडी पकडते आत्ता.''

त्याप्रमाणे आशा घरातून निघाली आणि दुसऱ्याच दिवशी पहाटे पाच वाजता आपल्या काकांच्या घरी पोहोचली. त्यानंतर आशा, तिचे काका आणि चुलत भाऊ रितेश हे सगळे मिळून मावशीच्या घरी गेले. मावशीला या प्रकारची काही कल्पनाच नव्हती. एवढ्या पहाटे आपल्या भाचीला दारात उभे बघून तिला आश्चर्य वाटले. मात्र त्याच वेळी आशाच्या चेहऱ्यावरचे उग्र आणि रागीट भाव बघून ती काहीशी घाबरलीसुद्धा.



**त्याप्रमाणे आशा घरातून निघाली आणि दुसऱ्याच दिवशी पहाटे पाच वाजता आपल्या काकांच्या घरी पोहोचली. त्यानंतर आशा, तिचे काका आणि चुलत भाऊ रितेश हे सगळे मिळून मावशीच्या घरी गेले.**

''काका कुठे आहेत? मला त्यांच्याशी बोलायचंय.'' ती म्हणाली.

मावशीने आपल्या नवऱ्याला हाक मारली. त्याला समोर बघताच आशाचा संयमाचा बांध तुटला.

''चांडाळा, तुला लाज नाही वाटत? तुझी उमर काय, माझ्या पोरीची उमर काय... नाही नाही ते चाळे करतो तिच्याबरोबर. बेशरम कुठचा!''

ती जोरजोरात बोलू लागली. काय घडले असावे याचा मावशीलाही अंदाज आला. आणि अनपेक्षितरीत्या तो साठीचा वृद्ध काका खाली वाकला. त्याने तिचे पाय धरले.

''गलती हो गयी. मला क्षमा कर पोरी, परत हे असं होणार नाही.''

''परत असं नाहीच होणार. माझ्या पोरीला मी इथून घेऊन जाणार आहे.''

झपाझप चालत आशा आतल्या खोलीत गेली आणि झोपेत असलेल्या आपल्या पोरीला तिने उचलून कडेवर घेतले. संध्या दचकून जागी झाली. पण आपण आईच्या कुशीत आहोत हे बघितल्यावर तिच्या चेहऱ्यावर हसू उमटले. त्या नराधमाने तिच्या पोरीची काय हालत करून ठेवली होती! आशाने तिला जवळ घेतले आणि प्रेमाने तिच्या डोक्यावर थोपटले.

ती संध्याला घेऊन तिथून रागारागाने बाहेर पडली आणि लगोलग मिळेल ती बस पकडून आपल्या मुलीसह मुंबईला निघून आली. वास्तविक तिची मानसिक स्थिती अजिबात चांगली नव्हती. पण तरीही आपल्या मुलीच्या संदर्भात झालेल्या प्रकाराबाबत तक्रार करणे, दाद मागणे गरजेचे होते. त्याप्रमाणे ती आपल्या आई-वडिलांना घेऊन पोलीस स्टेशनला गेली.

कासेगाव पोलीस स्टेशन येथे

दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी आशाने तक्रार दाखल केली.

''साहेब, सोडू नका त्याला. तो मूळचा इथला नाही... तिकडचा झारखंड साईडचा आहे. मी पोलिसांत जाणार याची त्याला कल्पना असेलच. जाईल पळून त्याच्या गावाकडे. नाहीतर तोंड काळं करेल कुठेतरी तात्पुरतं. मी त्याला असा सहजासहजी सुटू देणार नाही. काहीतरी करा साहेब, पण त्या हलकटाला पकडा. माझ्या पोरीचं आयुष्य नासवलंय त्याने...'' तिने पोलिसांना विनवणी केली. त्यानुसार पोलीस पथक ताबडतोब कामाला लागले.

सर्वप्रथम पीडितेच्या आईची तक्रार दाखल करून घेण्यात आली. सदर गुन्ह्यातील आरोपी राजेश हा मूळचा झारखंड राज्यातील राहणारा असल्याने आणि तो परागंदा होण्याची शक्यता असल्याने त्याचा शोध घेण्यासाठी ताबडतोब तपास पथके तयार करून पाठवण्यात आली. त्याचा नेर्ले तसेच कासेगाव परिसरात तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेण्यात आला. त्यावेळी तो पोलिसांच्या ताब्यात सापडला. दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी त्याला अटक करण्यात आली.

त्यानंतर त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्यानंतर गुन्ह्याच्या घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला. तसेच गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपीची वैद्यकीय तपासणी करून घेण्यात आली. आरोपीचा वापरता मोबाईल सविस्तर पंचनाम्याद्वारे गुन्ह्याच्या तपासकामी जप्त करण्यात आला. तसेच आरोपीने गुन्ह्याच्या वेळी परिधान केलेले कपडेही जप्त करण्यात आले. पीडित मुलगी संध्या तिची वैद्यकीय तपासणी करून घेण्यात आली. तसेच तिने गुन्ह्याच्या वेळी अंगावर परिधान केलेले कपडेही सविस्तर पंचनाम्याद्वारे जप्त करून ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर सर्व



**सदर गुन्ह्यातील आरोपी राजेश हा मूळचा झारखंड राज्यातील राहणारा असल्याने आणि तो परागंदा होण्याची शक्यता असल्याने त्याचा शोध घेण्यासाठी ताबडतोब तपास पथके तयार करून पाठवण्यात आली.**

जप्त मुद्देमाल सीए तपासणीकरिता पाठवण्यात आला. पीडितेचा मा. न्यायालयासमोर जबाब नोंदवण्यात आला. आरोपी राजेश हा मूळचा झारखंड राज्यातील असल्याने त्याचा पत्ता प्राप्त करून, मा. पोलीस अधीक्षक यांच्या परवानगीने त्या ठिकाणी एक तपास पथक पाठवून त्याची पार्श्वभूमीदेखील पडताळणी करून घेण्यात आली. गुन्ह्यातील पीडितेचा जातीचा दाखला तसेच फिर्यादींचा जातीचा दाखला हे प्राप्त करून घेण्यात आले. गुन्ह्याचा तपास ६० दिवसांच्या आत पूर्ण करून आरोपीच्या विरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

आरोपीला पोक्सो अधिनियम कलम ४ अन्वये २० वर्षे सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड, पोक्सो अधिनियम कलम सहा अन्वये २० वर्षे सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड, पोक्सो अधिनियम कलम आठ अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड, पोक्सो अधिनियम कलम १० अन्वये ७ वर्षे सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड, पोक्सो अधिनियम कलम १२ अन्वये ३ वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड आणि भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२) अन्वये सहा महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

सांगली येथील तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी मंगेश चव्हाण, तसेच कासेगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस उपनिरीक्षक शरद जाधव आणि पोलीस अंमलदार प्रशांत देसाई तसेच महेश करे यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



निशा बनसोड
तत्का. सहा. पोलीस निरीक्षक
बदनापूर पोलीस ठाणे
जालना

# ‘ती’ रात्र

**मध्यमवयीन असलेली फातिमा ही स्किझोफ्रेनिया या मानसिक विकाराची शिकार होती. जुलै २०२२ मधील एका पावसाळी रात्री ती रहस्यमयरीत्या घरातून गायब झाली. त्यानंतर तितक्याच अनपेक्षितपणे तिचा तपास लागला. या मधल्या काळात ती कुठे होती? काय घडले होते तिच्या आयुष्यात? ‘त्या’ रात्रीने तिचे आयुष्य कसे बदलले?**



रात्रीची वेळ होती. जुलै महिना होता. कधी नव्हे ते दुष्काळी मराठवाड्यात चांगलाच पाऊस पडत होता. दिवसभर पावसाने बदनापूर गावाला झोडपून काढले होते. थोडी विश्रांती घेऊन परत एकदा पर्जन्यधारा बरसू लागल्या होत्या. मध्येच एक मोठी सर आली. त्यामुळे निसारच्या घराच्या छतावर पावसाचे थेंब पडल्याचा मोठ्याने आवाज येऊ लागला. त्या आवाजाने त्याला जाग आली. झोपून किती वेळ झाला होता हे त्याच्या लक्षात येईना. त्याने कूस बदलली आणि अंथरुणात शेजारी पाहिले तर फातिमा जागेवर नव्हती.



**दिगंबर चौरे**
पोलीस अंमलदार
बदनापूर पोलीस ठाणे
जालना



**सूर्यकांत डोईफोडे**
पोलीस अंमलदार
बदनापूर पोलीस ठाणे
जालना



**जावेद शेख**
पोलीस अंमलदार
बदनापूर पोलीस ठाणे
जालना



**मंदा बनसोडे**
पोलीस अंमलदार
बदनापूर पोलीस ठाणे
जालना

तो चमकून उठला. 'आत्ता एवढ्या रात्रीची कुठे गेली असेल आपली बायको?' त्याच्या मनात येऊन गेले.

निसार आणि फातिमा हे मध्यमवयीन जोडपे. साधारण ५४ ५५ वयाच्या आसपास असलेले. गेल्या काही वर्षांपासून फातिमाला एका वेगळ्याच त्रासाने ग्रासले होते. डॉक्टरी भाषेत त्याला स्किझोफ्रेनिया असे नाव होते. ते जे काय असेल ते; पण त्याचा झटका महाभयानक असायचा! निसारने तर त्याचा इतका धसका घेतला होता, की आजकाल तो तिला अजिबात एकटीला सोडत नसे. जणू त्या अनोळखी आजाराने त्यांना समाजापासून, आजूबाजूच्या लोकांपासून तोडूनच टाकले होते. नात्यांमध्ये भिंती उभ्या राहिल्या होत्या. त्याच्या आणि आजूबाजूच्या घरांमध्ये कुंपण घातले गेले होते. शेजारीपाजारी राहणाऱ्यांच्या कुत्सित, प्रश्नार्थक नजरादेखील त्याला एखाद्या कुसळाप्रमाणे टोचत. पण इलाज नव्हता.

त्याने डोळे चोळले. आपल्याला भास तर झाला नाही ना, असे त्याला एकदा वाटून गेले. पण नाही. खरोखर फातिमा जागेवर नव्हती. तो उठला आणि घरभर त्याने बायको कुठे दिसते का हे पाहिले. पण तिचा पत्ता नव्हता. शेवटी त्या तशा भरपावसात पायात चपला सरकवून आणि हातात छत्री घेऊन तो बाहेर पडला.



**दोनच ओळी.. पण त्या किती धीर देणाऱ्या. निसार घाईघाईने त्या स्टँडपाशी पोहोचला आणि समोर त्याला आपली बायको दिसली. त्याच्या जिवात जीव आला. पण काही क्षणच!**

रात्रीचे तीन वाजून गेले होते. दूरवर कुठेतरी कुत्रे भुंकण्याचा आवाज येत होता. देवाचे नाव घेत तो सावधपणे रस्त्याने चालला होता. अशा स्थितीत तो किती अंतर गेला असेल त्याचे त्यालाही कळले नाही. आणि अचानक त्याच्या मोबाईलवर एक मेसेज आला. तो एक फोटो मेसेज होता. त्यात फातिमाचाच फोटो होता. ती बसस्टँडवर बसलेली आहे, तिच्या घरच्यांनी ताबडतोब तिला तिथून घेऊन जावे अशा आशयाचा तो मेसेज होता.

दोनच ओळी.. पण त्या किती धीर देणाऱ्या. निसार घाईघाईने त्या स्टँडपाशी पोहोचला आणि समोर त्याला आपली बायको दिसली. त्याच्या जिवात जीव आला. पण काही क्षणच! तिचा जो काही अवतार झाला होता त्यावरून त्याच्या काळजाचा ठोका चुकला. तिच्या बाबतीत नक्कीच काहीतरी अघटीत घडले होते. पण निदान ती त्याच्यासमोर होती; सुखरूप होती. आत्ताच्या घडीला त्याच्यासाठी ते जास्त महत्त्वाचे होते.

तो घाईघाईने तिच्या दिशेने गेला.

''इथे काय करून राहिली तू, फातिमा?''

फातिमाने एकदा त्याच्याकडे बघितले आणि ती मुसमुसून रडायला लागली. निसारने तिला जवळ घेतले.

''चल, घरी चल. मग बोलू.''

तिला घेऊन तो घरी आला. संपूर्ण रस्ताभर ती शांत होती. घरी आल्यानंतर त्याने दाराला आतून कडी लावली. तिला पलंगावर बसवले.

''बोल. काय झालं? तिकडे कुठे गेली होतीस तू एवढ्या रात्रीची?'' त्याने विचारले.

''भाईजानकडे चालले होते... सिल्लोडला. काहीतरी स्वप्न पडलं मला. काहीतरी दिसलं. आणि मग एकदम वाटलं बस पकडावी आणि जावं तिकडे...''

''फातिमा, तुला कितींदा सांगितलं, अशी एकट्याने कुठे जात जाऊ नको. अगं मला तर उठवायचं. मी घेऊन गेलो असतो ना तुला उद्याच्याला...''

''नाही... उद्या नाही... मला आत्ताच जायचं होतं.''

''बरं! ठीक आहे. आत्ता जायचं होतं... मग का नाही गेलीस? तिथे अशी एकटीच कशाला बसून राहिलीस?''

''निघाले होते, पण...''

त्यानंतर फातिमाने वाटेत जे काही घडले ते निसारला सांगितले. ते ऐकताना त्याच्या पायाखालची जमीनच सरकली.

***

तिने सांगितलेल्या हकिकतीनुसार रात्री ती घरातून बाहेर पडली. काही अंतर गेल्यानंतर तिला एक मोटरसायकलवाला भेटला. त्याने तिच्याकडे चौकशी केली, त्यावेळी ती सिल्लोडला जाणारी बस पकडण्यासाठी निघाल्याचे त्याला समजले. त्याने तिला लिफ्ट देण्याची आणि बस स्टॉप पर्यंत सोडण्याची तयारी दर्शवली. त्याप्रमाणे ती त्याच्याबरोबर निघाली. मात्र प्रत्यक्षात तिला बस स्टॉप कडे न नेता त्याने एकांतात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर त्याने तिला एका ढाब्यापाशी सोडले आणि तिथली एक खोली उघडून देऊन तिने आत झोपावे असे सुचवले. त्याप्रमाणे ती त्या खोलीत झोपायला



**एकीकडे त्याच्या बायकोच्या असहायतेचा गैरफायदा घेणाऱ्या त्या नराधमांना जन्माची अद्दल घडायला हवी असे त्याला मनोमन वाटत होते. दुसरीकडे मात्र या प्रकरणाची वाच्यता करायला त्याचे मन धजावत नव्हते.**

गेली. त्यानंतर त्या ढाब्याजवळ असलेल्या चार माणसांनी देखील तिच्यावर अत्याचार केला. पहाटे त्या मोटरसायकलवाल्या माणसाने तिला जवळपास कुठेतरी सोडून दिले आणि ती टेंभुर्णी बस स्टॅन्ड पाशी येऊन पोहोचली. त्यानंतर ती स्टॅंडवर बसून राहिली. याच काळात स्टॅंडवर असलेल्या कुणीतरी तिचा फोटो काढून तो मेसेज सर्क्युलेट केला होता, ज्यामुळे निसारची आणि तिची भेट झाली होती.

विशेष गोष्ट म्हणजे फातिमाने केलेल्या एकंदर वर्णनावरून गुन्हेगार कोण असतील याचा निसारला पक्का अंदाज आला होता. काही कारणाने फातिमाला मानसिक अपंगत्व आलेले असले तरी तिची बुद्धी सर्वसाधारण माणसाइतकीच शाबूत होती, स्मरणशक्ती उत्तम होती.

निसारच्या पुढ्यात मात्र आता वेगळाच प्रश्न उभा होता. एकीकडे त्याच्या बायकोच्या असहायतेचा गैरफायदा घेणाऱ्या त्या नराधमांना जन्माची अद्दल घडायला हवी असे त्याला मनोमन वाटत होते. दुसरीकडे मात्र या प्रकरणाची वाच्यता करायला त्याचे मन धजावत नव्हते. आधीच बिरादरीकडून वाळीत टाकले जाणे काय असते त्याचे चटके तो थोड्याफार प्रमाणात सोसत होता. त्यात आता हे नवीन झेंगट उभे राहिले होते. बदनामीला घाबरणारा एक सामान्य माणूस होता तो!

अशा द्विधा मन:स्थितीत जवळपास महिना लोटला. अखेरीस मनाचा निग्रह करून, हिंमत गोळा करून त्याने फातिमाला घेऊन बदनापूर पोलीस ठाणे गाठले.

''मॅडम, मला कंप्लेंट करायची आहे...'' आपल्यासमोर बसलेल्या त्या प्रौढवयीन जोडप्याची

कर्मकहाणी ऐकल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक निशा बनसोड यांनी सर्वप्रथम विचारले,

''महिनाभर तुम्ही काय करत होतात? आधीच का कंप्लेंट नाही केली?''

''काय करणार मॅडम. समाज काय म्हणेल, बिरादरी काय म्हणेल याची भीती होती. उत्तरं तरी कितीजणांना देत बसणार. पण शेवटी ठरवलं, हिला न्याय मिळावा यासाठी बाकी गोष्टी बाजूला करायच्या. मला माहीत आहे– पक्की खात्री आहे– हे कुणी केलंय ते.'' असे म्हणून त्याने संशयितांचा तपशील मॅडमकडे दिला.

सदर गुन्ह्याची तक्रार प्राप्त होताच बनसोड मॅडमनी पोलीस पथक तयार करून सर्वप्रथम घटनास्थळी भेट दिली आणि घटनास्थळाचा दोन पंचांच्या समक्ष सविस्तर पंचनामा केला. त्याचप्रमाणे पोलिसांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कडून पीडितेची वैद्यकीय तपासणी केली. तिच्या अंगावर असलेले गुन्ह्याच्या वेळचे कपडे जप्त केले. आरोपींची नावे माहिती झाल्यानंतर पोलिसांनी गावातूनच त्या पाचही आरोपींना ताब्यात घेतले. ओळख परेड दरम्यान फातिमाने पाचही आरोपींना बरोबर ओळखले. त्यांचेही गुन्ह्याच्या वेळचे कपडे जप्त करण्यात येऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. पोलिसांनी पीडिता आणि आरोपी यांच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल प्राप्त केला. त्याचप्रमाणे पीडितेचा मानसोपचार तज्ज्ञांनी दिलेला अहवालदेखील प्राप्त करण्यात आला. सीआरपीसी कलम १६४ सह पीडितेचा तसेच अन्य साक्षीदारांचा जबाब नोंदवण्यात आला. आरोपीने गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल देखील जप्त करण्यात आली. पीडिता आणि पाचही आरोपी यांचे नमुने जप्त मुद्देमालासह



**''काय करणार मॅडम. समाज काय म्हणेल, बिरादरी काय म्हणेल याची भीती होती. उत्तरं तरी कितीजणांना देत बसणार. पण शेवटी ठरवलं, हिला न्याय मिळावा यासाठी बाकी गोष्टी बाजूला करायच्या...''**

तपासणीकरिता न्यायसहायक प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले. तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून सर्व आरोपींच्या विरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

मा. न्यायालयाने समोर आलेले साक्षीपुरावे ग्राह्य धरून दोषींना भा.दं.वि कलम ३७६ (ड) अन्वये २० वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्येकी ६० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास जालना जिल्ह्यातील बदनापूर पोलीस ठाण्याच्या तत्का. महिला सहायक पोलीस निरीक्षक निशा बनसोड, आणि पोलीस अंमलदार दिगंबर चौरे, सूर्यकांत डोईफोडे, जावेद शेख, तसेच महिला पोलीस अंमलदार मंदा बनसोडे यांनी कौशल्याने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



महादेव आचरेकर
पोलीस निरीक्षक
काटोल पोलीस ठाणे
नागपूर ग्रामीण

# संशयकल्लोळ

**जगात बाकीच्या आजारांवर औषध मिळू शकते, पण संशय नावाच्या रोगावर नाही. संशय हा पहिल्यांदा माणसाच्या मेंदूला आणि नंतर त्याच्या सगळ्या आयुष्याला पोखरून नष्ट करतो. नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यात या संशयामुळेच काळ्याकभिन्न रात्री एक घटना घडली. त्या घटनेमुळे आसपासच्या परिसरात हाहा:कार उडाला. काय घडले होते नेमके?**



एप्रिल महिन्याची सुरुवात होऊन तब्बल १२ दिवस उलटून गेले होते. नागपूरमधील काटोल तालुक्यातील इसापूर खुर्द या गावात २०२२ चा उन्हाळा जास्तच जाणवत होता. जमीनही रात्री उशिरापर्यंत थंड होत नव्हती. परिणामी गावकरी या उन्हाच्या काहिलीने अधिकच त्रस्त झाले होते. जणूकाही हीच तप्तता उदयच्या डोक्यात उतरत होती. त्याने तेरा तारखेच्या मध्यरात्री गावातच राहणाऱ्या एका रजनी नावाच्या महिलेला फोन केला. रजनी ही उदयची बायको रश्मी हिची मैत्रिण आणि



**किशोर निखाडे**
पोलीस अंमलदार
काटोल पोलीस ठाणे
नागपूर ग्रामीण



**अविनाश बहेकर**
पोलीस अंमलदार
काटोल पोलीस ठाणे
नागपूर ग्रामीण



**बाबा नेवारे**
पोलीस अंमलदार
काटोल पोलीस ठाणे
(कोर्ट पैरवी)

ग्रामपंचायतीमधील सहकारी होती. त्याने केलेला फोन तिने झोपेत असल्याने आधी उचलला नाही. तरीही त्याने फोन करणे सोडले नाही. उदयचा परत फोन आलेला बघून पुढच्या खेपेला मात्र रजनीने फोन घेतला. फोनवरून उदयने तिला सांगितलेल्या गोष्टीमुळे तिच्या हातातून फोन खाली पडला. ती होती त्याच स्थितीत उठली आणि घाईघाईने कशीबशी चप्पल सरकवत ती घराबाहेर पडली.

''कुठे चालली बे एवढ्या रात्रीची?'' रजनीच्या नवऱ्याने विचारणा केली. स्वत:च्या नवऱ्याला उत्तर देण्याचे भानही तिला नव्हते. तिचा नवराही तिच्यामागून निघाला. वाटेत तिने आणखी काही यंत्रवत फोन केले. तिने फोन केल्यावर त्या लोकांची अवस्थाही तिच्यासारखीच झाली. ते सगळेजण उदयच्या घरापाशी येऊन थांबले. रजनीने पुढे होऊन दरवाजा ठोठावला, पण आतून काहीच प्रतिसाद आला नाही.

''एक काम करूया ना... रश्मीच्या घराला पुढून एक अन मागल्या बाजूनं बी जाता येतं. मी मागल्या बाजूनी जाऊन बघते उघडती का दार ते...'' रजनी बरोबर आलेल्या लोकांना सांगून मागच्या बाजूला गेली. तेव्हा घराचा मागच्या बाजूचा दरवाजा उघडा होता. रजनी आत गेली. मागच्या बाजूचा दरवाजा सताड उघडा होता. आत



**उदयचा परत फोन आलेला बघून पुढच्या खेपेला मात्र रजनीने फोन घेतला. फोनवरून उदयने तिला सांगितलेल्या गोष्टीमुळे तिच्या हातातून फोन खाली पडला. ती होती त्याच स्थितीत उठली आणि घाईघाईने कशीबशी चप्पल सरकवत ती घराबाहेर पडली.**

कोणीच नव्हते. त्यावेळी समोर जे दृष्य होते ते बघून तिच्या पायाखालची जमीनच हादरली. काही वेळापूर्वी तिच्याशी हसून खिदळून बोलणारी रश्मी आता रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. ज्या दिवाणवर ती रोज रात्री झोपायची त्याच दिवाणखाली ती आज मृतप्राय होऊन पडली होती. रश्मी गावातील पंचायत सदस्य असल्याने वाऱ्याच्या वेगाने ही बातमी गावात सर्वदूर पसरली. एव्हाना सुरुवातीला रजनीबरोबर आलेले लोकही रश्मीच्या घरात दाखल झाले होते. गावात बातमी समजल्यावर त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. रश्मीच्या घराबाहेर बघ्यांची गर्दी जमू लागली. रजनीने ताबडतोब घडलेल्या घटनेबद्दल पोलिसांना माहिती दिली.

माहिती समजताच काटोल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर पोलीस पथकासह तातडीने घटस्थळाकडे रवाना झाले. पोलिसांनी रश्मीचा मृतदेह दिवाणाच्या खालून बाहेर काढला. पोलिसांनी घटनास्थळाचे छायाचित्रीकरण केले. रश्मीच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा केला. घटनास्थळाचा दोन पंचासमक्ष पंचनामा केला. पोलिसांनी घटनास्थळावरून रक्ताचे नमुने व अन्य महत्त्वाच्या गोष्टी हस्तगत केल्या. पोलिसांनी सीआरपीसी ६४ अन्वये महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवले. पोलिसांनी रश्मीने परिधान केलेले कपडेही हस्तगत केले. त्यांनी रश्मीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. आता पुढचे महत्त्वाचे आव्हान होते ते म्हणजे संशयिताचा शोध घेणे.

''आम्हाला तुमची मदत हवी आहे.'' साहेब रजनीला म्हणाले.

''हो साहेब. रश्मी मैत्रीण होती ना माजी. मी लागंल ती मदत करेन तुमाले.''

''बरं मला सांगा, तुम्हाला हे सगळं कळलं कधी?''

''अहो त्या भैताडनी फोन केला होता ना मले.''

''कोणी?''

''उदय. नवरा रश्मीचा. पण मी आले इथे तेव्हा घरात तर कोणीच सापडून नाही राहिले ना बाप्पा.''

''हा उदय आत्ता कुठे असेल काही माहीत आहे तुम्हाला?''

''ते काही मले ठाऊक नाही.''

''तुमच्याकडे त्याचा नंबर असेल. तो द्या आम्हाला.''

साहेबांनी आपल्या सहकाऱ्यांना उदयचा फोन नंबर घेण्याची सूचना केली. रजनीला साहेबांनी उदयला फोन करून त्याच्याशी बोलण्यास सांगितले. दरम्यानच्या काळात पोलीस तांत्रिक तपासाद्वारे त्याच्या ठावठिकाण्याविषयीचा तपास करत होते. हा शोध सुरू असतानाच पोलिसांना उदयच्या ठावठिकाण्याची माहिती मिळाली. तपासपथक मिळालेल्या माहितीच्या आधारे एका बारच्या बाहेर येऊन थांबले. उदय तिथून बाहेर पडत होता. त्याला नीट चालताही येत नव्हते.

''उदय, चल आमच्याबरोबर.''

''कुठे घेऊन जाऊन राहिलात बे मले?''

''पोलीस ठाण्यात. तुझी नशा उतरेल तिथे गेल्यावर. चल, बस गाडीत.''

''पण मी काय केलं? मले का पकडून नेता?''

''सगळं कळेल तुला.''

पोलिसांनी त्याला गाडीत बसवले. पोलिसांचे वाहन आता काटोल पोलीस ठाण्याच्या दिशेने मार्गस्थ झाले.

''उदय, का मारलं रश्मीला?''

''मग काय करणार? पाट मांडायची स्वप्नं बघून राहिली ती. तिने फसवलं मले.''

''म्हणजे?''



**पोलीस तांत्रिक तपासाद्वारे त्याच्या ठावठिकाण्याविषयीचा तपास करत होते. हा शोध सुरू असतानाच पोलिसांना उदयच्या ठावठिकाण्याची माहिती मिळाली. तपासपथक मिळालेल्या माहितीच्या आधारे एका बारच्या बाहेर येऊन थांबले. उदय तिथून बाहेर पडत होता.**

''आमचं प्रेम होतं एकमेकांवर. आम्ही लग्नही केलं. सुरुवातीला सगळं मस्त होतं एकदम. पण नंतर ती ग्रामपंचायतीत जायला लागली तसं तिचे धंदे सुरू झाले ना बाप्पा. मी काही विचारलं तिले, तर नाही होऊन पडायची. पण मले ठाऊक आहे तिले नक्की बाहेर कोणीतरी भेटला असणार. त्याशिवाय का एवढा वेळ घराबाहेर राहायची. त्या दिशी पर आमच्यात जोराचं भांडण झालं. तिचं ते सगळं बोलणं ऐकून डोस्कं फिरलं ना माजं. मग काय, तिथे कुऱ्हाड होती त्यानेच हाणली तिले. ती काही हालचाल करत नाही हे समजल्यावर मी रजनीला फोन केला आणि घरातून पळालो.''

पोलिसांनी उदयकडून त्याने परिधान केलेले कपडे आणि गुन्ह्यात वापरलेली कुऱ्हाड या गोष्टी हस्तगत केल्या. पोलिसांनी हस्तगत केलेले सर्व पुरावे वैद्यकीय तपासणीसाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवले. त्याने दिलेल्या जबाबावरून मा. न्यायालयात त्याच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

मा. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेत समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरत त्याला भादंवि कलम ३०२ अन्वये दोषी ठरवत आजन्म कारावास आणि २००० रुपये दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास काटोल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर, सहा. पोलीस निरीक्षक विशांत नांदगाये (कोर्ट पैरवी), पोलीस अंमलदार अविनाश बहेकर, निखाडे, बाबा नेवारे, गणेश भुरे यांनी अत्यंत तत्परतेने व कौशल्याने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# निन्नी



विद्या जाधव
सहा. पोलीस निरीक्षक
शेगाव पोलीस ठाणे
चंद्रपूर

**निन्नी ही केवळ चार वर्षांची मुलगी. इतक्या कोवळ्या वयात तिचे आयुष्य उद्ध्वस्त करणारा एक अपराध तिच्या बाबतीत घडला. कोण होता हा अपराधी? या विकृतीला काय म्हणायचे??**



शारदा देवीची जत्रा हा शेगावातल्या समस्त गावकऱ्यांसाठी जिव्हाळ्याचा विषय होता. या निमित्ताने चार लोक एकत्र यायचे, बायाबापड्या आपापल्या लेकरांना घेऊन घराबाहेर पडायच्या, क्वचित कुणाची पोटापाण्याची चार दिवसांची सोय व्हायची, कुणाला दानधर्म करता यायचा, आणि पोराबाळांना चार घटकांचा विरंगुळा मिळायचा. लोक दरवर्षी येणाऱ्या उत्सवाची मोठ्या आतुरतेने वाट पाहायचे.

याही वर्षी उत्सव नेहमीच्या उत्साहाने पार पडत होता. आज देवीचा भंडारा होता. त्यानिमित्त



दिनकर घोटेकर
पोलीस अंमलदार
शेगाव पोलीस ठाणे
चंद्रपूर



निराशा टेंभेकर
पोलीस अंमलदार
शेगाव पोलीस ठाणे
चंद्रपूर

गावकरी प्रसादासाठी जमले होते. त्यात गावात राहणाऱ्या चार वर्षांच्या निन्नीचाही समावेश होता. ती आपल्या आईबरोबर जत्रेला आली होती. डोळे भरून तिथली गर्दी, खाऊची दुकाने, रंगीबेरंगी बांगड्या आणि खेळणी ही सर्व नवलाई बघत होती.

काही वेळ सरला. त्यात त्या दोघी मायलेकींचे जेवणही आटोपले. मग निन्नीच्या आईने घरी जायची घाई करायला सुरुवात केली. रात्र झाली होती, वेळेत घरी जाणे आवश्यक होते. खरेतर निन्नीला त्या उंच पाळण्यात बसावेसे वाटत होते, फुगे घ्यावेसे वाटत होते... अजून एका माणसाकडे गुलाबी रंगाचा काहीतरी गोड खाऊ दिसत होता, तो खाऊन पाहायची इच्छा होत होती. पण आई आता कशालाच तयार नव्हती. फक्त घरी जायची घाई करत होती.

काहीशा नाखुशीनेच निन्नी आईचा हात धरून चालू लागली. तेवढ्यात आईला ओळखीचे कुणीतरी भेटले आणि ती त्या बाईंशी बोलू लागली. ती संधी साधून निन्नीने हळूच आपली सुटका करून घेतली आणि ती परत जत्रेतल्या दुकानांकडे चालू लागली. तेवढ्यात तो गुलाबी खाऊ विकणारा माणूस दिसला. 'चलो, बुढ्ढी के बाल लेलो.. सिर्फ एक रुपया...' तो ओरडत होता.

निन्नी हिरमुसली. तिच्याकडे कुठे एक रुपया होता! आत्ता इथे आई असती तर हट्ट करून तिने ते घ्यायला लावले असते, पण आता तेही शक्य नव्हते.

तितक्यात तिच्या मागून कुणीतरी तिच्या खांद्यावर हात ठेवला. तिने मागे वळून पाहिले. त्यांच्या गावात राहणारा राजूदादा तिच्याकडे बघून हसत होता.



राजूदादा तिला घेऊन काही अंतर गेला. त्यानंतर त्यांना एक गोठा लागला. गंमत म्हणजे त्या गोठ्याच्या समोरच एक घर होते. निन्नीला हे घर काहीसे ओळखीचे वाटले. नंतर तिच्या लक्षात आले, हे घर तर तिच्या सदामामाचे होते.

''तुला हवा हा खाऊ?'' त्याने विचारले.

निन्नीने होकारार्थी मान डोलावली.

''माझ्याबरोबर चल. तुला एक रुपया देतो. मग तू इथे ये आणि हा छान गोडगोड खाऊ घे विकत. येतेस?''

निन्नीचे डोळे लकाकले. ती त्याच्याबरोबर निघाली.

राजूदादा तिला घेऊन काही अंतर गेला. त्यानंतर त्यांना एक गोठा लागला. गंमत म्हणजे त्या गोठ्याच्या समोरच एक घर होते. निन्नीला हे घर काहीसे ओळखीचे वाटले. नंतर तिच्या लक्षात आले, हे घर तर तिच्या सदामामाचे होते. सदामामा हा तिच्या आईचा मानलेला भाऊ होता. इथे ती आईबरोबर यापूर्वी आली होती. त्याच्या अंगणात खेळली होती. समोर असलेल्या गोठ्यातल्या गाई आणि वासरांकडे बघताना तिला गंमत वाटायची. आज राजूदादा तिला त्याच गोठ्याकडे घेऊन चालला होता.

गोठ्यापाशी गेल्यावर निन्नीची पावले बाहेर थबकली. राजूदादा मात्र आत गेला. ''ये, आतमध्ये ये... अजून एक गंमत आहे,'' असे म्हणून त्याने निन्नीलाही आपल्या मागे बोलावले.

गोठ्याच्या आतमध्ये बऱ्यापैकी अंधार होता. आतल्या एका बाजूला गाई बांधलेल्या होत्या. निन्नीला मजा वाटली. आजपर्यंत ती गोठ्यात आतमध्ये कधीच गेली नव्हती. उड्या मारत ती आत शिरली.

मात्र ही मजा काही क्षणातच वेगळ्याच गोष्टीत बदलली. चार वर्षांची ती चिमुरडी त्या नराधमाच्या पाशवी वासनेची शिकार ठरली.

हे सर्व सुरू असतानाच कसा कोण जाणे पण समोरून तिचा सदामामा आला. त्याने गोठ्यात निन्नीला आणि तिच्या सोबत एका अनोळखी माणसाला एकत्र पाहिले. त्या दोघांची एकंदर अवस्था पाहून मामाला काय घडले असावे याचा अंदाज आला. पण त्याने काही करायच्या आत राजूदादा निन्नीला घेऊन तिथून पसार झाला. गावात या प्रकाराची बोंबाबोंब झाली. सदामामाने राजूला पाहिलेले असल्याने या प्रकरणातला गुन्हेगार तोच आहे हे समोर आलेले होते. राजू निन्नीला घेऊन पळाला त्यानंतर तो काही काळ तिला घेऊन लपून बसला, पण निन्नी नंतर सापडली.

निन्नीला पाहून तिच्या आईला तर आभाळ ठेंगणे झाले. पोर गायब झाल्यापासून तिच्या जिवात जीव नव्हता. पण आता तिच्यापुढे दुसरीच आपत्ती उभी ठाकली होती. निन्नीने जे काही सांगितले ते ऐकल्यावर तिच्या काळजाचा ठोका चुकला होता. राजू नावाच्या त्या नराधमाने याआधीही निन्नीच्या अब्रूचे लचके तोडले होते. त्या चार वर्षाच्या अजाण पोरीकडून हे सर्व ऐकतानाही कसेसेच वाटत होते.

राजू पळून जाण्याच्या बेतात असतानाच कुणीतरी त्याला पाहिले. त्यानंतर गावातल्या लोकांनी त्याला पकडून ठेवले आणि पोलिसांना पाचारण करण्यात आले.

लहानशा निन्नीला बोलते करणे, तिच्याकडून योग्य ती माहिती मिळवणे हे पोलीस पथकाच्या समोर असलेले मोठे आव्हान होते. त्यासाठी महिला सहायक पोलीस निरीक्षक विद्या जाधव यांनी मोठे योगदान दिले. पोलीस



**हे सर्व सुरू असतानाच कसा कोण जाणे पण समोरून तिचा सदामामा आला. त्याने गोठ्यात निन्नीला आणि तिच्या सोबत एका अनोळखी माणसाला एकत्र पाहिले. त्या दोघांची एकंदर अवस्था पाहून मामाला काय घडले असावे याचा अंदाज आला.**

पथकाने निन्नीच्या घरी जाऊन मोठ्या खुबीने आणि कौशल्याने तिची चौकशी केली. तिने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी तिला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवून तिचा वैद्यकीय अहवाल प्राप्त केला. त्याचप्रमाणे पोलिसांनी गुन्ह्याच्या घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा केला. गुन्ह्याच्या वेळी पीडितेने परिधान केलेले कपडे जप्त केले. दरम्यानच्या काळात राजू याला स्थानिक लोकांनी पकडून ठेवल्याचा संबंधित पोलीस पाटलांकडून शेगाव पोलीस स्टेशनला फोन आला. त्यानुसार पोलीस पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्यालाही वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले. गुन्ह्याच्या वेळी त्याने परिधान केलेले कपडेही जप्त करण्यात आले. पीडितेचा सविस्तर जबाब इन कॅमेरा नोंदवण्यात आला आणि त्याबाबतचे ६५ ब चे प्रमाणपत्र गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले. पीडितेच्या जन्माचा दाखला प्राप्त करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

मा. न्यायालयाने समोर आलेले साक्षीपुरावे ग्राह्य धरून आरोपीला भादंवि कलम ३७६ (A) (B) अन्वये २० वर्षे सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील शेगाव पोलीस ठाणे येथील महिला सहायक पोलीस निरीक्षक विद्या जाधव, आणि पोलीस अंमलदार दिनकर घोटेकर तसेच महिला पोलीस अंमलदार निराशा टेंभेकर (अलोने) यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# अकारण



जगदीश पवार
सहा. पोलीस निरीक्षक
पिशोर पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण)

**छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथील पिशोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेली घटना ही नातेसंबंधांना काळीमा फासणारी होती. शेखरच्या ध्यानीमनी नसताना त्याला व त्याच्या कुटुंबाला एका मोठ्या प्रसंगाला सामोरे जावे लागले होते. काय होती ती घटना? ती घटना घडण्यासाठी नेमके काय कारणीभूत होते? की अकारण घडले सगळे?**



मार्च महिना सुरू होऊन बरेच दिवस झाले होते. उन्हाळा अजून म्हणावा जाणवायला लागला नव्हता. एक दिवस सकाळीसकाळीच शेखर सुनंदाच्या माहेरी आला होता. त्यावेळी त्याची तिच्या घरच्यांशी बोलाचाली झाली होती. या बोलाचालीचे पर्यवसान नंतर हमरीतुमरीवर येण्यात झाले.

''सुनंदा, तू येते की नाही घरला माझ्याबरोबर? किती दिवस राहणार आहेस अजून माहेरी?''

''ए भैताड, तिला काय विचारायचं? आम्ही सांगतो ना. आमची नंदी नाही येणार तुझ्यासंगं.''



**राहुल मोरे**
सहा. पोलीस निरीक्षक
पिशोर पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर
(ग्रामीण)



**परमेश्वर दराडे**
पोलीस अंमलदार
पिशोर पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर
(ग्रामीण)



**सतीश देवकर**
पोलीस अंमलदार
पिशोर पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर
(ग्रामीण)



**उदलसिंग नागलोत**
पोलीस अंमलदार
पिशोर पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर
(ग्रामीण)



**रविंद्र देशमुख**
पोलीस अंमलदार
पिशोर पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर
(ग्रामीण)



**सुनिल ढेरे**
पोलीस अंमलदार
पिशोर पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर
(ग्रामीण)

''तिला घेतल्याशिवाय इथून हलणारच नाही ना बाप्पा.''

''हे बघा, काय बोलून राहिलं भैताड.''

''मी भैताड? तू मोठा शहाणा लागून गेला रे. नवरा बायकोच्यात बोलायचा काम नाई. सांगून ठेवतो.'' सुनंदाचा हात पकडून तो तिला स्वत:कडे ओढायला लागला.

''हात सोड माज्या पोट्टीचा.'' सुनंदाचे वडील तिचा हात सोडवण्याचा कसोशीने प्रयत्न करत होते. शेवटी ते तिचा हात सोडवण्यात यशस्वी झाले. हे सगळे दोन चिमुरडे आतल्या खोलीला लावलेल्या पडद्याआडून भेदरलेल्या डोळ्यांनी बघत होते. हे सुनंदाच्या लक्षात आल्यावर तिने त्या दोघांनाही आतल्या खोलीत जायला सांगितले.

''मी नाई यायची तुमच्याबरोबर. एकदा सांगून डोसक्यात शिरत नाई का?''

''कशी येत नाई तेच बघतो मी. तिथे शेतीची कामं खोळंबून राहिली तुझ्यापायी. शेतात आय–दादा कष्ट करून राहीले आणि तू इथे माहेरी मजा करत राहा.'' हे बोलताना शेखरच्या नाकपुड्या



**त्याने बराच वेळ प्रयत्न करूनही सुनंदा त्याच्याबरोबर परत गेली नाही. तो उद्विग्न मनाने सुनंदाच्या घरातून बाहेर पडला. त्याने स्वत:बरोबर परत आणण्याचा केलेला अजून एक प्रयत्न सपशेल फसला होता. पुढचे काही दिवस असेच गेले.**

फुरफुरत होत्या. त्याचे डोळे आग ओकत होते.

''अच्छा! म्हंजी तुमाले घरात बायको नाही, गडी हवाय... जो घरी आणि तुमच्या शेतात सगळीकडे काम आणि कामच करेल.''

आपल्या हाताची तर्जनी नवऱ्याच्या दिशेने रोखत मान हलवत सुनंदा म्हणाली.

''असं नाय काय? अगं बायको हायेस तू माजी... तू गडी कशी होशील? तिकडे गावात सगळी लोकं नाई नाई ते बोलतात आपल्याबद्दल. ते काई नाई. तू चल आपल्या घरी. तू खरं तर इथे कमी आणि घरी जास्त असं पाहिजे, पण तू तर उलटंच करून राहिली बे.''

त्याने बराच वेळ प्रयत्न करूनही सुनंदा त्याच्याबरोबर परत गेली नाही. तो उद्विग्न मनाने सुनंदाच्या घरातून बाहेर पडला. त्याने स्वत:बरोबर परत आणण्याचा केलेला अजून एक प्रयत्न सपशेल फसला होता.

पुढचे काही दिवस असेच गेले. आलेला प्रत्येक दिवस काढणे हेच आपल्या नशिबात आहे अशी त्याने स्वत:ची आणि घरच्यांची समजूत काढली होती.

आता एप्रिल महिना संपत आला होता. एप्रिल म्हणजे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा महिना. शेताची नांगरणी आणि अनेक मान्सूनपूर्व कामे या काळात त्यांना करायची असतात.

पेरणीसाठी जमीन तयार करावी लागते. शेखरला आता सगळे काही बाजूला सारून शेतीच्या कामाला लागणे आवश्यक होते.

''आई, मी शेताकडे जाऊन राहिलो. आज सकाळपास्नं लई कामं बाकी राहिली आहेत.''

''अरे थांब. नीट खाल्लंपण नाहीस ना तू बाप्पा...''

''नको. टाईम नाही ना तेवढा. आणि तूपण येऊन राहिली ना शेतात कामाले? मग इथे कशाले परत परत करत बसतेस?''

''त्याले काय होतंय. मी पटकन करते काही तरी.''

''ऐक माजं. नको देऊ. मले भूकच नाही ना आत्ता. मी जाऊन कामं उरकून घेतो.''

आशा आपल्या अर्धपोटी उठणाऱ्या लेकाला खायला देण्याचा प्रयत्न करत होती, पण शेखर मात्र ती येईपर्यंत तिथून गेला होता. शेखर तिथून गेल्याचे तिला समजताच तिनेही दरवाजाला कुलूप लावले आणि शेताच्या दिशेने झपझप पावले उचलत ती निघाली. माथ्यावर तळपणाऱ्या सूर्याकडेही तिचे लक्ष नव्हते. ती शेतात पोहोचली तेव्हा शेखर शेतात काम करत होता.

''तू आलीस व्हय?''

''मग अजून दुसरं कोण? हे बघ, तू इकडची बाजू कर... मी तिकडच्या बाजूनं येते इकडे. म्हणजे तुला तिथपर्यंत तण काढत यायला नको लागायले.''

''ऱ्हाऊ दे. तू नको करू. एकतर सूर्यपण आग ओकून राहिला. जिने माझ्याबरोबर असायला हवं, ती तिकडे मजेत जगते. आणि त्या बदल्यात या वयात तुले शेतात यावं लागतंय कामाले.''

हे बोलताना शेखरचा कंठ दाटला होता. त्याला धीर देण्याचे



**तो परत एकदा स्वत:च्या विचारात गढून गेला. तो भानावर आला तेव्हा त्याला काहीजण मारहाण करत होते. त्या लोकांनी त्याच्या हातावर पायावर स्वत:बरोबर नेलेल्या काठ्यांनी, कुऱ्हाडीने वार करायला सुरुवात केली.**

काम आशा करत होती.

''अरे, हे दिवसबी जातील. सम्दे दिवस सारखे नसतात. मी सांगते, सुनंदा नक्की परत यील बघ.'' त्याच्या पाठीवरून मायेने हात फिरवत आशाने त्याची समजूत काढली. तिने समजूत घातल्यावर ते दोघेही परत एकदा शेतीच्या कामाला लागले. यात वेळ कसा भरकन पुढे गेला हे समजले नाही. घामाने संपूर्ण शरीर ओले झाले होते. जरा वेळ विसावा घ्यावा या विचाराने शेखर शेतातल्याच लिंबाच्या झाडाखाली बसला. त्याचे नाक, हनुवटी, मान, हात, पाय यांसह सर्वांगावर घर्मबिंदू जमा झाले होते.

''आई आई गं! सुर्व्या आग ओकून राहिला. त्यापायी हे सम्दं होऊन राहिलं. काम करण्यासाठी पण जीव होऊन नाई राहिला.'' जवळ असलेल्या उपरण्याने तो चेहऱ्यावरचा घाम पुसत होता. आता जरा निवांत बसावे या विचाराने त्याचे दमलेले शरीर सैलावले.

नेमके त्याच वेळी दूर कुठेतरी जीपसारखे मोठे वाहन थांबल्याचा आवाज त्याने ऐकला. आत्ता एवढ्या उन्हात शेताच्या बाजूला कोण आलं असेल? या विचारात त्याने आजूबाजूला नजर जाईल तिथपर्यंत मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. पण अंतर जास्त असल्याने त्याला नीटसे कळले नाही. तो परत एकदा स्वत:च्या विचारात गढून गेला. तो भानावर आला तेव्हा त्याला काहीजण मारहाण करत होते. त्या लोकांनी त्याच्या हातावर पायावर स्वत:बरोबर नेलेल्या काठ्यांनी, कुऱ्हाडीने वार करायला सुरुवात केली. शेतात त्यावेळी तिथे असलेल्या शेखरच्या घरातल्या लोकांनीही मारहाणीला प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली. नेमके काय झाले हे कोणालाच

काही कळले नाही. शेखरच्या शेतात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. वेदनांच्या विव्हळण्याने सगळा आसमंत भरून गेला. हा सगळा प्रकार काही लोकांनी बघितला. ते लोक हे सगळे थांबवण्यासाठी आलेले बघून आलेले शेखर आणि त्याच्या घरच्यांना मारणारे लोक तिथून पसार झाले. काहींनी जखमी झालेल्या लोकांना तातडीने दवाखान्यात नेले. झालेला प्रकार बघून डॉक्टरांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्याची सूचना केली. काही लोकांनी छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथील पिशोर पोलीस ठाण्यात घडलेला प्रकार सांगितला. पिशोर पोलीस ठाण्यात सहा. पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असणारे जगदीश पवार यांनी पथकासह प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तत्परतेने रुग्णालय गाठले.

''डॉक्टर, हाऊ इज ही?''

''वेल, ऑफिसर, त्यांना बराच मार लागलाय. आम्ही ट्रीटमेंट सुरू केली आहे.''

''आम्ही भेटू शकतो त्यांना?''

''अंऽऽऽ भेटा... पण फार स्ट्रेस देणं डेंजरस ठरू शकतं.''

''ओके डॉक्टर. थँक्स.''

साहेबांनी डॉक्टरांशी हस्तांदोलन करत त्यांना धन्यवाद दिले. डॉक्टर तिथून गेल्यानंतर पोलीस शेखरच्या बेडपाशी गेले. बेडवर शेखर वेदनांनी विव्हळत होता. त्याच्या शरीरावर अनेक ठिकाणी बँडेज होते. पोलीस आल्याचे समजताच तो त्या स्थितीतही उठून बसण्याचा प्रयत्न करू लागला.

''उठू नका.'' साहेबांनी त्याला समजावले. ''हे सगळं कोणी केलं? तुम्ही ओळखता त्यांना?''

साहेबांच्या या प्रश्नावर शेखरने मान हलवली. शेखरने त्याही अवस्थेत साहेबांना त्या संशयित



**लोक हे सगळे थांबवण्यासाठी आलेले बघून आलेले शेखर आणि त्याच्या घरच्यांना मारणारे लोक तिथून पसार झाले. काहींनी जखमी झालेल्या लोकांना तातडीने दवाखान्यात नेले. झालेला प्रकार बघून डॉक्टरांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्याची सूचना केली.**

हल्लेखोरांची नावे सांगितली. पोलिसांनी घटनास्थळ संरक्षित केले. हे सगळे होईपर्यंत बरीच रात्र झाली होती. दुसरा दिवस उजाडताच साहेबांनी सरकारी पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच रक्ताचे नमुने, घटनेच्या वेळी शेखरने परिधान केलेले कपडे तसेच अन्य महत्त्वाच्या गोष्टी संकलित केल्या. दरम्यानच्या काळात त्याचा मृत्यू झाल्याची बातमी पोलिसांना समजली. साहेबांनी शेखरच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करून त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. त्याच्याबाबतची वैद्यकीय कागदपत्रे वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्राप्त केली.

***

पिशोर पोलीस ठाण्यात काही लोक आले होते. त्यांना मारहाण झाली आहे अशी त्यांची तक्रार होती. आलेल्या लोकांनी त्यांची नावे सांगताच साहेबांनी ताबडतोब कारवाई सुरू केली.

''ताब्यात घ्या यांना.'' साहेबांनी आपल्या पथकाला सूचना केली.

''आम्ही काय केलं साहेब? आम्हाला मारलंय म्हणून आम्ही आलोय इथे तर तुम्ही तक्रार नोंदवून घ्यायच्या ऐवजी आम्हालाच बोलताय.''

''हे बघा, उगाच साळसूद बनू नका. तुम्ही काय केलं ते तुम्हाला चांगलंच माहिती आहे आणि आम्हालाही.''

''म्हणजे? हे काय बोलून राहिलात तुमी साहेब?''

त्यांच्यातला एकनाथ नावाचा मनुष्य बेडरपणे साहेबांच्या नजरेला नजर देत बोलत होता. पण आपण काय केले आहे याची माहिती पोलिसांना समजली आहे याबद्दल

त्याला आणि बाकीच्यांना अंदाज आला होता.

''आता नाटकं न करता पटकन बोलायचं... का मारलं तुम्ही शेखर आणि त्याच्या घरच्यांना?''

साहेबांच्या या थेट विचारण्याने आपण आता फार काळ नाटक करू शकणार नाही हे एकनाथ आणि बाकीच्यांना कळून चुकले होते. खरे बोलण्याशिवाय त्यांच्यापुढे अन्य पर्याय नव्हता

''काय करणार? दुसरा मार्गच त्याने शिल्लक ठेवला नव्हता.''

''म्हणजे? काय ते नीट सांग.''

''अवो, माझ्या बहिनीला– सुनंदाला– स्वत:च्या घरी घेऊन जायला आला होता. सारखं आपलं 'नंदे माहेरी किती दिवस राहणार? घरी चल'चं टुमण सुरूच होतं.''

''मग त्यात गैर काय? तो स्वत:च्या बायकोलाच घरी नेत होता. अकारण म्हणत नव्हता ना तो?''

''अवो पण आमच्या नंदीला त्याच्याबरोबर जायचं नव्हतं. ती सुखात नव्हती तिकडे. वर 'तू कशी येत नाही तेच बघतो' अशी धमकी देऊन राहिला. कोण सहन करील हे? आणि त्यानं धमकी खरी केली म्हणजे? आमच्या नंदीला पुन्हा त्या नरकात रहाव लागलं असतं ना. मग ठरवलं, याचा कायमचा इलाज करायचा. म्हणून मग आम्ही त्याचा बंदोबस्त करण्यासाठी स्कॉर्पिओ गाडी घेऊन निघालो. त्याच्या गावात जाईपर्यंत आम्हाला थोडा उशीर झाला. नंदीने सांगितल्याप्रमाणे आम्ही त्याच्या शेतात गेलो तर तो भैताड लिंबाच्या झाडाखाली बसला होता. त्याला काही कळण्याच्या आत आम्ही त्याला मारलं. त्याच्या ओरडण्यानी त्याच्या घरातले बाकीचेपण आले. त्यांनी आम्हाला मारण्याचा प्रयत्न केला. पण आम्ही बांगड्या नाहीत



**आम्ही त्याचा बंदोबस्त करण्यासाठी स्कॉर्पिओ गाडी घेऊन निघालो. त्याच्या गावात जाईपर्यंत आम्हाला थोडा उशीर झाला. नंदीने सांगितल्याप्रमाणे आम्ही त्याच्या शेतात गेलो तर तो भैताड लिंबाच्या झाडाखाली बसला होता. त्याला काही कळण्याच्या आत आम्ही त्याला मारलं.**

भरल्या हातात. त्यांनापण आडवं केलं. आमच्यातल्या काहींना मार लागला थोडा. पण मेन काम तर पार पडलं ना! पण त्या लोकांनी ओरडायला सुरुवात केली म्हणून मग आम्हाला तिथून पळावं लागलं.''

पोलिसांनी निवेदन पंचनाम्याद्वारे गुन्ह्यात वापरलेली कुऱ्हाड व काठ्या व अन्य महत्त्वाच्या गोष्टी घटनास्थळावरून संकलित केल्या. संकलित केलेल्या गोष्टी पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठवल्या. तसेच पोलिसांनी संशयितांच्या विरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

समोर आलेले साक्षीपुरावे ग्राह्य धरत मा. न्यायालयाने मुख्य आरोपीला भा.दं.वि. कलम ३२४ प्रमाणे दोषी ठरवले तर त्याच्या जोडीदाराला भा.दं.वि कलम ३०४(१) नुसार दोषी ठरवून १० वर्षे सश्रम कारावास तसेच एक हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास पिशोर पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक जगदीश पवार, राहुल मोरे, पोलीस अंमलदार परमेश्वर दराडे, सतीश देवकर, उदलसिंग नागलोत, रविंद्र देशमुख व सुनिल ढेरे यांनी अत्यंत तत्परतेने व कौशल्याने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



कै. रामराव नारायण हाटे

# दिवंगत
# हाटे दांपत्याच्या स्मरणार्थ



कै. लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे

## बक्षिस योजना

श्री. रमेश रामराव हाटे (Bombay Helpline Consultancy Services India Pvt. Ltd.) व Smt. Laxmidevi Ram Narayan Hate Charitable Trust यांच्याकडून त्यांचे दिवंगत वडील रामराव नारायण हाटे, तत्कालीन पोलीस अधीक्षक, क्राईम ब्रांच २, सीआयडी आणि दिवंगत आई लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे यांचे स्मरणार्थ दिलेल्या रकमेतून दक्षता मासिकातील सर्वोत्कृष्ट तपासकथा, लेख/कविता/कथा यांच्यासाठी दरमहा बक्षीस योजना सुरू करण्यात आली आहे.

सदर बक्षीस योजनेअंतर्गत माहे मे २०२६ मधील बक्षीसप्राप्त विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे:

| तपशील | तपासकथा/ लेख/कविता यांचे नाव | विजेत्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| सर्वोत्कृष्ट तपासकथा प्रथम क्रमांक | प्रतीक्षा | श्री. रामचंद्र मोहिते, पोलीस निरीक्षक, शिळ डायघर पोलीस ठाणे, ठाणे | रु. ७,०००/- |
| सर्वोत्कृष्ट तपासकथा द्वितीय क्रमांक | उलगडा | यशवंत सोळसे, पोलीस निरीक्षक, उमरेड पोलीस ठाणे, नागपूर | रु. ५,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता प्रथम क्रमांक | स्क्रीनच्या सावलीत हरवलेले बालपण | रोजमेरी दुधाट, कोल्हापूर | रु. ३,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता द्वितीय क्रमांक | घड्याळाचे काटे | डॉ. दिनेश बारी | रु. २,०००/- |

## पाककृती



# शेवग्याच्या शेंगांचे सूप

## शेवग्याच्या शेंगांचे सूप

### साहित्य:

६-७ शेवग्याच्या शेंगा

१ मोठा कांदा

१ बटाटा

१०-१ लसूण पाकळ्या

१ इंच आले

१० मिरीदाणे

६ लवंगा

२ टीस्पून जिरे

१ टीस्पून बडिशोप

१ टेबलस्पून साजुक तूप

१ टीस्पून मिरपूड

चवीनुसार मिठ

१ टीस्पून साखर

### कृती:

१. शेवग्याच्या शेंगाचे तुकडे, कांदा मोठे तुकडे, बटाट्याचे तुकडे, आल्याचे तुकडे, लसूण पाकळ्या तसेच लागणारे खडे मसाले काढून ठेवा. कुकरमध्ये साजुक तूप गरम झाल्यावर जिरे, बडिशोप, मिरी, लवंगा परतून घ्या.

२. नंतर त्यात सर्व कट केलेल्या भाज्या चांगल्या परतून घ्या. पाणी मिक्स करून कुकरचे झाकण बंद करून५-६ शिट्ट्या काढून घ्या.


३. नंतर भाज्या थंड करून पाणी व भाज्या वेगळ्या काढा व मॅश करा. तसेच शेंगांचा गर व बिया वेगळ्या काढून मॅश करून घ्या. सर्व मिश्रणाची पेस्ट करा.

४. नंतर त्यात भाज्यांचे पाणी मिक्स करा पातेल्यात साजुक तूप गरम झाल्यावर जिरे टाकून फोडणी तयार करा.

५. त्यावर तयार पेस्ट ओतून उकळी काढा. साखर, चवीनुसार मीठ टाका. आपले शेवग्याच्या शेंगांचे सूप तयार आहे.

६. २ बाऊलमध्ये गरमागरम तयार सूप घेऊन वरून मिरपूड भुरभुरवून डिश सर्व्ह करा.

# शब्दकोडे




**आडवे शब्द**

१. साथीच्या रोगाला गावाबाहेर हाकलणारी मिरवणूक ४. नवीन ७. कमी दर्जाचे, क्षुद्र ८. कण ९. औषध १०. चप्पल १३. विद्युत १५. दह्याचे पेय १६. हार १९. शैली २१. सांभाळ, निगराणी २२. हरभरे २३. आदत २५. वेल २७. हाक २९. एक सुगंधी फूल ३१. कर्नाटकातील एक किनारी प्रदेश ३२. योद्धा ३३. शेतात बांधलेला तलाव ३५. इंदोरमध्ये प्रसिद्ध असलेला एक मसाला ३६. आणि ३७. जमीन

**उभे शब्द :**

१. माणुसकी २. सहोदरी ३. शरीर ४. चेहरा ५. सोय ६. वाम ११. पिटाळून लावणे, हुसकणे १२. पाणी १४. जयघोष १७. एक मत्स्यविशेष १८. राधेचा पती २०. पालट २२. सजीव व निर्जीव २४. एक प्रसिद्ध मराठी लेखक २६. ताकापासून तयार होणारा एक पदार्थ २८. दाणेदार ३०. एक पालेभाजी ३३. अभिप्राय ३४. गवत

## दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

**बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-**

# मे २०२६ च्या अंकात प्रसिद्ध
# झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : ____________________

पत्ता : ____________________

____________________ मोबाईल : ____________________

अकाऊंट नं : ____________________ आयएफएससी कोड ____________________

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | म | यं | ती | | चा | क | व | त | |
| ला | | | र | म | ण | | न | | खू |
| ल | ट | वा | क | | क्य | | रा | ख | ण |
| | | द | म | ट | | वा | ज | वी | |
| ख | ग | | ठा | ण | व | ई | | स | र |
| र | | मे | | त्का | | | के | | स |
| व | त | न | दा | र | | | का | | क |
| स | र | का | र | | री | त | र | वे | स |
| | का | | व | पु | | स | व | त | |
| प | री | | ठा | णे | | दी | | न | र |



शब्दकोड्याचे अचूक उत्तर प्राप्त न झाल्याने कोणीही विजेता ठरलेला नाही.

# लाखो वाचक

## ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे, ५१ वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...




**आपली प्रत आजच राखून ठेवा!**

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पत्रव्यवहारासाठी पत्ता:

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय

शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी: ०२२-२२८३४५११/२२०४९७०१

mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine June 2026. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय




**प्रेषक :**

**सरसंपादक, दक्षता**

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१

**प्रति,**